बुलढाणा | गुरुवार । २६ मार्च २०२६ । वर्ष-३ । अंक-२२२ । पृष्ठे-१२ । किंमत-५ रु. | RNI : MAHMAR/2023/89148 | DAINIK MAHABHOOMI | बुलढाणा । छत्रपती संभाजीनगर । जालना । अकोला । वाशिम



आज रामनवमी


# दैनिक महाभूमि

निर्मळ, निकोप, निःपक्ष

https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com




# देशात १०० नवीन विमानतळ, २०० हेलीपॅड उभारणार

- उडान २.० योजनेचा विस्तार
- केंद्रीय मंत्रिमंडळाचे मोठे निर्णय

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत २५ मार्च रोजी देशाच्या विमान वाहतूक, इमिग्रेशन आणि पर्यावरणाशी संबंधित अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या निर्णयांमध्ये देशभरात १०० नवीन विमानतळ, २०० हेलीपॅड उभारण्यास मंजुरी, उडान २.० योजनेचा विस्तार, परदेशी नागरिकांच्या व्हिसा आणि ट्रॅकिंग प्रणालीची योजना २०३१ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.



सरकारने देशभरात १०० नवीन विमानतळ उभारण्यास मंजुरी दिली आहे. प्रत्येक विमानतळासाठी सरासरी सुमारे १०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, या प्रकल्पासाठी सरकारने १२,१५९ कोटी रुपयांचा बजेट निश्चित केला आहे. हे विमानतळ चॅलेंज मोडमध्ये उभारले जाणार आहेत. म्हणजेच, ज्या राज्य किंवा शहराकडून जमीन सुरक्षा व्यवस्था, आवश्यक सुविधा लवकर आणि चांगल्या पद्धतीने उपलब्ध करून दिल्या जातील, त्या ठिकाणांना विमानतळासाठी प्राधान्य दिले जाईल. सरकार देशभरात २०० नवीन आधुनिक हेलीपॅड उभारणार आहे. विशेषतः डोंगराळ भाग, ईशान्य भारत आणि बेट क्षेत्र. जिथे रस्ते बांधणे कठीण आहे, तिथे हेलिकॉप्टर हा मुख्य वाहतूक पर्याय बनवण्याचा सरकारचा उद्देश आहे. या प्रकल्पासाठी ३,६६१ कोटी रुपये खर्च करण्यात येणार आहेत. याशिवाय भारतात तयार होणाऱ्या विमानांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि नवीन विमान खरेदीसाठी ४०० कोटी रुपयांचा निधी ठेवण्यात आला आहे.

### व्हिसा आणि इमिग्रेशन ट्रॅकिंग योजना २०३१ पर्यंत

■ भारतामध्ये येणाऱ्या परदेशी नागरिकांच्या व्हिसा, नोंदणी आणि ट्रॅकिंगशी संबंधित आयव्हीएफआरटी योजना पुढील ५ वर्षांसाठी, म्हणजे १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०३१ पर्यंत वाढवण्यात आली आहे. या योजनेसाठी १,८०० कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून, भारताची इमिग्रेशन आणि व्हिसा प्रणाली अधिक आधुनिक आणि सुरक्षित बनवणे हा यामागील उद्देश आहे.

**पर्यावरणाबाबतही महत्त्वाचा निर्णय**

केंद्रीय मंत्रिमंडळाने २०२५ ते २०३५ या कालावधीसाठी भारताचे नवीन पर्यावरण लक्ष्य मंजूर केले आहेत. या निर्णयाचा उद्देश प्रदूषण कमी करणे, पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास हा आहे.

### उडान योजना विस्तार; २८,८४० कोटी खर्च

■ देशातील लहान शहरांना हवाई सेवेशी जोडण्यासाठी सुरू असलेली उडान योजना आता पुढील १० वर्षांसाठी वाढवण्यात आली आहे. या योजनेसाठी सरकार २८,८४० कोटी रुपये खर्च करणार आहे. यामुळे सामान्य नागरिकांसाठी हवाई प्रवास अधिक स्वस्त आणि सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

## न्यूज ब्रीफ

### एमपीएससी निकालाची नव्याने यादी जाहीर

**नागपूर :** विद्यार्थ्यांकडून परीक्षेवर अनेकदा प्रश्नचिन्हे उपस्थित केली जातात. न्यायालयामध्ये काहींना न्याय मिळतो तर काहींना अपयश येते. मात्र, एमपीएससीच्या गट अ दर्जाच्या पदाच्या एका परीक्षेत न्यायालयाने विद्यार्थी हिताचा निर्णय दिला असून यामुळे नव्याने शिफारस यादी जाहीर करण्यात आली आहे. यामुळे अनेकांना दिलासा मिळाला असून बळ आले आहे. या निकालात महेश शेजल पहिला आला आहे. खुल्या वर्गातून त्यांनी पहिला येण्याचा मान मिळवला.

### लाडक्या बहिणींना मिळणार लवकरच हप्ता

**मुंबई :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या महिलांसाठी दिलासा देणारी गोष्ट म्हणजे फेब्रुवारीच्या हप्त्यासंदर्भात नवी अपडेट समोर आली आहे. सामाजिक न्याय विभागाने फेब्रुवारी महिन्याचा लाडकी बहीण योजनेचा हप्ता वितरित करण्यासाठी २७७ कोटी रुपये महिला व बालविकास खात्याच्या अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर वितरित करण्यास शासन निर्णयाद्वारे मान्यता दिली.

झीरो एफआयआर दाखल करण्याचा कर्नाटक सरकारला अधिकार नाही

# विमानात स्फोटक पदार्थाचा अंश आढळला नाही : देवेंद्र फडणवीस



**मुंबई, वृत्तसंस्था :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना अजित पवारांच्या विमान अपघातावरही भाष्य केले. यावेळी त्यांनी या अपघाताचा तपास सीआयडीकडून सुरु असल्याचे सांगितले. बारामतीत लँड होण्यापूर्वीच अजितदादांच्या विमानाचा अपघात झाला होता. विमानात स्फोटक पदार्थाचा अंश नसल्याचे अहवालातून स्पष्ट झाले असल्याचे फडणवीस यांनी सांगितले. झीरो एफआयआर कर्नाटक सरकारला दाखल करून घेण्याचा अधिकार नसल्याचे फडणवीस यावेळी म्हणाले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा २५ मार्च हा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे दोन्ही सभागृहांत कामकाजाचा तुफान धडाका सुरू दिसून आला. रोहित पवार यांनी कर्नाटकमध्ये एफआयआर दाखल केला आहे. महाराष्ट्रात एफआयआर दाखल होऊन अजितदादांना न्याय मिळू शकला नाही, अशी खंतही रोहित पावर यांनी व्यक्त केली होती. त्यानंतर आता या प्रकरणी देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर माहिती दिली. झिरो एफआयआर म्हणजे काय? हे सांगताना कर्नाटक सरकारला अशा प्रकारचा एफआयआर दाखल करून घेण्याचा कोणताही अधिकार नाही, असेही यावेळी फडणवीस यांनी सांगितले.

### ऐनवेळी विमानाचे पायलट का बदलले?

■ विमानाचे दोन्ही पायलट हे ऐनवेळी का बदलण्यात आले? असे प्रश्न रोहित पवारांनी विचारले होते. यावरही फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी अजित पवार अपघाताच्या दिवशी मुंबई विमानतळावर पोहोचल्याचे आणि विमानात बसल्याचे, ते विमान बारामतीत दुर्घटनाग्रस्त झाल्याचे सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहे अशी माहिती दिली. पायलट ऐनवेळी बदलले नव्हते, त्यांच्याकडे योग्य तो परवाना होता आणि विमान उड्डाणाआधी त्यांची ब्रेथ ॲनालायजर चाचणीही झाली होती असे स्पष्ट केले. मुंबई ते बारामती या अजित पवारांच्या दौऱ्यासाठी २७ जानेवारी रोजी रात्री ८ वाजून ४५ मिनिटांनी विमान बूक केले.



**बारामती विमानतळ अनफिट आढळून आले..** देवेंद्र फडणवीस म्हणाले, एकूणच तपासात तांत्रिक डेटा विश्लेषण, घटनास्थाळ तपासणी, हवामान परिस्थितीचा अभ्यास या सगळ्या गोष्टींवर विशेष भर देण्यात आला आहे. एएआयबी नुसार बारामती विमानतळावर अधिकृत मेटेरिओलॉजीकल सुविधा उपलब्ध नाही. व्हीएफआर उड्डाणासाठी आवश्यक दृश्यमानता ही किमान ५००० मिटर पेक्षा जास्त अपेक्षित आहे. तथापि घटनेच्या वेळी दृश्यामनता ३००० मिटर इतकी होती. विमानतळावर विंडसॉक शिवाय कोणतेही उपकरण उपलब्ध नाही. त्यामुळे सदर लँडींग हे दृश्यमानतेवर अवलंबून होते. विमानतळावर स्वतःची एआरएफएफ उपलब्ध नाही. सन २०१६ नंतर रनवेचे डांबरीकरण झाले नव्हते. तसेच त्यावर खडी व चिन्हे फिकी झालेली आढळून आली. बारामती विमानतळ हे अनफिट आढळून आले.

# पीएनजी असलेल्या भागात एलपीजी पुरवठा होणार बंद; गॅस वाहिनी जोडणीसाठी ४८ तासांची डेडलाईन

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

देशातील ऊर्जा साखळीत मोठी सुधारणा करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ज्या भागात पाइपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) उपलब्ध आहे, अशा ठिकाणी घरगुती गॅस ग्राहकांनी पीएनजी जोडणी घेणे आता अनिवार्य करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, पीएनजीची सुविधा उपलब्ध असूनही ज्या कुटुंबांनी ही जोडणी घेतलेली नाही, त्यांचा एलपीजी (एलपीजी) सिलेंडर पुरवठा तीन महिन्यांनंतर कायमचा खंडित केला जाईल, असा स्पष्ट आदेश केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने जारी केला आहे.

जागतिक स्तरावर, विशेषतः पश्चिम आशियातील वाढता भू-राजकीय तणाव आणि विस्कळीत झालेली पुरवठा साखळी विचारात घेता, भारताने आपल्या इंधन धोरणात बदल करण्याचे ठरवले आहे.

एकाच प्रकारच्या इंधनावर अवलंबून न राहता इंधन विविधीकरण करणे हा यामागचा मुख्य हेतू आहे. पाइपलाइनद्वारे गॅस पोहोचवल्यामुळे एलपीजी सिलेंडरची वाहतूक आणि वितरणावरील ताण कमी होईल. तसेच, शहरांमधून वाचलेला एलपीजी साठा अशा दुर्गम भागात वळवता येईल जिथे अद्याप पाइपलाइन पोहोचलेली नाही. या नवीन नियमावलीत सरकारने काही अपवादही ठेवले आहेत.



### पाइपलाइन विस्तारासाठी फास्ट ट्रॅक यंत्रणा

■ जीवनावश्यक वस्तू कायदा आणि नैसर्गिक वायू वितरण आदेश, २०२६ अंतर्गत सरकारने पाइपलाइन टाकण्याचे काम गतीने पूर्ण करण्यासाठी कडक मार्गदर्शक तत्त्वे आखली आहेत. गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये पाइपलाइनसाठी ३ कार्यालयीन दिवसांच्या आत प्रवेश मिळवणे आता सोपे होणार असून, अर्ज केल्यानंतर अवघ्या ४८ तासांच्या आत लास्ट माईल पीएनजी जोडणी पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अधिकृत कंपन्यांनी मंजुरी मिळाल्यापासून ४ महिन्यांच्या आत प्रत्यक्ष काम सुरू करणे आवश्यक आहे, अन्यथा त्यांचे परवाने रद्द होऊ शकतात.

### 'देशात पेट्रोल-डिझेलची कमतरता नाही'

■ केंद्र सरकारने बुधवारी सांगितले की, आपल्याकडे कच्च्या तेलाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. देशातील कोणत्याही पेट्रोल पंपावर पेट्रोल आणि डिझेलची कोणतीही कमतरता नाही. पेट्रोल पंपांना पुरवठा करणाऱ्या टर्मिनल्सवरही पुरेसा साठा उपलब्ध आहे. दिल्लीत आंतर-मंत्रालयीन ब्रीफिंगदरम्यान पेट्रोलियम मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी लोकांना भीती आणि घबराटीत पेट्रोल-डिझेल खरेदी करणे टाळण्याचे आवाहन केले. त्यांनी हे देखील स्पष्ट केले की पेट्रोल आणि डिझेलच्या किमतीत कोणतीही वाढ झालेली नाही.

# ॲसिड हल्ल्यातील पीडितेची ओळख उघड केल्यास शिक्षा

## राज्य सुधारणा विधेयकाद्वारे दोन तरतुदीस मंजुरी

**मुंबई, वृत्तसंस्था :**

महिलांच्या सुरक्षेसाठी केंद्राकडून भारतीय न्याय संहिते अंतर्गत कायदा मंजूर करण्यात आल्यानंतर राज्यांमध्ये तो लागू करण्याआधी त्यामध्ये राज्य सुधारणा विधेयकाद्वारे दोन तरतुदी वाढवण्यात आल्याबाबत बुधवारी विधान परिषदेमध्ये चर्चा करण्यात आली. भारतीय न्याय संहितेमध्ये या दोन तरतुदींचे सर्व सदस्यांनी एकमताने स्वागत केले. मात्र बरेचदा महिलांविषयी केलेल्या कायद्यांचा वैयक्तिक किंवा राजकीय हेतूने दुरुपयोग होत आहे याकडे देखील सदस्यांनी लक्ष वेधले. त्यामुळे महिलांना न्याय मिळावा हे जरी योग्य असले तरी त्यातून इतरांवर अन्याय होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली जावी असे विधान परिषदेमध्ये चर्चे दरम्यान सदस्यांनी सुचवले.

ॲसिड हल्ल्यातील पीडितेची ओळख उघड केल्यास शिक्षा ही प्रमुख तरतूद यामध्ये आहे; कारण सध्याच्या कायद्यात ही बाब स्पष्ट नाही. त्यामुळे पीडितेची ओळख उघड होऊन तिच्यावर अधिक मानसिक आणि सामाजिक परिणाम होऊ शकतो. हे टाळण्यासाठी आणि तिचे संरक्षण करण्यासाठी ही तरतूद केली जात आहे. सोशल मीडियावर अश्लील फोटो-व्हिडिओ पाठवणे किंवा प्रसारित करण्याची धमकी देणे हा गुन्हा.

# इराणचा अमेरिकेच्या अब्राहम लिंकन युद्धनौकेवर क्षेपणास्त्र हल्ला

**तेहरान/वॉशिंग्टन**

आखाती देशात युद्ध आणखी पेटणार!



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी काही दिवसांसाठी इराणवरील हल्ले थांबवले असले तरी, इराण माघार घ्यायला तयार नाही. मध्य-पूर्वेतील तणाव पुन्हा वाढला आहे. इराणने दावा केला आहे की, त्यांनी बुधवारी अमेरिकेच्या अब्राहम लिंकन या युद्धनौकेवर क्रूझ क्षेपणास्त्रे डागली. इराणी लष्कराने अमेरिकेला इशारा दिला आहे की, जेव्हा हल्ला करणाऱ्या गटाची जहाजे टप्प्यात येतील, तेव्हा आणखी क्षेपणास्त्रे डागली जातील.

इराणच्या नौदलाच्या कादेर क्रूझ क्षेपणास्त्रांनी युएसएस अब्राहम लिंकन या विमानवाहू जहाजाला लक्ष्य केले, मार्ग बदलण्यास भाग पाडले, असे इराणी लष्कराने एका निवेदनात म्हटले आहे. या निवेदनात नौदल प्रमुख ॲडमिरल शहराम इराणी यांच्या हवाल्याने असेही म्हटले आहे की, विमानवाहू जहाजांच्या गटाच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवले जात आहे आणि शत्रूचा ताफा त्यांच्या क्षेपणास्त्र प्रणालीच्या टप्प्यात येताच इराणी नौदल जोरदार हल्ला करेल. या आधी इराणी नौसेनेने अमेरिकेला इशारा दिला होता. अमेरिकन अब्राहम लिंकन सतत निगराणीखाली आहे आणि जर ती इराणच्या क्षेपणास्त्र प्रणालीच्या टप्प्यात आली तर नौदलाकडून तिला लक्ष्य केले जाईल, असेही यामध्ये म्हटले होते.

तेहरानमधील वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांनी अमेरिकेचा हस्तक्षेप मोठ्या प्रमाणावर नाकारल्यानंतर हा नौदल इशारा देण्यात आला आहे. त्यांनी वॉशिंग्टनच्या काही दिवसापूर्वी झालेल्या राजनैतिक प्रयत्नांना केवळ देखावा असल्याचे म्हटले आहे.

### अमेरिकेकडे ताकद असती तर जिंकला असता..

■ इराणने ट्रम्प यांच्या युद्धविराम प्रयत्नांची खिल्ली उडवली आहे. इराणी लष्करी प्रवक्त्याने संदर्भ देत म्हटले की, अमेरिका मुळात स्वतःशीच वाटाघाटी करत आहे. इराणी लष्कराच्या खातम अल-अंबिया मध्यवर्ती मुख्यालयाचे प्रवक्ते, लेफ्टनंट कर्नल इब्राहिम झोल्फघारी यांनी हे विधान केले. ते म्हणाले, ज्या शक्तीचा तुम्ही एकेकाळी डंका पिटत होतात, तिचे आता अपयशामध्ये रूपांतर झाले आहे. तुम्ही स्वतःला जगातील महासत्ता म्हणवून घेता; तरीही, जर तुमच्याकडे खरोखरच तशी शक्ती असती, तर तुम्ही आतापर्यंत या पेचप्रसंगातून स्वतःची सुटका करून घेतली असती.

# सार्वजनिक कार्यक्रमात वंदे मातरम अनिवार्य नाही : सुप्रीम कोर्ट

## जेव्हा यासाठी शिक्षा होऊ लागेल, तेव्हा विचार करू

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

सुप्रीम कोर्टाने बुधवारी राष्ट्रीय गीत वंदे मातरम गाण्याबाबत गृह मंत्रालयाच्या परिपत्रकाविरुद्ध दाखल केलेली याचिका फेटाळली. न्यायालयाने म्हटले की, सार्वजनिक ठिकाणी आणि सार्वजनिक कार्यक्रमांसाठी जारी केलेले हे निर्देश बंधनकारक नाहीत. परिपत्रकाला आव्हान देणारी याचिका वेळेपूर्वीच दाखल करण्यात आली आहे.

हे प्रकरण सीजेआय न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची आणि न्यायमूर्ती विपुल एम पंचोली यांच्या खंडपीठासमोर होते. खंडपीठाने म्हटले की, गृह मंत्रालयाच्या सल्ल्यामध्ये वंदेमातरम न गायल्यास कोणत्याही प्रकारच्या शिक्षेची तरतूद नाही. खंडपीठाने म्हटले, हे दिशानिर्देश केवळ एक प्रोटोकॉल आहेत आणि त्यांचे पालन करणे बंधनकारक नाही.

जेव्हा याचिकाकर्त्याविरुद्ध दंडात्मक कारवाई केली जाईल, किंवा त्याला गाणे बंधनकारक केले जाईल, तेव्हा आम्ही या सर्व गोष्टींवर लक्ष देऊ. न्यायालय मोहम्मद सईद नूरी यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करत होते. सीजेआय म्हणाले, आम्हाला ती नोटीस दाखवा ज्यात तुम्हाला राष्ट्रीय गीत वाजवण्यासाठी भाग पाडले गेले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस | कांदा प्रश्न बाबत विधानभवनात बैठक

# कांदा उत्पादकांना मदत करण्यासाठी उपाययोजना करा

**मुंबई, वृत्तसंस्था :**

दरवर्षी कांद्याचा प्रश्न राज्यात उपस्थित होत असतो. या प्रश्नावर कायम स्वरुपी तोडगा काढण्याची गरज आहे. सद्यस्थितीत कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मदत करावी लागणार आहे. यासाठी कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव आणि पणन विभागाचे सचिव यांची समिती स्थापन करण्यात येईल. या समितीने शेतकऱ्यांना तातडीने करता येणाऱ्या उपायोजना सुचवाव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. कांदा प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्यासाठी यंत्रणांनी दीर्घकालीन पर्यायांची अंमलबजावणी करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिल्या.



कांदा प्रश्न बाबत विधान भवनात आयोजित बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, पणन मंत्री जयकुमार रावल, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, कांदा व्यापारामध्ये होत असलेले गैरप्रकार रोखणे आणि कांद्याचे निर्यात वाढवून कांद्याचे दर स्थिर ठेवणे आदी केंद्र शासनाशी निगडित विषयांबाबत केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांच्यासोबत बैठक घेण्यात येईल. दीर्घकालीन उपाययोजना बाबत चर्चा करण्यात येईल. कांद्याचे उत्पादन निश्चितच वाढले आहे. वाढत्या उत्पादनाला बाजारपेठ निर्माण करून देणे गरजेचे आहे.

### शेतकऱ्यांचे नुकसान थांबविणे गरजेचे

■ शेतकऱ्यांकडून व्यापारी कांदा घेऊन हा व्यापारीच कांदा नाफेड किंवा अन्य यंत्रणांना विक्री करीत असल्याचे निदर्शनास आलेले आहे. या प्रकारामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असून हे कायमस्वरूपी थांबविणे गरजेचे आहे. नाशिक, पुणे, अहिल्यानगर व सोलापूर या जास्त कांदा उत्पादक जिल्ह्यांमध्ये क्रॉप डायव्हर्सिफिकेशन करता येईल का याबाबतही समितीने पडताळणी करावी. येणाऱ्या खरीप हंगामातच हा प्रयोग करण्यात यावा. कांद्यामध्ये पण क्रॉप डायव्हरसिफिकेशन करणे गरजेचे आहे. यामध्ये वाणांची निवड, होणारे उत्पादन आदी बाबी निश्चितच तपासल्या पाहिजेत, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

# २०३५ पर्यंत एसटी ताफा पूर्णपणे इलेक्ट्रिक करणार

## परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती



**मुंबई, वृत्तसंस्था :**

राज्याच्या पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५' अंतर्गत २०३५ पर्यंत एसटी महामंडळाचा संपूर्ण बस ताफा इलेक्ट्रिक करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय शासनाने घेतला आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधान परिषदेत दिली.


प्रस्तावावर बोलताना मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, वाढते वायूप्रदूषण, इंधन दरातील चढ-उतार आणि जागतिक हवामान बदल यांचा विचार करता इलेक्ट्रिक वाहनांचा वापर ही काळाची गरज ठरली आहे. सुमारे १४ हजार बसचा ताफा असलेली एसटी ही ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी असून, या सेवेचे रूपांतर हरित ऊर्जेवर करण्याचा शासनाचा विचार आहे. इलेक्ट्रिक वाहन खरेदीसाठी कर सवलती देण्यात येणार असून, टोल माफीमुळे प्रवास खर्चात बचत होणार आहे.

### चार्जिंग स्टेशनसाठी सौर ऊर्जा वापरावर भर

■ चार्जिंग स्टेशनसाठी सौर ऊर्जेचा वापर करण्यावर विशेष भर देण्यात येणार असून, ऊर्जा निर्मितीपासून वापरापर्यंत संपूर्ण प्रक्रिया पर्यावरणपूरक करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. या निर्णयामुळे पर्यावरण संवर्धनास चालना मिळण्याबरोबरच एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीतही सुधारणा होईल. हरित ऊर्जेमुळे इंधन व देखभाल खर्चात बचत होऊन दीर्घकालीन टिकाऊपणा साध्य होणार आहे. ई-मोबिलिटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होऊन महाराष्ट्र देशात अग्रस्थानी राहील, असा विश्वासही मंत्री सरनाईक यांनी व्यक्त केला.

## शेती बनली हायटेक; व्यवस्थापन झाले सोपे

# १६ हजार शेतकरी करतात महाविस्तार ॲपचा वापर



**चिखली / प्रतिनिधी**

सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात सर्वच क्षेत्रांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वेगाने वापर होत आहे.शेती क्षेत्रही यात मागे नाही.कृषी विभागाच्या महाविस्तार एआय या मोबाईल ॲपमुळे शेतकरी हायटेक बनत असून शेती व्यवस्थापन अधिक सोपे आणि परिणामकारक झाले आहे. तालुक्यात आतापर्यंत सुमारे १५७८२ शेतकऱ्यांनी ॲप आपल्या मोबाईलमध्ये डाऊनलोड केले आहे.

ॲपमुळे उत्पादन वाढविण्यास मदत होत असल्याचे दिसून येत आहे.या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना बाजारभाव, खत व्यवस्थापन,कीड व रोग नियंत्रण,माती परीक्षण यासह विविध शेतीविषयक माहिती सहज उपलब्ध होत आहे. तसेच विविध पिकांवरील मार्गदर्शन करणारे व्हिडिओ देखील या ॲपमध्ये उपलब्ध आहेत. शासनाच्या विविध कृषी योजनांचे अर्ज भरण्याची सुविधा या ॲपमध्ये मोफत उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ व खर्च वाचत आहे. तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक गावात जनजागृती मोहीम राबविण्यात आल्या. या मोहिमेमुळे मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांनी ॲप डाऊनलोड करून त्याचा लाभ घेण्यास सुरुवात केली आहे. हे ॲप पूर्णपणे मराठीत असून वापरण्यास अत्यंत सोपे आहे. मला प्रश्न विचारा या सुविधेमुळे शेतकरी टायपिंग किंवा व्हाट्सअप मेसेज द्वारे आपले प्रश्न विचारू शकतात. कृषी विद्यापीठातील तज्ञाकडून तात्काळ उत्तरे मिळवू शकतात.

आजचे युग हे तंत्रज्ञानाचे आहे. आपणांस तंत्रज्ञान अवगत झाले पाहीजे तेंव्हाच आपण स्पर्धेत टिकु शकतो. शेती पारंपरीक पध्दतीने करण्यापेक्षा तंत्रज्ञानाची जोड दिल्यास मिळणारे उत्पन्न हे हमखास वाढते. तालुक्यातील शेतकऱ्यांनी तंत्रज्ञानाशी जुळवुन घेतले आहे. शेतकऱ्यांनी महाविस्तार ॲपचा वापर सुरु करुन विकासाच्या प्रक्रियेत सहभाग नोंदविला आहे. प्रत्येक शेतकऱ्याच्या मोबाईलमध्ये आता महाविस्तार ॲप दिसुन येत आहे.

> महाविस्तार ॲपमुळे शेतकऱ्यांसाठी मोठी सोय निर्माण झाली आहे.आता शेतीविषयक विविध योजनासाठी अर्ज घरबसल्या करता येतो. त्यामुळे वारंवार तालुक्याच्या ठिकाणी जाण्याची गरज पडत नाही. यामुळे वेळ आणि प्रवासाचा खर्च वाचतो.
> - विनोद लेंडे, शेतकरी

> महाविस्तार एआय ॲपमुळे शेती अधिक स्मार्ट,सुजाण आणि तंत्रज्ञानाधारित होत आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीला नवे बळ मिळत आहे.त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या महाविस्तार ॲपचा वापर करून शेतीमध्ये उत्पादन वाढवावे.
> - अशोक सुरडकर
> तालुका कृषी अधिकारी, चिखली

# गुंधा ग्रामपंचायतीचा 'टीबी मुक्त गाव' पुरस्काराने सन्मान

**लोणार / प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्यावतीने आयोजित कार्यक्रमात गुंधा ग्रामपंचायतीला टीबी मुक्त गाव हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल हा सन्मान देण्यात आला असून, संपूर्ण गावासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला आहे.

या कार्यक्रमाला सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी तसेच आरोग्य सेविका उपस्थित होत्या. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे गुंधा गावाने क्षयरोगमुक्तीचा टप्पा गाठला असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.गेल्या काही वर्षांपासून ग्रामपंचायत प्रशासनाने आरोग्य विभागाच्या सहकार्याने विविध जनजागृती मोहिमा राबवल्या. घराघरांत जाऊन तपासणी, रुग्णांचे वेळेवर निदान आणि उपचार, तसेच औषधोपचारात सातत्य राखण्यासाठी विशेष लक्ष देण्यात आले.



याशिवाय गावकऱ्यांना क्षयरोगाबाबत योग्य माहिती देऊन भीती आणि गैरसमज दूर करण्यात आले.आरोग्य सेविकांनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी रुग्णांचा नियमित फॉलोअप घेतला, औषधे वेळेवर घेण्याबाबत मार्गदर्शन केले आणि गावात स्वच्छतेबाबत जागरूकता निर्माण केली. ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनीही या उपक्रमांना सक्रिय पाठिंबा दिला.या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी ग्रामपंचायतीचे कौतुक केले आणि इतर गावांनीही गुंधा ग्रामपंचायतीचा आदर्श घेऊन टी.बी. निर्मूलनासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.टी.बी. मुक्त गाव हा पुरस्कार केवळ सन्मान नसून गावाच्या आरोग्यदृष्ट्या प्रगतीचे प्रतीक आहे.

## क्षयरोग दिन साजरा



**बुलढाणा :** शासकिय वैद्यकीय महाविद्यालयात जागतिक क्षयरोग दिनानिमित्त २४ मार्च रोजी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमारिता जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गुट्टे प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. प्रास्ताविकात सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. कैलास वाघ यांनी क्षयरोगाबाबत वैद्यकीय माहिती सोप्या भाषेत समजावून सांगितली. डॉ. वर्षा गुट्टे यांनी क्षयरोगाची स्थिती व उपाययोजनाबाबत माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात अधिष्ठाता डॉ. कैलास झिने यांनी वैद्यकीय महाविद्यालय व क्षयरोगावरील उपचार यांचा संबंध तसेच संशोधन याबाबत विचार व्यक्त केले. डॉ. स्नेहल वराडे यांनी संचालन केले. कार्यक्रमाचे नियोजन न्यायवैद्यकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. सुनिल विधाते यांनी पाहिले.

# विद्यार्थ्यांनी रागाचे व्यवस्थापन करण्याची सवय अंगीकारावी : कल्पना कांबळे

**बुलढाणा / प्रतिनिधी**

राग ही नैसर्गिक भावना असून त्यामुळे अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात.रागामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी त्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.तसेच राग टाळण्यासाठी विविध तंत्र आत्मसात करावे,असे प्रतिपादन नाशिक येथील समुपदेशक कल्पना कांबळे यांनी केले.

भारत विद्यालयात पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन करतांना ते बोलत होते. मोबाईल गेम व सोशल मीडिया यांचा आपल्या मनावर विपरीत परिणाम होत असून त्यापासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे व आपल्या भावनांचं व्यवस्थितपणे शेअरिंग करायला शिकावे असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. समाजामध्ये आपल्या भावना व्यक्त करण्यासाठी विद्यार्थ्यांना योग्य व्यासपीठ उपलब्ध करून देण्याची गरज



आहे,असेही त्यांनी सांगितले. भारत विद्यालयात सातत्याने विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी विविध तज्ञ मार्गदर्शकाचे मार्गदर्शन आयोजित केल्या जात आहे. त्याच उपक्रमातील एक भाग म्हणून समुपदेशक कल्पना कांबळे यांना निमंत्रित करण्यात आले होते. मार्गदर्शक कल्पना कांबळे यांचा परिचय मुख्याध्यापक प्रल्हाद गायकवाड यांनी करुन दिला. आभार पर्यवेक्षक नवल गवई यांनी मानले.या कार्यक्रमासाठी पत्रकार दीपक मोरे, अभिषेक वरपे, विद्यार्थी, शिक्षक यांची उपस्थिती होती.

# अनुराधा अभियांत्रिकीचे राष्ट्रीय स्तरावर यश

**बुलढाणा / प्रतिनिधी**

अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयाने पुन्हा एकदा राष्ट्रीयस्तरावर आपली छाप पाडली आहे. शेगाव येथील श्री संत गजानन महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे आयोजित 'नवन्मेष-२६' या राष्ट्रीय स्तरावरील तांत्रिक महोत्सवात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'सृजन हॅकाथॉन' स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

महाविद्यालयाच्या फोर-बाइट या संघाने दोन दिवसीय राष्ट्रीय स्तरावरील या स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण करत ११,००० रुपयांचे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह प्राप्त केले. देशभरातील विविध नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमधील तब्बल ११२ संघांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत कल्पकता, तांत्रिक अचूकता आणि सादरीकरण कौशल्य यांच्या बळावर अनुराधा



अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली.

प्राचार्य डॉ. अरूण नन्हई म्हणाले की, अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत मिळवलेले हे यश अत्यंत अभिमानास्पद आहे. 'सृजन हॅकाथॉन'मध्ये उपविजेतेपद पटकावणे ही केवळ स्पर्धेतील कामगिरी नसून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेची, तांत्रिक प्रावीण्याची आणि सातत्यपूर्ण परिश्रमांची पावती आहे. डॉ.राजेंद्र कोकाटे, डॉ. आर. बी. मापारी, विभाग प्रमुख डॉ. अविनाश कापसे तसेच विभाग प्रमुख प्रा. प्रमोद तळोले यांनी विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्याचे आणि कल्पकतेचे कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशामुळे अनुराधा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असुन गुणवंत विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# डॉ.संजीवनी गायकवाड यांना पदवी प्रदान

**बुलढाणा / प्रतिनिधी**

नागपूर येथील स्व.दादासाहेब काळमेघ स्मृती डेंटल कॉलेज आणि हॉस्पिटल येथे आयोजित पदवी वितरण समारंभात डॉ.संजीवनी गायकवाड यांना दंतशास्त्र विषयात पदवी प्रदान करण्यात आली. मानचिन्ह, पदक, सन्मानपत्रक आणि पारंपरिक शाल देऊन गौरविण्यात आले.

वैद्यकीय व्यवसायाची पवित्र शपथही देण्यात आली. या गौरवशाली क्षणी अधिव्याख्याता डॉ. आशिष लांजेकर आणि विभागप्रमुख डॉ. स्नेहा पुरी यांच्या हस्ते हा सन्मान प्रदान करण्यात आला.डॉ.संजीवनी या वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या संजय गायकवाड आणि जिल्हा परिषद महिला कर्मचाऱ्यांच्या नेतृत्वात महत्त्वाची भूमिका निभावणाऱ्या पुष्पा संजय गायकवाड यांच्या सुपुत्री आहेत. कुटुंबातूनच मिळालेली सेवाभावाची प्रेरणा आणि जिद्दीच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले आहे. केवळ शैक्षणिक



क्षेत्रातच नव्हे, तर क्रीडा क्षेत्रातही त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धेत सहभाग घेऊन त्यांनी अनेकवेळा जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे. त्यांचे हे सर्वांगीण व्यक्तिमत्त्व त्यांच्या मेहनतीचे आणि चिकाटीचे उत्तम उदाहरण आहे. आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय ते आई-वडिलांना आणि शिक्षकांना देतात.




### राशीभविष्य

- **मेष** : संततीचा हट्ट पुरवणे त्रासदायक होईल. कोणालाही दुखवू नका. मन अस्वस्थ राहील.
- **वृषभ** : आर्थिक पातळी उंचावेल. नैराश्य दूर होईल. कार्यक्षेत्रात उत्साही वातावरण असेल.
- **मिथुन** : विरोधक वरचढ होतील. चिडचिड वाढेल, कुणाकडूनही मोठ्या अपेक्षा ठेऊ नका.
- **कर्क** : नकारात्मक विचार दूर करा. देणी रक्कम देऊन टाकाल. मोठी कामं मार्गी लागतील.
- **सिंह** : व्यवहारात सावध रहाणं आवश्यक. विचित्र ताण येण्याची शक्यता. मन विचलीत होईल.
- **कन्या** : मोठी आर्थिक उलाढाल होईल. नोकरीत बढती मिळेल. भावी काळासाठी तरतूद कराल.
- **तूळ** : घरातील परंपरा मोडू नका. चीजवस्तू, कागदपत्रे सांभाळा. मतभेदाला थारा देऊ नका.
- **वृश्चिक** : प्रयत्नांची दिशा नक्की कराल. प्रेमळ माणसांचा सहवास लाभेल. यशाकडे वाटचाल कराल.
- **धनु** : मनाविरुद्ध काही निर्णय घ्यावे लागतील. तडजोडीचा मार्ग स्वीकारा. मन शांत राहील.
- **मकर** : अपेक्षाभंगाचा त्रास होईल. आर्थिक व्यवहारात सावधान रहा. वाहन सावकाश चालवा.
- **कुंभ** : महत्त्वाची कामं पूर्ण होतील. सरकारी कामात यश मिळेल. आवडती माणसं भेटतील.
- **मीन** : परिस्थिती कौशल्याने हाताळाल. संततीकडून शुभवार्ता. सहकाऱ्यांची उत्तम साथ मिळेल.

### २६ मार्च — दिनविशेष

- १९९७ : ज्येष्ठ गांधीवादी आणि उद्योगपती नवकमल फिरोदिया यांचा मृत्यू.
- २०१५ : विश्वकरंडक स्पर्धेमध्ये भारताचा ऑस्ट्रेलियाकडून पराभव.
- २०१६ : 'स्टिंग ऑपरेशन'मुळे उत्तराखंडचे मुख्यमंत्री हरीश रावत अडचणीत.
- २०१७ : राजकीय पक्षांसाठी 'नो ड्यूज' चा प्रस्ताव.
- २०१८ : अमेरिकेने सात पाकिस्तानी कंपन्यांना आपल्या देशात व्यवसाय करण्यास बंदी घातली.

### काळजी घ्या — धोका लक्षात घ्या

तुम्हाला व्हिडिओ गेम खेळण्याचा शौक असेल तर आधी त्यातील सुरक्षा व्यवस्थेची माहिती घ्या. आजचे व्हिडिओ गेम कॅसेट किंवा सीडीवरून नव्हे तर ऑनलाइन खेळले जातात. दोन खेळाडू किंवा मल्टीप्लेअर गेममध्ये, वेगवेगळ्या देशांतील लोक एकत्र खेळतात. अशाप्रकारे गेम खेळण्यात खूप मजा येत असली तरी त्यामध्ये व्हायरस, माहितीची चोरी आणि फिशिंग हल्ल्यांचे धोकेदेखील आहेत. त्यामुळे असे खेळ सावधगिरीने खेळणे चांगले.



✻ वेगवेगळ्या गेम्समध्ये वापरकर्तांचे नाव आणि पासवर्ड समान वापरल्याने लॉगिन करणे सोपे होते. पण ही बाब हॅकर्सना अकाऊंट हॅक करण्यासाठी अधिक सोपी ठरते. म्हणून पासवर्ड आणि वापरकर्त्याचे नाव बदलत रहा. ✻ हॅकर्स गेमरची नाव, घराचा पत्ता, फोन नंबर किंवा इतर ओळख काढू शकतात आणि ती ऑनलाइन सार्वजनिक करू शकतात. हे गुंडगिरी किंवा अपमान करण्याच्या हेतूने देखील केले जाऊ शकते. त्यामुळे हा धोका लक्षात घ्या.✻ कधीकधी गेमर प्ले स्टोअरवर आवडत्या व्हिडिओ गेमच्या स्वस्त आणि विनामूल्य आवृत्त्या शोधतात. ती डाउनलोड करतात तेव्हा मात्र मालवेअर आणि व्हायरसही डाउनलोड होण्याचा धोका असतो. याशिवाय जे गेम प्रतिबंधित आहेत किंवा महागडे गेम जे प्ले स्टोअरवरून डाउनलोड केले जात नाहीत आणि थर्ड पार्टी सेलर किंवा लिंक्सच्या मदतीने इन्स्टॉल केले जातात, त्यांनाही व्हायरसचा धोका असतो. हे लक्षात घ्या.

### सफर देशांची — डोंगराळ ताजिकिस्तान

ताजिकिस्तान हा मध्य आशियातला चारही बाजूंनी जमिनीने वेढलेला देश आहे. सध्याचा रशिया म्हणजे जुन्या 'सोव्हियत युनियन'पासून स्वतंत्र झाल्यानंतर या देशात लढाईला सुरूवात झाली. ताजिकिस्तान त्यातून अजूनही सावरलेला नाही. या परिसरातला हा अगदी गरीब देश आहे. डोंगराळ प्रदेश आणि भरपूर खोरी असलेल्या या देशाच्या सीमा चीन, पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि इराणशी जोडल्या गेल्या आहेत. या देशात कापूस खूप मोठ्या प्रमाणावर पिकतो. या देशाच्या सीमांचं रक्षण रशियाचे सैनिक करतात. 'ताजिक' ही इथली अधिकृत भाषा. 'दुशांबे' ही या देशाची राजधानी. 'दुशांबे' म्हणजे ताजिक भाषेत सोमवार. दर सोमवारी बाजार भरत असलेल्या गावाचं रुपांतर पुढे शहरात झाल्याने या ठिकाणाला 'दुशांबे' हे नाव मिळालं. ताजिकिस्तानमध्ये भरपूर उन्हाळा तर सौम्य स्वरूपाची थंडी असते. इथल्या खोऱ्यांमधून नद्या वाहत असतात. त्यामुळे इथे नैसर्गिक सौंदर्य अनुभवता येईल. 'काराकुल' हा इथला खूप जुना तलाव आहे. या तलावाची निर्मिती काही लाख वर्षांपूर्वी झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

### रसगंधा — रुचकर शांतिनिकेतन डाळ

तुम्हाला प्रांतोप्रांतीच्या रुचकर डिशेस बनवायला आहेत का? चला तर, आज बंगाली खाद्यसंस्कृतीत महत्त्वपूर्ण स्थानी असणारी शांतिनिकेतन डाळ कशी बनवायची ते पाहू.

**साहित्य:** एक वाटी मसूर डाळ, एक छोटा कांदा, दोन ते तीन लसूण पाकळ्या, फोडणीसाठी मेथी, जिरं, मोहरी, बडीशेप आणि कलौंजी, एक सुकी मिरची, मोहरीचं तेल, चवीनुसार मीठ इत्यादी.

**कृती:** सर्वप्रथम चिमुटभर हळद आणि दोन वाट्या पाणी घेऊन त्यात डाळ शिजत ठेवावी. दुसरीकडे लसूण ठेचून तर कांदा उभा चिरुन घ्यावा. डाळ शिजत आली की कढईत फोडणी करावी. त्यासाठी मोहरीचं तेल गरम करावं. चांगलं गरम झाल्यावर त्यात मेथ्या, जिरं, मोहरी, बडीशेप आणि कलौंजी घालावी. सुक्या मिरचीचे तुकडे टाकावे. ते तडतडले की त्यात लसूण आणि कांदा घालून चांगला परतून घ्यावा. शिजलेल्या डाळीवर हा तडका द्यावा आणि चवीनुसार मीठ घालून एक उकळी येऊ द्यावी. ही डाळ भात अथवा पोळीबरोबर सर्व्ह करावी.

### पंचांग

**गुरुवार, २६ मार्च २०२६**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
चैत्र शु. ८ **(श्रीराम नवमी)**,
चंद्रराशी : मिथुन,
नक्षत्र : आर्द्रा, योग : शोभन,
सूर्योदय ६.४०, सूर्यास्त ६.४९

### फॉरवर्ड्स

**लहरें तों बहुत सीं टकरायेंगी तुमसें लेक़िन...**

**तुम बहना उसीं क़े साथ जिसमें दूर तक़ जानें क़ा जूनून हों...!**

### वेगळ्या वाटा

✻ वाचनाच्या आवडीसह कल्पकता असेल तर 'स्लोगन रायटिंग' आणि आकर्षक हेडिंग्ज तयार करून 'कॉपी रायटिंग'च्या क्षेत्रात हात आजमावता येईल. ✻ प्रकाशनाच्या क्षेत्रात अनेक संधी आहेत. ✻ पत्रकारितेचा अभ्यासक्रम पूर्ण करून वृत्तपत्रात नोकरी करता येईल. या कामाला सध्या बरंच वलय आहे. या क्षेत्रात येण्यासाठी वाचनाची आवड महत्त्वाची ठरते. ✻ वकिलांनाही भरपूर वाचन करावं लागतं. सतत कायदे अभ्यासाचे लागतात.सर्वोच्च तसंच उच्च न्यायालयाचे निकाल वाचावे लागतात. त्यामुळे वाचनाची आवड इथे तारून नेऊ शकते.

### करिअरवाटा — व्हा व्यापारतज्ज्ञ

जग एक खेडं बनलेलं असताना, जगभर आस्थापनांच्या शाखा विकसित होत असताना त्यांचे व्यवहार हाताळण्यासाठी व्यावसायिक व्यवहारांची जाण असणाऱ्या कुशल कर्मचाऱ्यांची गरज असते. त्यामुळेच इंटरनॅशनल बिझनेस या विषयात एमबीए करुन तुम्ही नानाविध संधी मिळवू शकता.



✻ इंटरनॅशनल बिझनेसच्या अभ्यासक्रमात आंतरराष्ट्रीय व्यवसायासंबंधीची विविध कौशल्यं शिकवली जातात. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर परदेशात व्यवसाय वाढवण्यासाठी गरजेचं ठरणारं सगळं ज्ञान मिळू शकतं. ✻ इंटरनॅशनल बिझनेस या विषयात एमबीए केल्यानंतर विमान वाहतूक कंपन्या आणि रेस्तराँमध्ये तुम्हाला संधी मिळू शकते. यासोबत सरकारी कंपन्या आणि एनजीओही या क्षेत्रातल्या तज्ज्ञांना संधी देतात. देशी-विदेशी बँका, पर्यटन कंपन्या, हॉस्पिटॅलिटी आदी क्षेत्रांमध्ये चांगली पॅकेजेस मिळू शकतात. ✻ या क्षेत्रात तगडं पॅकेज मिळू शकतं. ✻ इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ फॉरेन ट्रेड, जेके बिझनेस स्कूल, एशियन स्कूल ऑफ बिझनेस मॅनेजमेंट, सिंबायोसिस इन्स्टीट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट यासारख्या संस्थांमध्ये तुम्ही इंटरनॅशनल बिझनेसचे धडे घेऊ शकता.

### खेचाखेची — कॉलर ट्यून

सरपंचांला सकाळी ६ वाजता एका मुलीचा फोन येतो...

**सरपंच:** हॅलो, कोण आहे?

**मुलगी:** हम तेरे बिन अब रह नही पाते, तेरे बिना क्या वजूद मेरा...

**सरपंच:** (एक्साइट होऊन) कोण आहे ?

**मुलगी:** तुझसे जूदा गर हो जायेंगे, खूदसे ही हो जायेंगे जुदा...

**सरपंच:** (डोळ्यातून पाणी) खरंच? माझ्याशी लग्न करशील का?

**मुलगी:** ... इस गाने को अपनी कॉलर ट्यून बनाने के लिए ८ दबाएं।

### वेगळं काही

एका इलेक्ट्रिक कार चालकाने लोकांच्या सहकार्याने तीन वर्षांत ९० हजार किलोमीटरचा प्रवास केला. शून्य कार्बन उत्सर्जनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने विब वेकर मार्च २०१६ मध्ये घराबाहेर पडला. तेव्हा त्याच्याकडे पुरेसा पैसा नव्हता. मधल्या काळात इलेक्ट्रिक कारच्या दुरुस्तीसाठी त्याने २० हजार युरो म्हणजे जवळपास १५,६२,००० रुपये खर्च केले. विबने यापैकी काही पैसे लोकांच्या मदतीने तर काही काम करून मिळवले. या इलेक्ट्रिक कारमधून विबने नॉर्वे ते इराण आणि म्यानमार ते संयुक्त अरब अमिरात असा प्रवास केला. या प्रवासाची अखेर ऑस्ट्रेलियातल्या सिडनीमध्ये झाली. या प्रवासाचा नेमका खर्च सांगणं कठीण असल्याचं विब सांगतो.

### हेअर केअर — चलती ब्लॅकबेरी शेडची

एकेकाळी काळेभोर केस हे सौंदर्याचं लक्षण मानलं जात असे. आता मात्र केसांवर विविध रंगाचे कलर्स लावले जातात. या छटा केसांचं सौंदर्य खुलवतात



त्याचप्रमाणे पांढरे केसही लपवतात. अर्थात हे रंग आकर्षित करणारे असले तरी ते वापरताना बरीच काळजी घ्यावी लागते. मात्र फारशी काळजी घेण्याची गरज नसणारेही काही रंग आहेत. त्यात ब्लॅकबेरी शेडचा समावेश होतो. सध्या ब्लॅकबेरी हेअर कलरची चलती आहे. या रंगाची फारशी देखभाल करावी लागत नाही. त्याचा बेस तयार करण्यासाठी घातक रसायनांची गरज लागत नाही. ब्लीचिंगसाठी केसांच्या मुळांपर्यंत जावं लागत नाही. त्वचेच्या रंगानुसार यातील योग्य शेडची निवड केली जाते. बरेच हेअर स्टायलिस्ट हा रंग कस्टमाइज करून देतात. ब्लॅकबेरी आणि ब्लू या रंगसंगतीमुळे वेगळा लूक मिळतो. हा रंग प्रभाव पाडतो. केस पूर्णपणे हायलाईट करण्यापेक्षा बटांना हा रंग दिला असता खुलून दिसतो. नैसर्गिक काळ्या केसांऐवजी ब्लॅकबेरी बेस्ट ठरतो. त्यामुळे केस रंगवायच्या विचारात असाल तर ब्लॅकबेरीची निवड करा. हा रंग तुमच्या व्यक्तिमत्त्वाची शान अनेक पटींनी वाढवेल याची खात्री बाळगा.

दैनिक महाभूमि
गुरुवार । २६ मार्च २०२६
dainikmahabhoomi@gmail.com

# बुलढाणा भूमि

## जिल्हा परिषदेचा ४१.२३ कोटींचा अर्थसंकल्प मंजूर

# आरोग्य, शिक्षणासाठी मुठभर; बांधकामासाठी ताटभर निधी!




**बुलढाणा/प्रतिनिधी**

ग्रामीण विभागाचे मिनी मंत्रालय असलेल्या जिल्हा परिषदेचा २०२५-२६ चा सुधारित व सन २०२६-२७ चा ४१ कोटी २३ लाखांचा मूळ अर्थसंकल्पाला बुधवार २५ मार्च रोजी जिल्हा परिषदेच्या सामान्य सभेत मंजूरात देण्यात आली. मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रकाश राठोड यांनी अर्थसंकल्प सादर केला तर मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक गुलाबराव खरात यांनी त्यास मंजुरी दिली. अर्थसंकल्पामध्ये आरोग्य, शिक्षण, पाणी यासारख्या महत्वाच्या गरजांकडे दूर्लक्ष करण्यात आले असून बांधकाम विभागासाठी मात्र घसघशीत निधीची तरतूद करण्यात आल्याने ' आरोग्य व शिक्षणासाठी मूठभर तर, बांधकामासाठी ताटभर निधी' अशा शब्दात या अर्थसंकल्पाची चर्चा होत आहे.

जिल्हा परिषदेच्या श्री शिवाजी सभागृहात हा अर्थसंकल्प मांडण्यात आला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब मोहन, प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा) कोल्हे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष पवार, शिवशंकर भारसाकळे, प्रमोद एंडोले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गीते, जिल्हा कृषी विकास अधिकारी अंगाईत, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. हा अर्थसंकल्प मुद्रांक शुल्क अनुदान, जमीन महसूल अनुदान, गुंतवणुकीवरील व्याज व इतर उत्पन्न यांचा विचार करून तयार करण्यात आला असून, जिल्हा परिषदेच्या गुंतवणुकीवरील व्याजातून उत्पन्नात वाढ झाल्याने यंदाचा अर्थसंकल्प वाढीव आहे. शासन नियमांनुसार खर्चात समाज कल्याणासाठी २० टक्के, महिला व बाल कल्याणासाठी १० टक्के, देखभाल-दुरुस्ती २० टक्के, दिव्यांग कल्याण ५ टक्के, शाळा दुरुस्ती ५ टक्के, समृद्ध पंचायत अभियान १० टक्के व ई-गव्हर्नन्ससाठी ०.५ टक्के निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या अर्थसंकल्पात राजमाता जिजाऊ जयंती, संत चोखामेळा जयंती, पातुर्डा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पदस्पर्श सोहळा, सैलानी यात्रा आदी सामाजिक-सांस्कृतिक उपक्रमांसाठीही निधी राखीव ठेवण्यात आला आहे. या अर्थसंकल्पाद्वारे ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

### अर्थसंकल्पातील ठळक योजना

- 'सीईओ संग्राम योजना' अंतर्गत १०० संवेदनशील ग्रामपंचायतींसाठी ५१ लाखांचा प्रोत्साहन निधी
- 'मिशन ' अंतर्गत गुणवंत विद्यार्थ्यांसाठी ५० लाखांची तरतूद; १०० विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी व वैद्यकीय प्रवेशासाठी कोचिंग.
- विधवा, परित्यक्ता व एकल महिलांसाठी सहाय्य अनुदान योजनेसाठी ५० लाख
- बायोगॅस योजनेसाठी ४० लाख; १३ तालुक्यांतील सुमारे १३० लाभार्थ्यांना फायदा.
- २९३ अर्धवेळ स्त्री परिचारिकांसाठी गणवेश व भाऊबीज भेटीसाठी ६ लाखांची तरतूद.
- दिव्यांग कल्याणासाठी ८५ लाख तर मागील अनुशेषासाठी २.०८ कोटींची तरतूद.

### अशा आहेत विभागनिहाय तरतूदी

| विभाग | निधी |
|---|---|
| बांधकाम | ६.७३ कोटी |
| शिक्षण | ३.५८ कोटी |
| सार्वजनिक आरोग्य | ५९ लाख |
| ग्रामीण पाणीपुरवठा | ४.०५ कोटी |
| महिला व बाल कल्याण | १.१२ कोटी |
| समाज कल्याण | २.०६ कोटी |
| दिव्यांग कल्याण | ८५ लाख (अनुशेष २.०८ कोटी) |
| कृषी | ८१ लाख |
| पशुसंवर्धन | ६४ लाख |
| सामान्य प्रशासन | २.९० कोटी |
| वित्त | ७१ लाख |
| पंचायत | ४.३१ कोटी |
| लघु पाटबंधारे | १.८१ कोटी |

## एलसीबीच्या कारवाईत ११ किलो अफूची झाडे जप्त



**अंढेरा/प्रतिनिधी**

पोलीस स्टेशन हद्दीतील मेरा खुर्द येथील शेतशिवारात अवैधरित्या सुरू असलेल्या अफूच्या शेतीवर एलसीबी पथकाने मोठी कारवाई करत ११.४७९ किलो अफूची झाडे जप्त केली असून त्याची अंदाजे किंमत ९ लाख १८ हजार ३२० रुपये इतकी आहे. या प्रकरणी कृष्णा रामहरी वाघमारे वय २६, रा. मेरा खुर्द याच्यावर एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे स्थानिक पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

२४ मार्च रोजी रात्री उशिरा स्थानिक गुन्हे शाखेचे पथक देऊळगाव राजा विभागात गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार वरिष्ठांच्या परवानगीने मेरा खुर्द येथील गट क्रमांक २०३ मधील शेतावर छापा टाकण्यात आला. शेतात वांग्याच्या पिकामध्ये लपवून ठेवलेली अफूची झाडे आढळून आली. पंचांसमक्ष झाडे उपटून जप्त करण्यात आली असून तीन नमुन्यांमध्ये वजन करण्यात आले. या प्रकरणी एनडीपीएस कायद्याच्या कलम ८(क), १८(क) अन्वये अंढेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**पोलीसांच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह**

- अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत यापूर्वीही शेतामधून अफू व गांजाची लागवडचे प्रकार एलसीबीने उघडकीस आणून कारवाई केली आहे. या भागात इतक्या मोठ्या प्रमाणात अफूची शेती सुरु असताना अंढेरा पोलीस स्टेशनला याची माहिती कशी नव्हती ?असा प्रश्न उपस्थित होत आहे.

## दखल...

**राम राज्य..!**

रामनवमीच्या मुर्हूतावर
संकल्प आपण करू
रामायणातील जीवन तत्वे
थोडी तरी अंगीकारू ... !

रामायण कथा आदर्श
मानवी जीवनाचे दर्पण
घेऊन त्यापासून बोध
ठेवू या आपले वर्तन ...

रामराज्य होईल साकार
जर राजा व प्रजेने
रामायणातील तत्वांचा
मनस्वी केला स्विकार ...!

**प्रा. अशोक सारडा, मेहकर.**
**( ९४२१३९४३३९ )**

## शासनाकडून केरोसीन मिळण्याचे संकेत ; लाखो स्टोव्ह कुठून आणणार ?

**डोणगाव/प्रतिनिधी**

पश्चिम आशियातील युध्दामुळे देशभर गॅस टंचाई निर्माण झाली आहे. व्यावसायिक गॅस पुरवठा बंद झाला असून स्वयंपाकासाठी लागणारा गॅस सुद्धा मुश्किलीने मिळत आहे. यावर तोडगा म्हणून शासनाने केरोसीनचा पर्याय निवडला असून त्यावर पुरवठा विभागाचे काम सुरू आहे. जिल्हयात विविध योजनांचे ५ लाख ९४ हजार शिधापत्रिका धारक आहेत. त्यामुळे केरोसीन जरी आले तरी लाखो स्टोव्ह कुठून आणणार ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

पुरवठा विभागाकडून जिल्ह्याभरातील १५२५ किरकोळ केरोसीन विक्रेत्यांशी संपर्क केला जात आहे. त्यांचे केरोसीन परवाने नूतनीकरण करून घेणे सुरू आहे. केरोसीन मिळाले तर ते केरोसीन ग्राहकांना वितरित करण्यासाठी कोणत्या उपाय योजना आहेत. सोबतच केरोसीन घेण्यासाठी किरकोळ विक्रेत्यांकडे तेवढया क्षमतेच्या टाक्या आहेत का ? याची माहिती सुद्धा घेतली जात आहे. २०१८ पासून केरोसीन पूर्णतः बंद झाले. केरोसीन दुकानदाराकडे केरोसीन आणण्यासाठी बारदाना नाही, तो खरेदी करायचा म्हणजे शासन नेहमीसाठी केरोसीन देणार



का ? जर शासन नेहमीसाठी केरोसीन देणार असेल तर बारदाना घ्यायला परवडेल अन्यथा बारदाना घेऊन काय काम असे सुद्धा काही दुकानदार म्हणत आहेत. डोणगाव येथील केरोसीन स्टोव्ह विक्रेते गफ्फार भाई डाग वाले यांच्याशी याबाबत चर्चा केली असता त्यांनी सांगितले की लोकांची मागणी पाहता आम्ही काही प्रमाणात स्टोव्ह बोलावलेले आहेत जर मागणी वाढली तर अजून सुद्धा बोलावू. तीन लिटरच्या स्टोव्हची किंमत ८०० तर पाच लिटरचा एक हजार रुपये अशा स्टोव्हच्या किंमती आहेत. असे ते म्हणाले.

## शिक्षकांची उपक्रमशीलता म्हणजे सृजनशील संशोधन : सीईओ गुलाब खरात

**बुलढाणा/प्रतिनिधी**

जिल्हा परिषद शिक्षकांमध्ये असलेली नावीन्यपूर्ण उपक्रमशीलता हे संशोधनात्मक सृजनशीलतेचे स्वरूप असून या माध्यमातून आगामी शैक्षणिक सत्रात बुलढाणा जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांचे रूप पालटल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी व्यक्त केला.

समग्र शिक्षा अंतर्गत स्थानिक जिल्हा नियोजन सभागृहात बुधवारी झेप - झेडपीज एज्युकेशनल पायोनियर या आगळ्या वेगळ्या संकल्पनेतून जिल्ह्यातील १५०




नाविन्यपूर्ण उपक्रमशील शिक्षकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी मंचावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी बी. एम. मोहन, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य डॉ. जगराम भटकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील, माध्यमिक शिक्षणाधिकारी अनिल आकाळ, योजना विभागाच्या शिक्षणाधिकारी डॉ. वैशाली ठग, ज्येष्ठ अधिव्याख्याता डॉ. मारुती गायकवाड, व्याख्याते गजानन राऊत. उपशिक्षणाधिकारी अनिल देवकर, शेख अकिल आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्राथमिक शिक्षणाधिकारी विकास पाटील यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये गुणात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला.

## न्यूज ब्रीफ

### पंधरादिवसाआड पाणी पुरवठा; नागरिक त्रस्त

**चिखली :** शहरातील इतर भागात आठ ते दहा दिवसांनी पाणीपुरवठा होत असताना प्रभाग ६ मध्ये १४ ते १५ दिवसांनी पाणीपुरवठा करण्यात येतो. त्यामुळे नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या संदर्भात काँग्रेसच्या नगरसेविका शितल संतोष देशमुख यांनी नगराध्यक्षांना निवेदन दिले आहे. निवेदनात नमूद आहे की, प्रभाग ६ मध्ये पाणीपुरवठा अत्यंत अनियमित असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. विशेष म्हणजे शहरातील इतर काही भागांमध्ये आठ ते दहा दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा केला जात असताना प्रभाग सहाला मात्र १४ ते १५ दिवस प्रतीक्षा करावी लागते.

## अवैध रेती वाहतूक करणाऱ्या दोन वाहनावर ४ लाख १० हजार रुपये दंड

**लोणार/प्रतिनिधी**

मराठवाड्यातून अवैध रेती वाहतूक करणाऱ्या दोन वाहनांवर लोणार तहसीलदार भूषण पाटील यांनी कारवाई करत ४ लाख १० हजार रुपयांचा दंड ठोठावला.

२१ मार्च रोजी मराठवाडयातील एका रेती घाटावरून अवैद्य रेती वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती तहसीलदार भूषण पाटील यांना मिळाली. त्यांनी तात्काळ आपले सहकारी निवासी नायब तहसीलदार रामप्रसाद डोळे, महसूल अधिकारी मंदार तनपुरे, सचिन शेवाळे यांना सोबत घेत लोणार- मंठा रोडवरील देऊळगाव कुंडपाळ फाट्याजवळ गाडी क्रमांक एम एच २१ बीएच ९४ २२ या वाहनाची तपासणी करत असताना वाहनात अवैध रेती आढळून आली. सदर वाहन तात्काळ लोणार पोलीस स्टेशनला जमा करण्यात आले. शरद सुरेश खंदारे रा. कानडी ता. मंठा जिल्हा जालना यांच्या मालकीचे हे वाहन असल्याचे निष्पन्न झाले तर दुसरे वाहन क्रमांक एम एस ३७ ११ ८७ हे गजानन आसाराम घुगे रा. बोराखेडी यांच्या मालकीचे असल्याचे समजले. या वाहनातून तीन ब्रास अवैध रेती वाहतूक केली जात असताना रायगाव जवळ हे वाहन जप्त करण्यात आले. यातील एका वाहनावर १ लाख ४४ हजार रुपये तर दुसऱ्या वाहनावर २ लाख ६६ हजार असा दंड ठोठावण्यात आला.

## कंत्राटी भरती प्रक्रियेत एससी, एसटी प्रवर्गासाठी आरक्षणाची मागणी

**बुलढाणा/प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये सुरू असलेल्या कंत्राटी भरती प्रक्रियेत एससी-एसटी प्रवर्गासाठी आरक्षण लागू करण्यात यावे, अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडीयाच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात नमूद आहे की, राज्यातील विविध शासकीय विभागांमध्ये रिक्त पदांसाठी कंत्राटी पद्धतीने भरती प्रक्रिया राबविली जात आहे. विशेषतः शासकीय रुग्णालयांतील सुरक्षा रक्षक, तांत्रिक कर्मचारी तसेच साफसफाई कामगार अशा विविध पदांसाठी खाजगी मनुष्यबळ



पुरवठा करणाऱ्या कंपन्यांमार्फत भरती केली जात आहे. ही भरती साधारणत ११ महिन्यांच्या कंत्राटावर आधारित असते. मात्र, या कंत्राटी भरती प्रक्रियेत एससी-एसटी प्रवर्गातील उमेदवारांना आरक्षणाचा लाभ दिला जात नसल्याचा आरोप रिपाइं आठवले गटाने केला आहे. भारतीय संविधानात नमूद केलेल्या आरक्षणाच्या तरतुदींचे उल्लंघन होत असून, यामुळे मागासवर्गीय उमेदवारांवर अन्याय होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निवेदन देतेवेळी रिपाइंचे जिल्हा संपर्क प्रमुख बाबासाहेब जाधव, भैय्यासाहेब पाटील , जिल्हा उपाध्यक्ष दिलीप काकडे, रामदास कहाळे , अल्पसंख्याक आघाडी प्रमुख नवाब मिर्झा बेग यांच्यासह आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## हिवरा नाईक येथे जागेच्या वादातून हाणामारी

**चिखली/प्रतिनिधी**

तालुक्यातील हिवरा नाईक येथे जागेच्या वादातून दोन गटात हाणामारी झाल्याची घटना घडली असून एका कुटुंबाला लाठ्या काठ्यांनी बेदम मारहाण करण्यात आली. याप्रकरणी अमडापूर पोलीस स्टेशनला चार जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हिवरा नाईक येथील रहिवासी बाळू दशरथ ढगारी वय ३६ यांचा भाऊ आणि आरोपी यांच्यात जागेचा जुनावाद आहे. या वादातून आरोपी बंडू सुखदेव शिंदे हा फिर्यादीच्या भावाच्या जागेत खड्डे खोदून खांब उभे करत होता. आपल्या भावाच्या मालकीच्या जागेत अतिक्रमण होत असल्याचे पाहून बाळू ढंगारी यांनी आरोपीला हटकले. आणि आमच्या भावाच्या जागेत खड्डे खोदू नका, असे सांगितले. मात्र या गोष्टीचा राग मनात धरून आरोपीने वाद घालण्यास सुरुवात केली. हा वाद इतका विकोपाला गेला की बंडू शिंदे यांच्या सह संदीप बंडू शिंदे, कडबा सुखदेव शिंदे, आणि लक्ष्मण कडूबा शिंदे या सर्वांनी मिळून फिर्यादी बाळू ढंगारी व त्याच्या नातेवाईकांना लाट्या-काठ्या आणि टीकासाच्या दांड्याने फिर्यादी व त्याच्या कुटुंबातील सदस्यांना जबर मारहाण केली. केवळ मारहाण करूनच आरोपी थांबले नाही तर त्यांनी फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली. या घटनेनंतर जखमी अवस्थेत बाळू ढंगारी यांनी अमडापूर पोलीस स्टेशन गाठून घडलेली घटना सांगितली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेचे कलम ११८ (१) ३५१ (२) ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### प्रियदर्शी सम्राट अशोक जन्मोत्सव समितीचे आयोजन

# 'अखंड भारताचे निर्माते सम्राट अशोक'

**बुलढाणा/प्रतिनिधी**

प्रियदर्शी सम्राट अशोक यांनी उभे केलेले विशाल साम्राज्य हे कष्टकरी बहुजन समाजाच्या हिताचे व सुखाचे होते. भारतात सर्वप्रथम पशुंसाठी दवाखाने गोशाळा उभे करणारे सम्राट, दळणवळणासाठी जगातील सर्वात लांब रस्ता व हायवे बनवणारे पहिले सम्राट. माझी प्रजा ही माझे पुत्र आहे असे म्हणून विशाल साम्राज्याचा कारभार सांभाळणारे प्रियदर्शी चक्रवर्ती सम्राट अशोक यांनी जम्मू-दीपाची निर्मिती केली व अखंड भारत तयार केला असे प्रतिपादन सप्त खंजिरी वादक राष्ट्रीय प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांनी केले.




प्रियदर्शी सम्राट अशोक यांच्या २३३० व्या जयंतीच्या निमित्ताने प्रियदर्शी सम्राट अशोक जन्मोत्सव समितीच्या वतीने मंगळवारी सत्यपाल महाराज यांच्या कीर्तनाचे गांधी भवन येथे आयोजन करण्यात आले होते. गेल्या सहा वर्षापासून बुलढाणा शहरात सार्वजनिक स्वरूपात महाराष्ट्रातील पहिली सम्राट अशोक जयंती मोठ्या उत्साहात साजरी केले जाते. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मभूमी महूचे अध्यक्ष भंते डॉ. धम्मदीप महाथेरो यांनी केले.

**बुलढाणेकरांकडून सत्यपाल महाराजांचा सन्मान**

- सत्यपाल महाराजांनी समाजातील अंधश्रद्धा, रूढी,परंपरा व समतेचे विचार संपूर्ण हयात भर आपल्या कीर्तनातून जनसामान्यांपर्यंत पोहोचवले, तुकारामांपासून गाडगेबाबा पर्यंतचे विचार हे सरळ आणि सोप्या भाषेत आपल्या वाणीने जनसामान्यात पोहोचविल्यामुळे बुलढाणा शहरातील समस्त बुलढाणा करांच्या वतीने प्रबोधनकार ही उपाधी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

यावेळी त्यांनी सम्राट अशोकाची जयंती ही सर्वव्यापी व्हावी ही इच्छा होती व या जयंतीची मुहूर्तमेढ बुलढाणा शहरातूनच झाली याचा आदर्श संपूर्ण महाराष्ट्र घेईल असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी अप्पर जिल्हाधिकारी रमेश घेवंदे होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून दादासाहेब काटकर, गजानन घिरके, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीत सिंग राजपूत शाहीर डी.आर. इंगळे, शिवसेना नेते गणेशसिंग राजपूत, इंजि. विजय मोरे, काँग्रेसचे शहराध्यक्ष दत्ता काकस, ज्येष्ठ पत्रकार सिद्धार्थ आराख, दामोदर बिडवे, प्रा. डी.आर. माळी, अशोक दाभाडे, आशिष खरात उपस्थित होते. प्रास्ताविक समितीचे अध्यक्ष कुणाल पैठणकर यांनी केले तर संचालन प्रा. राजेश खंडेराव तर आभार प्रा. प्रदीप जाधव यांनी मानले.



## युध्दविराम चर्चेतून संघर्षाचा धूर!

अमेरिकेने पाकिस्तानी मध्यस्थांमार्फत पाठवलेला १५-कलमी शस्त्रसंधीचा प्रस्ताव इराणला मिळाला आहे, असे पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी सांगितले. पश्चिम आशियामध्ये आधीच तैनात असलेल्या मरीन तुकडीला पाठिंबा देण्यासाठी अमेरिकेने पॅराट्रूपर्स पाठवण्यास सुरुवात केली असतानाच हा प्रस्ताव आला. इराणच्या लष्कराने अमेरिकेच्या राजनैतिक प्रयत्नांची खिल्ली उडवली आणि बुधवारी इस्रायल व पर्शियन गल्फ प्रदेशावर अधिक हल्ले केले. यापैकी एका हल्ल्यामुळे कुवेत आंतरराष्ट्रीय विमानतळावर मोठी आग लागली आणि आकाशात काळ्या धुराचे लोट पसरले. इराणला अमेरिकेकडून १५-कलमी शस्त्रसंधीचा प्रस्ताव मिळाला आहे. पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी या प्रस्तावाचे वर्णन व्यापक असे केले असून, त्यात निर्बंध शिथिलता, नागरी अणुसहकार्य, इराणच्या अणुकार्यक्रमाला स्थगिती, आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेद्वारे देखरेख आणि पर्शियन आखाताचे अरुंद मुख असलेल्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांच्या वाहतुकीला परवानगी यांचा समावेश आहे. इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या आंतरराष्ट्रीय जलवाहतुकीत अडथळा आणला आहे, ज्यामुळे इंधनाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत आणि जागतिक अर्थव्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे. यापूर्वी, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पश्चिम आशियातील युद्धात विजय मिळवल्याचा दावा केला होता. इराणने कधीही अण्वस्त्रे बाळगणार नाही असे मान्य केले असून होर्मुझच्या सामुद्रधुनीशी संबंधित एक "महत्त्वाची भेट" पाठवली आहे. ट्रम्प यांनी दावा केला की, इराण करार करण्यास तयार आहे. इराणच्या सध्याच्या नेतृत्वात आधीच मोठे बदल झाले आहेत. अमेरिकेने इराणची आण्विक क्षमता पूर्णपणे नष्ट केली आहे, जिचा वापर पश्चिम आशियातील अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांविरुद्ध केला जाऊ शकला असता. ट्रम्प यांच्या वक्तव्यानंतर, इराणच्या एका लष्करी प्रवक्त्याने बुधवारी युद्धविराम घडवून आणण्याच्या अमेरिकेच्या प्रयत्नांची खिल्ली उडवली, आणि अमेरिकेने प्रस्तावित केलेल्या १५-कलमी योजनेला यशाची काही शक्यता आहे का, असा प्रश्न उपस्थित केला. इराणचे नियमित सैन्य आणि निमलष्करी 'रिव्होल्यूशनरी गार्ड' यांना संयुक्तपणे आदेश देणाऱ्या खातम अल-अंबिया केंद्रीय मुख्यालयाचे प्रवक्ते लेफ्टनंट कर्नल इब्राहिम झुल्फघारी यांनी, मध्यस्थांमार्फत इराणला १५-कलमी योजना सुपूर्द केल्यानंतर ही टिप्पणी केली. इराणविरुद्ध युद्ध सुरू ठेवण्याची वकिली करणारे इस्रायली अधिकारी, अमेरिकी प्रशासनाने सादर केलेल्या युद्धविराम योजनेमुळे आश्चर्यचकित झाले आहेत. अमेरिका पश्चिम आशियामध्ये अतिरिक्त सैन्य आणि मरीन सैनिक पाठवत असल्याने, भविष्यातील कृतींबाबत आपले पर्याय खुले ठेवण्याची ट्रम्प यांची रणनीती म्हणून युद्धविराम योजनेचा प्रस्ताव सादर केला जात आहे. स्वतःला जागतिक महासत्ता म्हणवणारा देश, जर शक्य असते तर आतापर्यंत या संकटातून बाहेर पडला असता. इस्रायली लष्कराने बुधवारी पहाटे इराणमधील सरकारी पायाभूत सुविधांना लक्ष्य करून मोठ्या प्रमाणावर हल्ले पुन्हा सुरू केल्याची घोषणा केली, आणि प्रत्यक्षदर्शींनी वायव्येकडील काझविन शहरात हवाई हल्ले झाल्याचे वृत्त दिले. इराणने आपल्या आखाती अरब शेजारी देशांवर दबाव कायम ठेवला. सौदी अरेबियाच्या संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, त्यांनी तेल-समृद्ध पूर्व प्रांतावर डागलेले किमान आठ ड्रोन नष्ट केले आहेत, आणि बहरीनमध्ये क्षेपणास्त्र हल्ल्याचा इशारा देणारे सायरन वाजवण्यात आले. इराणला शस्त्रसंधीचा प्रस्ताव मिळाला, पण तेहरानने अमेरिकेशी वाटाघाटी करण्याची कल्पना फेटाळल्यामुळे या युद्धाची व्याप्ती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या संघर्षाचे गंभीर परिणाम लक्षात घेता युध्दविराम केवळ चर्चेपुरता न रहता त्यावर अंमलबजावणी व्हावी हीच अपेक्षा..!

# 'कॅग'च्या अहवालाने रस्त्यांच्या 'कमिशन'चे पितळ उघडे!

## रस्ते प्रकल्पांवरील २९७.९७ कोटींच्या अनावश्यक खर्चावर प्रश्नचिन्ह!

**भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांनी महाराष्ट्रात 'हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल' अंतर्गत राबविण्यात आलेल्या रस्ते प्रकल्पांवरील २९७.९७ कोटी रुपयांच्या अनावश्यक खर्चावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. राज्य विधानसभेत सादर करण्यात आलेल्या कॅगच्या अहवालात, २०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीतील रस्ते सुधारणा कामांचे लेखापरीक्षण करण्यात आले आहे. सार्वजनिक पैशांचा असा अपव्यय हा केवळ आकड्यांचा खेळ नसून, तो विकासाच्या गुणवत्तेवर आणि जनतेच्या विश्वासावर परिणाम करणारा मुद्दा आहे. रस्ते प्रकल्पातील कमिशनबाजीमुळे अनावश्यक खर्चाचा आलेख वाढतो. कॅगच्या या अहवालाने रस्ते प्रकल्पांतील अनियमिततेचे पितळ उघडे पडले आहे.**

महा भूमिका



• ब्रम्हानंद जाधव
कार्यकारी संपादक
(मो.नं.९८३४४९०११७)

अलीकडेच बुलढाणा जिल्ह्यात कमिशनच्या मुद्दयाने राजकीय वातावरण तापले आहे. रस्त्यांचे काम वार्डातील असो, शहरातील असो किंवा ग्रामीण भागातील त्यात स्थानिक लोकप्रतिनिधींचे 'कमिशन' आलेच. पण ते उघड बोलून दाखवायचे नसते! यावर चुप्पी ठेवायची अशी तंबी ठेकेदारापासून सर्वच कार्यकर्त्यांना दिली जाते. परंतु या कमिशनपोटी काही कामांवर अनावश्यक खर्चही वाढतो. आता रस्ते प्रकल्पाचेच घ्यायचे झाले तर त्यावर होणारा खर्च भूवया उंचावणारा आहे. आजही ग्रामीण भागच नव्हे तर शहरातही रस्त्यांच्या समस्या आहेत. डांबरीकरणाचा अभाव आहे. खड्डेमय रस्त्यामुळे वाहनांच्या अपघाताच्या घटनाही थांबलेल्या नाहीत. एकीकडे रस्त्यांची कामे होणे महत्त्वाचे असताना दुसरीकडे मात्र रस्ते प्रकल्पांवर कोट्यवधी रुपयांचा खर्च अनावश्यक होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर येत आहे. कॅगने रस्ते प्रकल्पांचे वास्तव उघड



केले आणि २९७ कोटींचा प्रश्न निर्माण झाला. 'हायब्रीड ॲन्युइटी मॉडेल' हा एक सार्वजनिक-खाजगी भागीदारी दृष्टिकोन आहे, ज्यामध्ये सरकार एकूण रस्ता बांधकाम खर्चाचा काही भाग देते, तर कंत्राटदार, म्हणजेच बिल्डर, उर्वरित भाग देतो. कंत्राटदाराला त्याचे पैसे नंतर हप्त्यांमध्ये परत केले जातात. अहवालानुसार, सविस्तर प्रकल्प अहवालात (डीपीआर) रस्त्याची जाडी गरजेपेक्षा जास्त देण्यात आली होती. प्रत्यक्ष वाहतूक अंदाजाच्या (एमएसए) तुलनेत या गरजेपेक्षा जास्त जाडीमुळे २९७.९७ कोटी रुपयांचा अतिरिक्त आणि अनावश्यक खर्च झाला. कॅगला असे आढळून आले की, प्रत्यक्षात कधीही न झालेल्या भूसंपादन कामांसाठी ५.५५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सरकारने वेळेवर निधी उपलब्ध न केल्यामुळे हप्त्यांच्या देयकास विलंब झाला, परिणामी कंत्राटदारांना ४.६५ कोटी रुपयांचे अतिरिक्त व्याज द्यावे लागले. देखभाल खर्चाचा भाग म्हणून विमा शुल्क फुगवून दाखवण्यात आले होते. प्रत्यक्ष प्रीमियम कमी असूनही, कागदपत्रांच्या कामामुळे ३४.५६ कोटी रुपयांचा अतिरिक्त बोजा पडला. त्यामुळे भविष्यातील रस्ते प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) अधिक अचूकतेने, म्हणजेच प्रत्यक्ष माहितीवर आधारित तयार करणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त, व्याजाचा अतिरिक्त बोजा टाळण्यासाठी वेळेवर निधीचे वाटप, देखभाल खर्चाचा अचूक अंदाज आणि देखरेख यंत्रणा मजबूत करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. अशाप्रकारे अनावश्यक होणारा खर्चाचा भार सर्वसामान्यांवरच पडणार आहे. त्यामुळे कुठल्याही रस्त्यांच्या बांधकामांचे नियोजन करत असताना खर्चाचा ताळमेळ साधने आवश्यक आहे. कंत्राटदार आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या संगणमतातून उभारणारे रस्ते प्रकल्पही कमिशनच्या नावाखाली खर्च वाढवून देतात. त्यामुळे रस्ते प्रकल्पांतर्गत होणाऱ्या या कमिशनवरही चाप लावणे आवश्यक आहे; तेव्हाच रस्त्यांवरील अनावश्यक खर्चाला आळा बसेल!

## सम्राट अशोक : धर्म, न्याय आणि मानवतेचा दीपस्तंभ

दिनविशेष
- डॉ. राजेंद्र बगाटे

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि शासकांनी आपापल्या कार्याची अमिट छाप सोडली आहे; परंतु ज्यांनी केवळ राज्यकारभारात यश मिळवले नाही, तर मानवी मूल्यांचा, नैतिकतेचा आणि शांततेचा मार्ग स्वीकारून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श निर्माण केला, अशा महान व्यक्तिमत्त्वांमध्ये सम्राट अशोक यांचे स्थान सर्वोच्च मानले जाते. सम्राट अशोक यांची जयंती ही केवळ एका राजाची आठवण नसून, ती मानवी जीवनातील परिवर्तन, आत्मपरीक्षण आणि धर्माधिष्ठित शासनव्यवस्थेची प्रेरणा देणारी एक महान घटना आहे.

सम्राट अशोक हे मौर्य साम्राज्याचे तिसरे सम्राट होते. त्यांचा जन्म इ.स.पूर्व ३०४ च्या सुमारास झाला असे मानले जाते. त्यांचे वडील सम्राट बिंदुसार आणि आजोबा चंद्रगुप्त मौर्य होते. चंद्रगुप्त मौर्य यांनी स्थापन केलेल्या मौर्य साम्राज्याचा विस्तार आणि सुदृढीकरण करण्याचे महान कार्य अशोकांनी केले. बालपणापासूनच अशोक हे बुद्धिमान, पराक्रमी आणि धाडसी होते. त्यांना युद्धकलेत प्रावीण्य होते आणि राज्यकारभाराची उत्तम समज होती. त्यामुळेच त्यांच्या वडिलांनी त्यांना विविध प्रांतांचे राज्यपाल म्हणून नेमले होते. तक्षशिला आणि उज्जैनसारख्या महत्त्वाच्या प्रांतांचे प्रशासन त्यांनी कुशलतेने सांभाळले.

राजसिंहासनावर आरूढ झाल्यानंतर सम्राट अशोकांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी अनेक मोहिमा केल्या. त्यातील सर्वात महत्त्वाची आणि ऐतिहासिकदृष्ट्या निर्णायक ठरलेली मोहिम म्हणजे कलिंग युद्ध. इ.स.पूर्व २६१ मध्ये झालेल्या या युद्धात अशोकांनी विजय मिळवला; परंतु या विजयाची किंमत अत्यंत भीषण होती. हजारो सैनिक आणि निरपराध नागरिक मारले गेले, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, आणि संपूर्ण प्रदेशात हाहाकार माजला. या युद्धानंतर अशोकांच्या मनावर खोल परिणाम झाला. रणांगणावर पडलेल्या मृतदेहांचे दृश्य, विधवा झालेल्या स्त्रियांचा आक्रोश आणि अनाथ मुलांचे दुःख पाहून अशोकांच्या अंतःकरणात प्रचंड वेदना निर्माण झाली.

याच क्षणापासून अशोकांच्या जीवनात एक महान परिवर्तन घडले. त्यांनी युद्ध आणि हिंसेचा मार्ग सोडून धर्म, अहिंसा आणि करुणेचा मार्ग स्वीकारण्याचा निश्चय केला. त्यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला आणि 'धम्म' या संकल्पनेचा प्रसार सुरू केला. अशोकांचा 'धम्म' हा केवळ धार्मिक आचार-विचारांपुरता मर्यादित नव्हता, तर तो नैतिक जीवनपद्धतीचा मार्ग होता. सत्य, अहिंसा, करुणा, दया, सहिष्णुता, प्रामाणिकपणा आणि सर्व जीवांप्रती आदर या मूल्यांचा त्यांनी प्रचार केला.

सम्राट अशोकांनी आपल्या धम्माचा प्रसार करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या. त्यांनी आपल्या राज्यभर शिलालेख आणि स्तंभ उभारले, ज्यांवर धम्माचे उपदेश कोरलेले होते. हे शिलालेख आजही भारताच्या विविध भागांत आढळतात आणि अशोकांच्या विचारांचा जिवंत पुरावा म्हणून उभे आहेत.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## युवांसाठी प्रेरणादायी विचार



- प्रविण गजानन जमधाडे
सहाय्यक शिक्षक
श्री.अ.खि.नॉशनल हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, खामगांव



युवा ही कोणत्याही राष्ट्राची सर्वात मोठी शक्ती मानली जाते. समाजातील परिवर्तन, प्रगती, नवसर्जन, नेतृत्व आणि राष्ट्रनिर्मिती या सर्व प्रक्रियांच्या केंद्रस्थानी युवक असतात. युवकांमध्ये उत्साह, ध्येयवादी वृत्ती, धाडस, जिज्ञासा आणि नवनिर्मितीची क्षमता असते. म्हणूनच युवांना योग्य दिशा देणारे प्रेरणादायी विचार समाजासाठी अत्यंत आवश्यक ठरतात. प्रेरणा ही केवळ व्यक्तीच्या यशापुरती मर्यादित नसून ती संपूर्ण समाजाच्या विकासाला चालना देणारी शक्ती आहे. जेव्हा युवक प्रेरित होतात, तेव्हा ते स्वतःचे जीवन घडवतात आणि त्याचबरोबर राष्ट्राच्या प्रगतीचे शिल्पकारही बनतात.

प्रेरणा म्हणजे व्यक्तीच्या अंतर्मनातील सुप्त शक्ती जागृत करणारी प्रक्रिया होय. अनेकदा युवकांमध्ये क्षमता असते, परंतु योग्य मार्गदर्शन आणि प्रेरणा नसल्यामुळे ती क्षमता पूर्णपणे विकसित होत नाही. प्रेरणादायी विचार युवकांना आत्मविश्वास देतात, ध्येय निश्चित करण्यास मदत करतात आणि कठोर परिश्रम करण्यासाठी तयार करतात. प्रेरणा मिळाल्यास युवक अपयशालाही संधी म्हणून पाहतात आणि पुन्हा उभे राहण्याची ताकद निर्माण करतात. म्हणूनच प्रेरणा ही युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाची आधारशिला आहे.

आजचा युवक बदलत्या काळाशी जुळवून घेणारा आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योजकता आणि सामाजिक कार्य या सर्व क्षेत्रांमध्ये युवक सक्रिय भूमिका बजावत आहेत. परंतु या सर्व क्षेत्रांमध्ये यश मिळवण्यासाठी योग्य विचारसरणी आवश्यक असते. सकारात्मक विचार युवकांच्या जीवनात आशावाद निर्माण करतात. सकारात्मक दृष्टिकोनामुळे युवक कोणत्याही अडचणींना घाबरत नाहीत. उलट त्या अडचणींना सामोरे जाण्याची तयारी त्यांच्या मनात निर्माण होते. सकारात्मक विचार युवकांना संयम, शिस्त आणि सातत्य यांचे महत्त्व शिकवतात.

युवकांसाठी शिक्षण हे सर्वात मोठे प्रेरणास्थान आहे. शिक्षणामुळे युवकांना ज्ञान मिळते, विचार करण्याची क्षमता वाढते आणि योग्य-अयोग्य यातील फरक समजतो. शिक्षणामुळे युवक स्वावलंबी बनतात आणि समाजासाठी योगदान देण्याची प्रेरणा मिळते. शिक्षण ही केवळ नोकरी मिळवण्याची प्रक्रिया नसून व्यक्तिमत्त्व घडवण्याचे साधन आहे. शिक्षणामुळे युवकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो आणि अंधश्रद्धा, अन्याय व असमानता यांविरुद्ध लढण्याची ताकद निर्माण होते.

प्रेरणादायी विचार युवकांना स्वप्न पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा देतात. स्वप्न पाहणे ही यशाची पहिली पायरी असते. जे युवक मोठी स्वप्ने पाहतात आणि ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करतात, तेच समाजात यशस्वी होतात. परंतु स्वप्न पाहण्याबरोबरच त्यासाठी कठोर परिश्रम करण्याची तयारीही आवश्यक असते. प्रेरणादायी विचार युवकांना मेहनतीचे महत्त्व समजावतात आणि सातत्य राखण्याची प्रेरणा देतात.

युवकांसाठी आदर्श व्यक्तिमत्त्वांचे विचार अत्यंत प्रेरणादायी ठरतात. स्वामी विवेकानंद यांनी युवकांना आत्मविश्वास आणि ध्येयवादाचा संदेश दिला. त्यांनी युवकांना स्वतःच्या शक्तीची ओळख करून घेण्याचे महत्व सांगितले. त्यांच्या विचारांमुळे युवकांमध्ये राष्ट्रभक्ती आणि आत्मविश्वास निर्माण होतो. युवकांनी स्वतःवर विश्वास ठेवला तर ते कोणतीही गोष्ट साध्य करू शकतात, हा संदेश त्यांच्या विचारांमधून स्पष्टपणे दिसून येतो.

महात्मा गांधी यांनी युवकांना सत्य, अहिंसा आणि सेवा या मूल्यांचा स्वीकार करण्याचा संदेश दिला. त्यांनी युवकांना स्वावलंबी बनण्याची आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या विचारांमुळे युवकांमध्ये नैतिकता, प्रामाणिकपणा आणि सेवा भावना विकसित होते. समाजात शांतता आणि सौहार्द टिकवून ठेवण्यासाठी युवकांनी सकारात्मक भूमिका बजावावी, हा त्यांचा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे.

तसेच भगतसिंग यांचे जीवन युवकांसाठी धैर्य, त्याग आणि देशभक्तीचे प्रतीक आहे. त्यांनी तरुण वयात देशासाठी केलेले बलिदान युवकांना प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या विचारांमुळे युवकांमध्ये अन्यायाविरुद्ध लढण्याची जिद्द निर्माण होते. समाजासाठी काहीतरी करण्याची भावना त्यांच्या जीवनातून स्पष्टपणे दिसून येते.


आजच्या काळात युवकांसमोर अनेक आव्हाने आहेत. स्पर्धा वाढलेली आहे, बेरोजगारीची समस्या आहे, ताणतणाव वाढलेला आहे आणि डिजिटल माध्यमांचा अति वापरही एक मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत प्रेरणादायी विचार युवकांना मानसिक बळ देतात. प्रेरणेमुळे युवक संकटांवर मात करण्याची क्षमता विकसित करतात. अपयश आले तरी निराश न होता पुन्हा प्रयत्न करण्याची ताकद त्यांच्या मनात निर्माण होते. युवकांनी स्वतःचे ध्येय निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. ध्येय नसलेले जीवन दिशाहीन असते. प्रेरणादायी विचार युवकांना योग्य ध्येय निवडण्यास मदत करतात. ध्येय निश्चित झाल्यानंतर त्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असते. सातत्य आणि परिश्रम यांच्या जोरावर युवक कोणतीही उंची गाठू शकतात. प्रेरणा युवकांना हार न मानण्याची शिकवण देते.

तंत्रज्ञानाच्या युगात युवकांची भूमिका अधिक महत्त्वाची झाली आहे. आजचा युवक इंटरनेट, डिजिटल माध्यमे आणि आधुनिक साधनांचा वापर करून ज्ञान मिळवत आहे. परंतु या साधनांचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षण, संशोधन आणि सामाजिक कार्यासाठी केला तर युवक समाजाच्या विकासात मोठे योगदान देऊ शकतात. प्रेरणादायी विचार युवकांना तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग करण्यास प्रेरित करतात.

युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणेही अत्यंत आवश्यक आहे. नेतृत्वामुळे युवक समाजात सकारात्मक बदल घडवू शकतात. नेतृत्व म्हणजे केवळ इतरांना मार्गदर्शन करणे नव्हे, तर स्वतः उदाहरण बनणे होय. प्रेरणादायी विचार युवकांना जबाबदारी स्वीकारण्याची आणि समाजासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतात. युवकांनी नैतिक मूल्ये, शिक्षण, स्वावलंबन आणि सामाजिक जबाबदारी यांचा स्वीकार केला तर ते देशाला प्रगतीच्या शिखरावर नेऊ शकतात. प्रेरणादायी विचार युवकांना योग्य दिशा देतात, आत्मविश्वास वाढवतात आणि राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग घेण्याची प्रेरणा देतात.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## सृष्टीच्या कल्याणासाठी रामचंद्रांचे आदर्श अंगीकारले पाहिजे



दिनविशेष
- रमेश लांजेवार
नागपूर,
मो. ९९२१६९०७७९



चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे हिंदू धर्माच्या नवीन वर्षाची सुरुवात, या दिवशी गुढी उभारून नवीन वर्षाचे स्वागत मोठ्या उत्साहाने केले जाते. महाराष्ट्रात नवीन वर्ष "गुढीपाडवा" म्हणून साजरा केला जातो तर इतर राज्यांत वेगवेगळ्या पध्दतीने हा सण मोठ्या उत्साहाने व आनंदाने साजरा केल्या जातो. याच महीण्यात चैत्र शुद्ध नवमीला श्रीरामाचा जन्म झाला. त्याचप्रमाणे याच महीण्यात सात दिवसांनी महाबली हनुमान यांचा जन्म झाला. म्हणजे चैत्र महिन्यात मर्यादापुरुषोत्तम रामांचा जन्म व महाबली हनुमान यांचा जन्म म्हणजे एक दैवी लीलाच म्हणावी लागेल. यामुळे संपूर्ण भारतात दरवर्षी रामनवमी व हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहाने व थाटाने साजरी करण्यात येते. रामनवमीला भजन, कीर्तन, पालखी व मोठ-मोठ्या झांक्या काढून संपूर्ण भारतात श्री रामांचा जयघोष दिसून येतो व या दिवशी संपूर्ण माध्यमातून श्रीरामाचे नामस्मरण केल्या जाते.

आज जगात ज्या-ज्या ठीकाणी सत्यता व संयमता दिसून येते यामागे मर्यादापुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांचीच लिला आहे. भारतात बहुसंख्य हिंदू असतांना सुध्दा सर्व धर्मांना घेऊन चालण्याचा मान फक्त भारतीय संस्कृतीमध्येच आहे. कारण संस्कृती, सन्मान, सभ्यता, संयमता, दृढनिश्चयता, आपुलकीची भावना आणि सर्वांना एकत्र घेऊन चालण्याची क्षमता फक्त भारतीय संस्कृतीमध्येच दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांचे लोक एकोप्याने आणि आनंदाने रहातात. त्यामुळे संपूर्ण हिंदु धर्म राममंदिर बांधकामाच्या प्रतीक्षेत होता आणि ते साध्य झाले. त्यामुळे आज आपल्याला अयोध्येत भव्य राममंदिर दिसून येते. आज भारतात हिंदू धर्मामध्ये संयमता दिसून येते ती फक्त प्रभूराचंद्राच्या आशीर्वादानेच. यामुळे विदेशी नागरिकांची जगातील पहीली पसंती भारत असल्याचे दिसून येते.

यामागे फक्त प्रभू राचंद्रांचेच आदर्श म्हणावे लागेल व आहे. प्रभूराचंद्राचा आशिर्वाद भारतीयांना आहे. त्यामुळे या धर्तीवर प्रभूश्रीराम सर्वांचेच आहे आणि राहील. कारण अयोध्येत राम जन्मले हे वास्तव्य आहे याची पुष्टी भारतीय पुरातत्त्व विभाग व विदेशातील अनेक पुरातत्व विभागाने जाहीर केले आहे. श्री रामाचा जप आपण जन्मा पासून तर शेवटपर्यंत करीत असतो. त्याचप्रमाणे कठीण प्रसंगी रामाचे नामस्मरण करून येणाऱ्या अडचणी व दुःख दूर करण्यासाठी प्रयत्न करीत असतो. त्यामुळे प्रभूराम सर्वांच्या मनात, हृदयात, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिन, निसर्ग, वन्यप्राणी, मानव-जिवजंतु यांच्या मना-मनात वावरत असतो. त्यामुळेच जगातील इतर देशांच्या तुलनेत प्रत्येक विदेशी नागरिकाची पहीली पसंत भारत असल्याचे दिसून येते. कारण भारतात सर्वच धर्मांच्या देवी-देवतांचा, साधुसंतांचा व थोर महात्म्याचा वास आहे. त्यामुळे भारतवासी एकोप्याने राहतात.

आज जगात भारत विश्र्व व शांतीचे प्रतीक आहे हे फक्त प्रभू राचंद्रांच्या आदर्शामुळे. त्यामुळे प्रभूराचंद्राचे महत्त्व आणि त्यांची लीला हिंदू धर्माला ग्यात आहेच. अयोध्येतील राममंदिर भारतीयांच्या मदतीने एवढे भव्य झाले आहे की त्याची संपूर्ण जगात ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि पर्यटनाला चालना देणारे ठीकाण बनलेले आहे. त्याचप्रमाणे सात अजुब्यातुन राममंदिर प्रथम क्रमांकावर असल्याचे मी समजतो. त्यामुळे राममंदिर ते राष्ट्रमंदिर ही भुमिका सर्वांनीच अंगीकारली पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदूसंस्कृती जोपासण्याकरीता देशातील प्रत्येक हिंदूनी नवनिर्माण अयोध्येतील राम मंदिरात जाऊन रामाचे चरन स्पर्श केलेच पाहिजे. भारतातील प्रत्येक धर्माच्या लोकांनी लक्षात ठेवले पाहिजे की श्रीराम सर्वांचे आहे व राहील. श्रीरामाने १४ वर्षे वनवास भोगला, वालीसारख्या अहंकारी शक्तीचा सर्वनाश केला, रूषि-मुनी, साधु-संत, गोरगरीब यांचे संरक्षण केले, रावनासारख्या असुर शक्तीचा नाश केला तेव्हाच रामराज्याची स्थापणा झाली व सत्ययुग प्रस्तापीत झाले आणि तेव्हापासूनच सर्वांच्या मनात प्रभू रामचंद्राची धुंद गुंजतांना दिसते. तीच प्रतीकृती आज अयोध्येमध्ये साकार झाली आहे हे हिंदू धर्माचे अहोभाग्यच म्हणावे लागेल.

आज अयोध्येतील राम मंदिरमुळे "मन में राम, तन मे राम, घर-घर मे राम" या आवाजाची गुंज आपल्याला संपूर्ण भारतात ऐकायला व पहायला मिळत आहे. आजही जगात अनेक देशांमध्ये हिंदू संस्कृतीची जोपासना केली जाते व हिंदू संस्कृतीचा इतिहास सुध्दा दिसून येतो. यामागचे मुख्य कारण म्हणजे श्रीरामांचे आदर्श आहे. श्रीरामांचा इतिहास आणि वास्तव भारतासह जगातील अनेक देशांमध्ये पहायला मिळते. तेव्हाच प्रभु श्रीरामचंद्रांना मर्यादा पुरुषोत्तम म्हटल्या जाते. प्रभु राम सत्यतेचे प्रतीक आहे. त्याचे अनुकरण देशातील लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी स्वयंघोषित समाजसेवक, राजकीय पुढारी यांनी करून जनसेवा करण्याची नितांत गरज आहे. कारण देशातील ९५ टक्के राजकीय पुढारी अहंकारी, स्वार्थीवृत्तीचे असल्यामुळे भ्रष्टाचाराने लिप्त आहेत व मोठ्या प्रमाणात करोडोंची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवली आहे. या कलयुगात राजकीय पुढारी समाजसेवेपेक्षा स्वतःची सेवा करण्यात मग्न (गुंग) असतात.

"मु मे राम बगल में छुरी" अशा प्रकारची असुरी भावना आजच्या ९५ टक्के राजकीय पुढाऱ्यांत दिसून येते. कारण गरीब व सर्वसामान्यांचे रक्त पीवुन आजचा ९५ टक्के राजकीय पुढारी "रक्तबीज" राक्षसाची भुमिका बजावीतांना दिसून येते. त्यामुळेच देशात भ्रष्टाचार व अत्याचार उफाळलेला आहे. आज देशातील प्रत्येक आजी-माजी आमदार-खासदार-मंत्री व अनेक राजकीय पुढारी करोडपती झालेला आहे. यामुळेच आज देशात महागाई, बेरोजगारी, भुकमरी, कुपोषण, महागडे शिक्षण, शेतकऱ्यांच्या समस्या, आरोग्य विषयक समस्या व शेतकऱ्यांच्या आत्महत्यां यांनी जन्म घेतला आहे.

राजकीय पुढाऱ्यांनी गरिब व सर्वसामान्यांची लुटमार थांबवून आणि महागाई कमी करून समाजकार्य करावे यातच खरा प्रभु रामचंद्राचा आदर्श दिसून येईल व पुन्हा आपल्याला भारतात रामराज्य साकार करता येईल. जोपर्यंत देश भ्रष्टाचारमुक्त होत नाही तोपर्यंत भारतात रामराज्य शक्य नाही.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८ पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

दैनिक महाभूमि

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27


आज श्रीराम नवमी

छत्रपती संभाजीनगर भूमि

गुरुवार २६ मार्च २०२६

mahabhoomimarathwada@gmail.com


# शहरात प्रभू श्री रामाची २३ मंदिरे; रामनवमीनिमित्ताने आज विविध कार्यक्रम

महाभूमि विशेष

अभिषेक सूर्यवंशी

**छत्रपती संभाजीनगर :** शहराच्या विविध भागात प्रभू श्री रामाची २३ मंदिरे असून त्यात किराडपुरा (जसवंतपुरा) येथील श्रीराम मंदिर ३५० वर्ष जूने असल्याची माहिती राम मंदिराची माहिती संकलित करणारे प्रा. डॉ. अनिल मुंगीकर यांनी दिली. छत्रपती संभाजीनगरातील विविध राम मंदिरात रामनवमीनिमित्ताने गुरुवार, २६ मार्च रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून पहाटे महाआरतीने कार्यक्रमास सुरुवात होणार आहे.

शहरातील सर्वात जुने राम मंदिर किराडपुरा परिसरात असून हे मंदिर १६६७ साली महाराजा जसवंत सिंह यांनी बांधले होते. शहरातील सर्वात प्राचिन राम मंदिर अशी ओळख या मंदिराची असून हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतिक म्हणून किराडपुऱ्यातील राममंदिराकडे पाहिल्या जाते. भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या किराडपुऱ्यातील राम मंदिरात रामनवमीला महाआरतीने रामनवमी उत्सवास सुरुवात होणार आहे. किराडपुऱ्यातील राममंदिराशिवाय शहराच्या विविध भागातही राम मंदिरे असून तेथेही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील चौराहा, टिळकपथ परिसर, जयविश्वभारती कॉलनी, राजनगर, बसस्थानक ते रेल्वेस्टेशन रोडवरील पद्मपुरा परिसरातील तुलसीभवन, कैलासनगर, समर्थनगरनगरात समर्थ राम मंदिर, सातारा परिसर, पडेगावातील मीरानगर, ईटखेडा, सिडको एन-४, एमआयडीसी वाळूज परिसरातील बजाजनगर, दिपनगर हडको, रांजणगाव, पन्नालाल नगर परिसरातील सेंच्यूरी प्राईड, हर्सूल येथील हरसिध्दी देवी मंदिरासमोर प्रभू श्री रामाचे मंदिर आहे. हरसिध्दी देवी मंदिरासमोर असलेल्या राम मंदिराचा जिर्णाद्वार अहिल्यादेवी होळकर यांनी केला असल्याची इतिहासात नोंद असल्याचे जुने जाणकार सांगतात.



### तीन वर्षात केली माहिती संकलित

■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील वनस्पतीशास्त्र विभागातून सेवानिवृत्त झाल्यानंतर प्रा. डॉ. अनिल मुंगीकर यांनी सलग तीन वर्ष मिळेल तेथे जाऊन प्रभू श्री रामाच्या मंदिराची माहिती संकलित केली. त्यासाठी त्यांनी गुगल मॅपची मदत घेतली होती. गुगल मॅपवर जेथे मंदिर असे लोकेशन दिसते त्या ठिकाणी जाऊन मंदिराची माहिती संकलित केली असल्याचे प्रा. डॉ. मुंगीकर यांनी सांगितले. तसेच त्यांच्याजवळ जवळपास एक हजार मंदिराची माहिती उपलब्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

## न्यूज ब्रीफ

### पत्नीने पतीला बदडले

**छत्रपती संभाजीनगर :** घरगुती कारणावरून पत्नी तसेच सासूने पतीला मारहाण केल्याची घटना भावसिंगपुरा परिसरात घडली. याप्रकरणी छावणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पल्लवी संतोष काळे, रत्नमाला अशोक जगताप रा. कोटला कॉलनी अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी संतोष दादाराव काळे, रा. साकेतनगर भावसिंगपुरा यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार रविवार, २२ मार्च रोजी संध्याकाळी साडे आठ वाजेच्या सुमारास घरगुती वादातून पत्नी व सासूने शिवीगाळ करीत प्लास्टीकच्या पाईपने मारहाण करीत जखमी केले. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार लकडे हे करीत आहेत.

### अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

**सिल्लोड :** तालुक्यातील सराटी येथे रामनवमीच्या मुहूर्तावर गुरुवार, २६ मार्च रोजी पासून हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. हभप. कृष्णा महाराज मोकासे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवमहापुराण कथा व ज्ञानेश्वरी पारायण पार पडेल. सप्ताहात हभप. प्रदीप महाराज भोरकडे, ज्ञानेश्वर महाराज शेलुदकर, विष्णू महाराज सास्ते, अजबराव महाराज मिरगे, अशोक महाराज सुरडकर, शिवानंद महाराज फुके, जगन्नाथ महाराज तळेकर यांची कीर्तने होणार आहेत.

### दुचाकीच्या धडकेत तरुण ठार

**छत्रपती संभाजीनगर :** भरधाव दुचाकीच्या धडकेत सुनिल अर्जून खरात ठार झाल्याची घटना अहिल्यानगर रोडवर पंढरपुर येथे घडली. याप्रकरणी वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी रंगनाथ सोनाजी खोतकर रा. वळदगाव यांनी फिर्याद दिली.

महाभूमि विशेष

## आठ दिवसाला मिळते ड्रमभर पाणी

# ‘नो नेटवर्क’ परिसराला पाणीटंचाईच्या झळा

अमित तांदळे

**छत्रपती संभाजीनगर :** शहराच्या आजू-बाजूला नव्याने निर्माण झालेल्या वसाहतींना जलवाहिन्यांचे अपुरे जाळे, अपुऱ्या जलकुंभामुळे उन्हाळ्यासह वर्षाच्या बाराही महिने पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. ‘नो नेटवर्क’ एरिया अशी ओळख असलेल्या या नवीन वसाहतीत दर आठ दिवसाला ड्रमभर पिण्याचे पाणी मिळते अशी माहिती येथील रहिवाश्यांनी दिली. तसेच वापरण्याचे पाणी विकत घ्यावे लागते असेदेखील त्यांनी यावेळी सांगितले.



गेल्या काही वर्षात छत्रपती संभाजीनगर शहराचा झपाट्याने विस्तार झाला असून सातारा, देवळाई, भावसिंगपुरा, पडेगाव, मिटमिटा, हर्सूल, सावंगी, पिसादेवी, चिकलठाणा, मुकुंदवाडी, मिसारवाडी, राजनगर आदी परिसरात अनेक नव्याने वसाहती निर्माण झाल्या आहेत. नवीन वसाहती निर्माण झाल्या असल्या तरी या वसाहतीमध्ये जलवाहिन्यांचे जाळे नसल्याने पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे या वसाहतींना टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जातो. त्यासाठी या वसाहतीत राहणाऱ्या नागरिकांकडून मनपा ४८० रुपये महिन्याला घेते. तसेच तीन दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे नियोजन असतांना देखील नव्याने तयार झालेल्या वसाहतीत आठ ते दहा दिवसानंतर ड्रमभर पिण्याचे पाणी महानगरपालिकेच्या वतीने देण्यात येते अशी माहिती भावसिंगपुरा, पेठेनगर परिसरातील रहिवाश्यांनी सांगितले.

दरम्यान, ‘नो नेटवर्क’ एरियातील नवीन वसाहतीत अनेकांनी बोअरवेल घेतले असून उन्हाळ्यात बोअरवेल तळ गाठत असल्याने त्यांना वापरण्यासाठी विकतचे पाणी घ्यावे लागते. उन्हाळ्यात दोन हजार लिटर क्षमतेचे पाण्याचे टँकर ५०० ते ७०० रुपयांना मिळते. टँकरसाठी बुकींग करुनही दोन ते तीन दिवस वाट पहावी लागते असे स्थानिकांनी सांगितले. महानगरपालिकेने आमच्या वसाहतीत जलवाहिन्या टाकून सुरळीत पाणी पुरवठा करावा अशी मागणी नो नेटवर्क एरियातील नागरिकांनी केली केली.

### लवकरच जलवाहिनी टाकणार

■ महानगरपालिकेच्या वतीने ‘नो नेटवर्क’ एरियात सुरळीत पाणी पुरवठा करण्यासाठी लवकरच जलवाहिनी टाकण्याचे काम हाती घेण्यात येणार असल्याची माहिती मनपा पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता एस.आर. धांडे यांनी दिली. तसेच नवीन पाणी पुरवठा योजनेअंतर्गत शहरात जलकुंभ उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून पुढील वर्षभरात ‘नो नेटवर्क’ एरियातील नागरिकांना नळाद्वारे पाणी पुरवठा करण्यात येईल असे त्यांनी स्पष्ट केले.

### जलवाहिनीची टेस्टींग सुरु

■ जायकवाडी ते छत्रपती संभाजीनगरदरम्यान नवीन जलवाहिनी टाकण्याचे काम पूर्ण झाले असून या जलवाहिनीची टेस्टींग करण्याचे काम सध्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने हाती घेतले असल्याची माहिती कार्यकारी अभियंता मनिषा पलांडे यांनी दिली. जलवाहिनीची आतून सफाई झाल्यानंतर शहराला महिनाभरानंतर दररोज २०० एमएलडी पाणी मिळेल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

# धमकीच्या ई-मेलनंतर पोलिसांची धावपळ

## पोस्ट ऑफिसची कसून तपासणी



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

तुमच्या शहरातील पोस्ट ऑफिस कार्यालय आरडीएक्स बॉम्बच्या सहाय्याने उडवून लावू असा धमकीचा ई-मेल प्राप्त झाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर शहर पोि लसांची बुधवार, २५ नोव्हेंबर रोजी सकाळी चांगलीच धावपळ झाली. बॉम्ब शोधक व नाशक पथकाने जुना बाजार येथील पोस्ट ऑफिस कार्यालयाची अत्याधुनिक उपकरणाच्या सहाय्याने कसून तपासणी केली. या तपासणीत बॉम्बची केवळ अफवा असल्याचे लक्षात आल्यानंतर सर्वांनीच सुटकेचा श्वास सोडला

तुमच्या शहरातील पोस्ट ऑफिस कार्यालय आरडीएक्स बॉम्बच्या सहाय्याने उडवून लावू असा धमकीचा ई-मेल बुधवारी राज्यातील विविध पोस्ट कार्यालयांना आणि पोलिस यंत्रणेला प्राप्त झाला. छत्रपती संभाजीनगर पोस्ट ऑफिसला देखील बॉम्बने उडवून देण्याचा ई-मेल प्राप्त झाल्यानंतर सिटीचौक, गुन्हेशाखा, बॉम्ब शोधक व नाशक पथक, क्युआरटी कमांडो पथकाने जुनाबाजार येथील पोस्ट ऑफिस कार्यालयात धाव घेतली.

पोलिसांनी पोस्ट ऑफिस कार्यालयातील कर्मचाऱ्यांना बाहेर काढून पोस्ट ऑफिस कार्यालयाची कसून तपासणी केली. कार्यालयात आलेल्या पार्सलची देखील यावेळी तपासणी करण्यात आली. या तपासणीत बॉम्बची केवळ अफवा असल्याचे लक्षात आल्यानंतर सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला. या घटनेची नोंद सिटीचौक पोलिस ठाण्यात करण्यात आली असून धमकीचा ई-मेल पाठविणाऱ्याविरुध्द सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु असल्याचे सिटीचौक पोलिस ठाण्याच्या सूत्रांनी सांगितले.

# रामकंदच्या नावाखाली विकला जातोय ‘विदेशी घायपातचा मांसल बुंधा‘

## पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांचा दावा

गजानन जाधव

**सिल्लोड :** सध्या बाजारात रामकंदच्या नावाखाली विदेशी वनस्पती असलेल्या घायपातचा मांसल बुंधा विकला जात असल्याचा दावा पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी केला आहे. तसेच बाजारात विकल्या जात असलेल्या रामकंदचा रामायणाशी काहीही संबंध नसल्याचे देखील त्यांनी सांगितले.

महाराष्ट्रात चैत्र महिन्यात विविध गावात यात्रा भरत असून या यात्रोत्सवात काही लोक रामकंद विक्री करतांना दिसून येतात. रामकंद विक्री करणारे विक्रेते हा कंद केरळ किंवा हिमालयातून आणला असल्याचे सांगतात. वास्तविक पाहता रामकंद नावाची कोणतीही वनस्पती आजपर्यंत देशात आढळून आली नसल्याचे डॉ. संतोष पाटील यांनी सांगितले. सध्या बाजारात रामकंदच्या नावाखाली विक्री होणारा कंद विदेशी वनस्पती असलेल्या घातपातचा मांसल बुंधा असून त्याचे शास्त्रीय नाव ‘आगावा सिसालाना’ असल्याचे त्यांनी सांगितले.

‘आगावा सिसालाना’ ही झुडूप वर्गीय प्रजाती असून वनविभागाने जमिनीची धूप होऊ नये यासाठी देशातील विविध वनक्षेत्रात, डोंगर उतारावर याची लागवड केली आहे. घायपातची साल खरवडून त्यास गुळगुळीत केले जाते. त्यावर काथ व पाणी याचा मुलामा देऊन तपकिरी रंग आणला जातो. तसेच वरच्या बाजूस काप, छिद्र करुन त्यात साखरेचे पाणी मुरवले जाते. अशा प्रकारे किंचित गोड चवीचा कंद ४० ते ५० रुपयाला चकती अथवा काप करुन विकला जात असल्याचे डॉ. संतोष पाटील यांनी सांगितले. त्याचप्रमाणे या कदमध्ये



ऑक्सालेटचे क्षार अधिक असतात, त्यामुळे घसा खवखवणे, सुजने आदी त्रास होतो असे देखील डॉ. पाटील यांनी सांगितले.

# बोरसर सोसायटीच्या अध्यक्षपदी विलास पवार यांची निवड

वैजापूर / प्रतिनिधी

तालुक्यातील बोरसर विवीध सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी विलास शंकर पवार व उपाध्यक्ष पदी प्रकाश कारभारी होले यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. यापुर्वीचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांनी राजीनामा दिल्याने ही पदे रिक्त झाली होती.त्यामुळे नवीन अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी निवडणूक निर्णय अधिकारी ओंकार देवापूरे यांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची बैठक घेण्यात आली.



या बैठकीत अध्यक्ष पदी विलास पवार व उपाध्यक्ष पदी प्रकाश होले यांची बिनविरोध निवड झाली. सचिव एस एफ बैनाडे यांनी सभेसाठी सहकार्य केले. या बैठकीस संचालक दिनकर पवार, अशोक पवार, गुलाबराव पवार, फकीर पवार, राधाकिसन शेवाळे, रघुनाथ पवार, अशोक बागुल, काशिनाथ कोल्हे, आशा पवार, मीरा शेवाळे या संचालकांसह अरूण होले, दिपक शेवाळे, शिवाजी पवार, ज्ञानेश्वर पवार यांची उपस्थिती होती. नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला.

# विवाहितेचा छळ; गुन्हा दाखल

वडोदबाजार / प्रतिनिधी

फुलंब्री तालुक्यातील वारेगाव येथे एका विवाहितेचा १० लाख रुपयांच्या मागणीसाठी शारीरिक आणि मानसिक छळ केल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी पतीसह सासरच्या सहा जणांवर फुलंब्री पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडित महिला लक्ष्मी अजय पंडित (२२ वर्ष), रा. सातारा परिसर, छत्रपती संभाजीनगर, ह.मु. वारेगाव, ता. फुलंब्री यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ही घटना १२ मे २०२३ ते १८ ऑगस्ट २०२४ च्या दरम्यान घडली. सासरच्या मंडळींनी माहेरहून १० लाख रुपये आणण्याची मागणी करत वारंवार मानसिक व शारीरिक छळ केला, तसेच मारहाण, शिवीगाळ आणि जीवे मारण्याच्या धमक्या दिल्या.

# घाटशेंद्रा येथे छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे भूमिपूजन

चिंचोली लिंबाजी / प्रतिनिधी

घाटशेंद्रा येथे उभारण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचे भूमीपूजन रविवार, २२ मार्च रोजी करण्यात आले. यावेळी विविध संस्थामधील संत, महंत आणि विविध धर्माचे धर्मगुरु उपस्थित होते.

कन्नड तालुक्यातील घाटशेंद्रा येथील ग्रामस्थ आणि शिवप्रेमींच्या वतीने गावात छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक उभारण्यात येत आहे.

या स्मारकाचा भूमीपूजन सोहळा रविवारी पार पडला. यावेळी श्रीराम मंदिर घाटशेंद्राचे मठाधिपती स्वामी ब्रह्मविदानंद महाराज, सुरुंगमाळ संस्थानचे महंत नीलकंठ महाराज, शिवेश्वर देवस्थानचे ह.भ.प. नामदेव महाराज, शनेश्वर संस्थानचे सुखदेव महाराज, नवमीनाथ महाराज, समाधान महाराज, अशोक महाराज, जामा मज्जीदचे नवाजअली आशेकअली सय्यद, जुनी मज्जीदचे अजीमखा फारूकखा मौलाना, वाजेद नियाज अली सय्यद, गजराबाई लंभे, हुसैनअली करीमअली सय्यद, रामदास गायकवाड, शामराव सुर्वे, जिल्हा परिषद सदस्य अर्जुन पाटील, सरपंच लक्ष्मण गवळी, उपसरपंच समाधान गायकवाड आदींची उपस्थिती होती.

## जिल्हास्तरीय ग्रंथोत्सवाचे उद्घाटन, ग्रंथ दिंडीने कार्यक्रमास सुरुवात

# सुजाण समाज घडविण्यासाठी ग्रंथ वाचनाची चळवळ व्हावी : पुरुषोत्तम भापकर

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

ग्रंथ वाचनातून अनेक व्यक्तिमत्व घडले. परिवर्तन घडविण्याचे काम ग्रंथ करत असतात. अशी ही ग्रंथ वाचनाची चळवळ ही सुजाण समाज घडविण्यासाठी आवश्यक असून त्यास समाजाचे पाठबळ असणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन माजी सनदी अधिकारी पुरुषोत्तम भापकर यांनी केले. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचलनालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, यांच्या वतीने जिल्हास्तरीय छत्रपती संभाजीनगर ग्रंथोत्सव २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे. या ग्रंथोत्सवाचे मंगळवार, २४ मार्च रोजी उद्घाटन झाले.



ग्रंथोत्सवानिमित्त मंगळवारी सकाळी क्रांतीचौकातून ग्रंथ दिंडी काढण्यात आली होती. महापौर समीर राजुरकर यांच्या हस्ते या दिंडीचा शुभारंभ करण्यात आला. दिंडीत संविधान ग्रंथ ठेवून त्याची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी वरिष्ठ कोषागार अधिकारी वैजनाथ शेळके, मानव विकास आयुक्तालयाचे सहाय्यक आयुक्त सुनिल सुर्यवंशी, प्रकाशक संघटनेचे कुंडलिक अतकरे, शिक्षण विस्तार अधिकारी जालम चौरे, सहायक ग्रंथालय संचालक सुनील हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अधिकारी सुभाष साबळे आदींसह पारंपारिक वेषभूषा केलेले शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी यात सहभागी झाले होते. समता दर्शन वाचनालय सभागृह, समता नगर येथे ग्रंथोत्सवाचे मुख्य आयोजन करण्यात आले होते. तेथील प्रांगणात स्थापीत केलेल्या ग्रंथ प्रदर्शन स्टॉलचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी सनदी अधिकारी पुरुषोत्तम भापकर, सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनिल हुसे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संतोष जाधव, ज्येष्ठ साहित्यीक डॉ. दादा गोरे, ग्रंथ निवड समिती सदस्य गुलाबराव मगर आदींची उपस्थिती होती.

आपल्या उद्घाटनपर भाषणात पुरुषोत्तम भापकर म्हणाले की, ग्रंथोत्सव म्हणजे साहित्य आणि शिक्षणाची वारी असून आपण सारेत्याचे वारकरी आहोत. ग्रंथालयांना आपण आपली तीर्थक्षेत्रे मानली पाहिजेत. ग्रंथसंपदा ही आपल्या प्रगतीचे दिशा दाखवते. ज्ञान आणि माहितीच्या या प्रवाहात वाचक ते ग्रंथनिर्मिती क्षेत्रातील प्रत्येकाचे योगदान आहे.समाज सुजाण बनविण्यात ग्रंथांचे मोठे योगदान आहे.मुल्यवान समाज बनवायचा संकल्प आपण साऱ्यांनी करुन त्यासाठी ग्रंथोत्सवासारख्या उपक्रमांना पाठबळ द्यायला हवे.प्रत्येक गावात ग्रंथालय आवश्यक आहे. खेळणं आणि वाचणं यातून समृद्ध व्यक्तिमत्व आकाराला येतं. मानवी समाजाचे वैचारीक भरण पोषण पुस्तकांमुळे होते, असेही भापकर यांनी सांगितले.

### काव्यवाचनाने आली रंगत

■ समतानगर येथील समता दर्शन वाचनालयाच्या सभागृहात सायंकाळी काव्यवाचन करण्यात आले. काव्यवाचन सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा.ललित अधाने हे होते. तर विष्णू सुरासे, हबीब भंडारे, देवानंद पवार, माधुरी चौधरी, सिंधु क्षीरसागर, कावेरी खरात, भक्ती शिह्रे, धम्मपाल जाधव यांनी कवितांचे सादरीकरण करीत श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तर ‘कृत्रिम बुद्धीमत्ता आणि ग्रंथालये’ या विषयावरील परिसंवादात जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, डॉ. गणेश कुलकर्णी, प्रा. अनिल लहाने यांनी आपले विचार मांडले.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री. सचिन रामकृष्ण काळे, रा. हमाल गल्ली पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

गैरअर्जदार: मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर

विषय: जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३ (३) प्रमाणे जन्म नोंद आदेश मिळणे बाबत

अर्जदार **श्री. सचिन रामकृष्ण काळे,** रा.हमाल गल्ली पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांच्या मुलगी नामे **जान्हवी सचिन काळे** मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथे जन्म नोंद नसल्यामुळे जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम-१९६९ (सुधारणा २०२३) च्या कलम १३ (३) नुसार उशिरा जन्म नोंद करण्याचा आदेश मिळण्यासाठी या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

सदरील अर्जानुसार **जान्हवी सचिन काळे** यांचा जन्म दिनांक १५.०३.२००८ रोजी मौजे पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथे झाला असल्याचे कळविले आहे. त्यानुसार मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय पैठण, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथील जन्म / मृत्यु रजिष्टरला उशिरा जन्म नोंद करण्यासाठी आदेश निर्गमित करणे प्रस्तावित आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आपला उजर अथवा आक्षेप या न्यायालयात किंवा संबंधीत ग्रामपंचायत / नगरपंचायत / नगरपरिषद व ग्राम महसूल अधिकारी कार्यालयात लेखी स्वरुपात नोंदवावा, मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांच्या मागणीनुसार सदरची नोंद करण्याबाबत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
ठिकाण: छत्रपती संभाजीनगर
दिनांक: २३/०३/२०२६

स्वाक्षरीत/-

शिक्का

**(निलम बाफना)**
**उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी, पैठण- फुलंब्री**
**मुख्यालय-छत्रपती संभाजीनगर**


दर रविवारी मोफत तपासणी



नस कमजोरी, शिघ्रपतन, थंडपणा, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा.

डॉ.ए.एच.शेख

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बस स्टॅण्डसमोर,हॉटेल मिझाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

9021111549 / 7020614645

www.drshaikhah.com


## नगर पंचायत कार्यालय, मंठा
### जि. जालना

क्रमांक: दिनांक :२५/०३/२०२६

प्रकरण अर्ज श्री./सौ./ श्रीमती **द्वारकाबाई ज्ञानदेव घुगे**

**घरपट्टी मध्ये नांव बदलणे संबंधी**

या जाहीर पत्रकाद्वारे सर्व नगरवासियांना कळविण्यात येते की, श्री./सौ./श्रीमती **गिरजा भगवान इघारे** यांनी **मंठा** येथील घर क्र. / प्लॉट क्र.(२२०८/७६/२) मोहल्ला **मंठा** त्यांचे नावावर बदलणे हा अर्ज दिला आहे. तरी या बदलण्यासंबंधी कोणास काही आक्षेप उजर असेल तर त्यांनी पंधरा दिवसाच्या आत लेखी पुरावा स्वतः या कार्यालयात उपस्थित राहून आपला आक्षेप सादर करावा नसता मुदत संपताच घरपट्टी व रजिस्टरमध्ये नांव टाकण्यात येईल नंतर कोणत्याही प्रकारचा उजर स्विकारला जाणार नाही.

-: चतुः सिमा : -
पुर्वेस - शालन कचरे जागा
पश्चिमेस-शुभम गंगाराम हावळे यांची जागा
दक्षिणेस :- रस्ता
उत्तरेस :- वाघमारे यांची जागा

स्वाक्षरीत/-

शिक्का

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत मंठा**

## न्यूज ब्रीफ

### दुचाकी घसरून तरुण ठार

**छत्रपती संभाजीनगर :** दौलताबाद येथील दर्गात दर्शनासाठी जाणाऱ्या एकाची भरधाव दुचाकी घसरून अपघात झाला. या घटनेत एक जण ठार झाल्याची घटना शनिवार, २१ मार्च रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास घडली. याप्रकरणी दौलताबाद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सलीम पठाण (२३ वर्ष) रा. रोशनगेट असे मयताचे नाव आहे. याप्रकरणी सलीम पठाण सलमान पठाण यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार, फिर्यादी हे त्यांचे मित्र सलीम पठाण सलमान पठाण यांच्यासह दोन मित्र मोटारसायकलवर दौलताबाद येथील दर्गात दर्शनासाठी जात होते. सलीम पठाण हा दुचाकी चालवत असताना अचानक भरधाव मोटारसायकल स्लीप झाली. या अपघातात गंभीर जखमी झाला. घाटी रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्यास तपासून मयत घोषीत केले.

### सेंट्रींग कामगारावर दगडाने हल्ला

**छत्रपती संभाजीनगर :** किरकोळ कारणावरून सेंट्रींग काम करणाऱ्या एका कामगारावर दगडाने हल्ला केल्याची घटना बायजीपुरा परीसरात घडली. याप्रकरणी जिन्सी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्वर बागवान, आसिफ बागवान रा. बायजीपुरा अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी आमेर सोहेल लतीफखान रा. न्यू बायजीपुरा यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार सोमवार, २३ मार्च रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास फिर्यादी चहा पिण्यासाठी जात असताना आरोपीने विनाकारण शिवीगाळ केली. जाब विचारला असता रूमालात दगड बांधून फिर्यादीच्या डाव्या हाताच्या कोपरावर तसेच हाताच्या पंजावर मारून जखमी केले.

### घरफोडीमध्ये दीड लाखांचा ऐवज लंपास

**वैजापूर :** घर फोडुन चोरट्यांनी रोख रक्कमेसह सोन्या चांदीचे दागिने असा एकूण दीड लाख रुपये किंमतीचा ऐवज लंपास केला. ही घटना वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथे रविवार, २२ मार्च रोजी रात्री घडली. खंडाळा येथील ज्ञानेश्वर वसंतराव पवार यांच्या घरात मध्यरात्री चोरट्यांनी प्रवेश केला. चोरट्यांनी घरातील रोख रक्कम व सोन्या चांदीचे दागिने असा एकूण दीड लाख रुपयांचा ऐवज चोरून नेला. ही घटना सोमवार, २३ मार्च रोजी सकाळी उघडकीस आली. पवार यांच्या मुलाचे नुकतेच लग्न झाले होते. त्यामुळे त्यांच्या घरात दागिने व मौल्यवान वस्तू होत्या.

### हरिगिरी महाराज संस्थानच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर भालेराव

**वेरूळ :** येथील श्री संत हरिगिरी महाराज संस्थानच्या विश्वस्त मंडळाची रविवारी निर्णय अधिकारी किसन साठे यांच्या अध्यक्षतेत निवडणूक पार पडली. यात अध्यक्षपदी ज्ञानेश्वर भालेराव, उपाध्यक्ष शिवाजी भालेराव, सचिव श्रीकांत भालेराव, इतर कार्यकारिणीत सहसचिवपदी प्रा. अंबादास सगट, कोषाध्यक्षपदी रंगनाथ वाघुले यांची निवड झाली. सदस्य म्हणून हरिदास खरात, किसनराव साठे, कारभारी भालेराव, गजानन पवार, अंकुश साबळे, बाजीराव कांबळे, अनिल आव्हाड व गजानन भालेराव यांची निवड केली.

## निधन वार्ता

### अंजनाबाई संसारे



**वरठाण :** अंजनाबाई माधु संसारे (९५ वर्ष), रा. वरठाण, ता. सोयगाव यांचे वृध्दापकाळाने मंगळवार, २४ मार्च रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर वरठाण येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, पाच मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## बुकींग करुन १५ दिवस सिलेंडर मिळेना..

# वाळूज एमआयडीसी परिसरात गॅस टंचाईने नागरिक त्रस्त

**वाळूज महानगर/प्रतिनिधी**





अमेरिका-इस्त्राईल आणि इराण यांच्यात गेल्या २० ते २५ दिवसापासून सुरु असलेल्या युध्दाचा परिणाम वाळूज एमआयडीसी, बजाजनगर, वाळूज परिसरातील घरगुती गॅस वितरण सेवेवर पडला आहे. गॅसची बुकींग करुनही १० ते १५ दिवस सिलेंडर मिळत नसल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. तसेच अनेकांना सिलेंडर डिलिव्हरीचा मॅसेज येऊनही प्रत्यक्षात सिलेंडर मिळत नसल्याचा धक्कादायक प्रकारही समोर आला आहे.

अमेरिका-इस्त्राईल आणि इराण यांच्यात गेल्या २० ते २५ दिवसापासून सुरु असलेल्या युध्दाचा परिणाम व्यावसायीक गॅस वितरणावर आणि घरगुती गॅस वितरण सेवेला बसला आहे. व्यावसायीक गॅस वितरण पूर्णपणे बंद असल्याने वाळूज एमआयडीसी परिसरातील व्यावसायीकांना स्वयंपाक करण्यासाठी चुली पेटवाव्या लागल्या आहेत. दरम्यान, घरगुती गॅस घेण्यासाठी ग्राहकांना तासन तास रांगेत उभे राहूनही सिलेंडर मिळत नाही. तसेच बुकींग करुनही दहा ते पंधरा दिवस सिलेंडर मिळत नसल्याने गॅस ग्राहक नागरिक त्रस्त झाले आहेत.

अनेकांना सिलेंडर डिलिव्हरीचा मॅसेज येऊनही प्रत्यक्षात सिलेंडर मिळत नसल्याने गॅस ग्राहकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. गॅस ग्राहकाने एजन्सीकडे तक्रार करण्याचा प्रयत्न केल्यास एजन्सीवरील कर्मचारी ग्राहकांना उध्दटपणे उत्तरे देतात. तसेच वेळप्रसंगी शिवीगाळ केल्याचे प्रकारही समोर आले आहेत.

दरम्यान, जिल्हा परिषद सदस्य सचिन कल्याणराव गरड यांनी गॅस एजन्सीला अचानकपणे भेट देऊन नागरिकांच्या तक्रारी ऐकून घेतल्या. तसेच एजन्सी व्यवस्थापनाला कडक शब्दात तंबी दिली. गॅस ग्राहकांना अपमानास्पद दिलेली वागणूक कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही असे त्यांनी एजन्सी चालकांना सांगितले. तसेच दररोज किती सिलेंडर आले, किती सिलेंडर वितरीत केले याचा तक्ता दर्शनी भागात लावण्याच्या सुचना दिल्या.

### जिल्हाधिकाऱ्यांना दिले निवेदन

■ जिल्हा परिषद सदस्य सचिन गरड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन घरगुती, व्यावसायीक आणि औद्योगिक गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या गॅस एजन्सीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. त्याचप्रमाणे गॅस टंचाईवर तोडगा काढण्यासाठी अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन तोडगा काढण्याची मागणी केली.

## रोशन गेट ते आझाद चौक रस्त्यावरील अतिक्रमणे जमीनदोस्त

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**



महानगरपालिकेच्या वतीने प्रभाग क्रमाक तीन अंतर्गत येणाऱ्या रोशन गैट, किराडपुरा ते आजाद चौक रस्त्यावरील अतिक्रमणे निष्काशित करण्याची कारवाई मंगळवार, २४ मार्च रोजी करण्यात आली. या कारवाईत महानगरपालिकेने ३२ अतिक्रमणे जमीनदोस्त करण्यात आली. महानगरपालिकेने अतिक्रमणाविरुध्द केलेल्या या कारवाईमुळे अतिक्रमणधारकांचे धाबे दणाणले आहेत.

किराडपुरा येथील राम मंदिरात गुरुवार, २६ मार्च रोजी रामजन्मोत्सव साजरा करण्यात येणार असून मंदिरात येणाऱ्या भाविकांना आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होऊ नये यासाठी महानगरपालिकेच्या वतीने रोशनगेट किराडपुरा ते आजाद चौक रस्त्यावरील अतिक्रमणे निष्काशित करण्याची कारवाई मंगळवारी करण्यात आली. या कारवाईत महानगरपालिकेने रस्त्यावर आलेले शेड, हॉटेल गॅरेज, पानटपऱ्यांचे अतिक्रमण जेसीबीच्या सहाय्याने दूर केले. या कारवाईत ३२ अतिक्रमणे जमिनदोस्त करण्यात आली. तसेच रस्त्यावर बांधकामाचे साहित्य, वाळू, सिमेंट कच, विटा रस्त्यावर ठेवून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्यावर माजी सैनिकामार्फत दंडात्मक कारवाई करण्यात आली. त्याचप्रमाणे दहा चारचाकी बेवारस वाहने टोईंगव्हॅनद्वारे उचलून गरवारे क्रीडा संकूल येथे जमा करण्यात आली.

ही कारवाई मनपाचे अतिक्रमण नियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक बुधवंत, उपायुक्त सविता सोनवणे, सहाय्यक आयुक्त शेख रफिक, संजय सुरडकर, सय्यद जमशेद, रवींद्र देसाई, जिन्सी पोलिस ठाण्याचे कर्मचारी आगळे, परदेशी, हनीफ, फिरोज शेख, मनपा नागरी मित्र पथकाचे प्रमोद जाधव आदींनी केली.

## 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा' फज्जा

### वरिष्ठ अधिकाऱ्यांची दांडी, नागरिकांसह नेत्यांत संताप

**करमाड/प्रतिनिधी**




शासनाच्या महसूल विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानाचा करमाड येथे मंगळवार, २४ मार्च रोजी अक्षरशः फज्जा उडाल्याचे चित्र पाहायला मिळाले. जिल्हा व तालुका स्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कार्यक्रमाकडे पाठ फिरवल्याने नागरिकांसह स्थानिक पदाधिकाऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली होती.

करमाड येथील गंगासागर मंगल कार्यालयात आयोजित शिबिरात जिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, वनाधिकारी आदी महत्त्वाचे अधिकारी अनुपस्थित राहिले. परिणामी, केवळ दुय्यम दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. यामुळे शासनाच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची प्रतिष्ठा धुळीस मिळाल्याची भावना उपस्थितांमधून व्यक्त करण्यात आली. दरम्यान, कार्यक्रम अर्धवट पडण्याची वेळ येत असतानाच उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड यांनी उपस्थिती लावल्याने पुढील कार्यक्रम कसाबसा मार्गी लागला. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष रामूकाका शेळके, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दत्तात्रय उकर्डे यांनी प्रशासनाच्या उदासीनतेवर जोरदार टीका केली. सामान्य जनतेसाठी शासन कोट्यवधींचा निधी खर्च करत असताना अधिकारी मात्र गांभीर्य दाखवत नाहीत. अशा अधिकाऱ्यांवर कडक कारवाई व्हावी, अशी मागणी त्यांनी यावेळी केली.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या साधना कुलकर्णी, पंचायत समिती सदस्या गीता कोरडे, माजी सरपंच कैलास उकर्डे, शेकटाचे मंडळ अधिकारी अभिजित शर्मा, कचरू उकर्डे, कृष्णा उकर्डे, उपअधीक्षक भूमी अभिलेख निलेश उंडे, नायब तहसीलदार सतीश भदाणे, कैलास वाघमारे, परेश चौधरी यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## प्रलंबित प्रकरणे दोन महिन्यांत निकाली काढा : पापळकर

### शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील प्रश्नांबाबत आढावा बैठक

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**



शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील संपादित जमिनीच्या ७/१२ उताऱ्यात मुळ मालकांच्या नावांबाबत विसंगती आढळून आल्याने, पूर्वीच्या बक्षीसपत्रे व दानपत्रांच्या नोंदी महसूल अभिलेखात न झाल्याची बाब निदर्शनास आली. याबाबत आवश्यक दुरुस्तीची तातडीने कार्यवाही करुन दोन महिन्यात प्रकरणे निकाली काढण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी दिले आहेत. निवाड्यातील शिल्लक क्षेत्राच्या मोबदल्याबाबत, ७० टक्के मोबदला वितरित झाला असून उर्वरित २० टक्के मोबदला विनापरवानगी खरेदी-खत इत्यादी कारणांमुळे प्रलंबित असल्याचे स्पष्ट करण्यात आले. अशा सर्व प्रकरणांचा वस्तुनिष्ठ आढावा घेऊन नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त पापळकर यांनी दिले आहेत.

शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. बैठकीत बिडकीन एमआयडीसी साठी संपादित करण्यात आलेल्या वर्ग-२ जमिनीच्या मोबदल्याचे वाटप तसेच शिल्लक प्रकरणांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ही सर्व प्रकरणे किमान दोन महिन्यांत अंतिम करण्याचे निर्देश देण्यात आले. विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीला एम.आय.टी.एल., डी.एम.आय.सी. प्रकल्पग्रस्त समिती, बिडकीन लोकप्रतिनिधी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. फळझाडे, विहिरी, बोरवेल व इतर मालमत्तांच्या मोबदल्याबाबत डी.एम.आय.सी.कडे निधीची मागणी करण्यात आली असून निधी प्राप्त होताच प्रलंबित खातेदारांना मोबदला वितरित केला जाईल, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. पोटखराब जमिनीच्या मोबदल्याबाबत शेतकरी काम बंद करत असल्याची बाब गांभीर्याने घेण्यात आली. पात्र लाभधारकांची महसूल अभिलेखातून माहिती काढून नियमानुसार मोबदला वाटप करण्याचे निर्देश उपविभागीय अधिकारी पैठण, फुलंब्री यांना देण्यात आले. तसेच करमाड गट क्रमांक ८१ बाबत तात्काळ मोजणी करून हद्द व खुणा निश्चित करण्याचे निर्देश भूमी अभिलेख विभागाला देण्यात आले.

तसेच गट क्रमांक ७४ मधील संपादित जमिनीच्या मोबदला वितरणाबाबत अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बैठकीत इतर संबंधित विषयांवरही सखोल चर्चा झाली. औद्योगिक प्रकल्पांना गती देण्यासाठी सर्व यंत्रणांनी सकारात्मक भूमिका घेऊन प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी यांनी दिलेत.

## पर्यटकांसह महिलांसाठी विशेष बस सुरु करा : सभापती मकरीये

### शहर विकासासाठी दिल्या महत्त्वाच्या सूचना

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**




महानगरपालिकेच्या वतीने शहरात स्मार्ट सिटी बस सेवा सुरू करण्यात आली आहे. या स्मार्ट बस सेवेचा लाभ दररोज हजारो प्रवासी घेत आहेत. येत्या काळात पर्यटकांसाठी छत्रपती संभाजीनगर दर्शन बस आणि महिलांसाठी विशेष बस सेवा सुरु करा असे निर्देश मनपा स्थायी समितीचे सभापती अनिल मकरीये यांनी स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच त्यांनी शहर विकासासाठी महत्वाच्या सूचनाही स्मार्ट सिटी प्रशासनाला दिल्या आहेत.

मनपा स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी नुकतीच स्मार्ट सिटी कार्यालयास भेट देऊन स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत सुरु असलेल्या कामांचा आढावा घेतला. यवोळी मनपा उप आयुक्त अपर्णा थेटे, शहर बससेवेचे मुख्य चालन व्यवस्थापक संजय सुपेकर, मालमत्ता व्यवस्थापन विभागाचे सहाय्यक आयुक्त संजय चामले, स्मार्ट सिटीचे मुख्य वित्त अधिकारी उत्तम चव्हाण, लेखा अधिकारी अनिलदत्त कोथळीकर, मनपाचे जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद यांच्यासह स्मार्ट सिटीचे अधिकारी उपस्थित होते. शहर बससेवेचे मुख्य चालन व्यवस्थापन संजय सुपेकर यांनी शहरात स्मार्टबसचे किती स्टॉप आहेत, किती चालक, वाहक कार्यरत आहेत, सिटी बस सेवेचे उत्पन्न किती आहे, स्मार्ट सिटी बसमध्ये असलेले सीसीटीव्ही कॅमेरे चालू आहेत का, बसेस निर्धारित वेळेवर बसस्थानकावर जातात का याची माहिती दिली.

दरम्यान, शहरात पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांसाठी संभाजीनगर दर्शन बससेवा आणि महिलांसाठी विशेष बससेवा सुरु करण्याचे निर्देश स्थायी समिती सभापती अनिल मकरिये यांनी स्मार्ट सिटी प्रशासनास दिले. तसेच अनाधिकृत जाहिरात फलक काढून एजन्सीकडे थकीत असलेले बिलाबाबत संबंधितांना नोटीसा द्याव्यात असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

**तंत्रज्ञानाचा वापर लोकहितासाठी करा..**

तंत्रज्ञानाचा वापर केवळ देखरेखीसाठी मर्यादित न ठेवता तो लोकहितासाठी अधिक प्रभावीपणे राबवला पाहिजे. शहरातील बेकायदा पार्किंग आणि वाहतूक कोंडी रोखण्यासाठी पीए सिस्टमचा वापर दिवसातून किमान दोनदा किंवा त्यापेक्षा जास्त वेळा करावा, अशी सूचना सभापती अनिल मकरिये यांनी केली. तसेच जुन्या बाजारपेठेतील अतिक्रमणे तातडीने हटवून तिथला आर्थिक व्यवहार आणि वाहतूक सुरळीत करण्यावर त्यांनी भर दिला. स्मार्ट सिटी बस सेवेबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, महापालिकेचा उद्देश पैसा कमावणे नसून नागरिकांना उत्तम सुविधा देणे हा आहे, त्यामुळे ही सेवा अधिक कार्यक्षम आणि लोकभिमुख कशी करता येईल याकडे लक्ष द्यावे अशा सूचना त्यांनी केल्या.

## स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**चिंचोली लिंबाजी/प्रतिनिधी**




कौशल्याबाई गोरे स्मृती प्रतिष्ठान संचलित स्वामी विवेकानंद प्रायमरी इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच उत्साहात पार पडले. यावेळी शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले.

कन्नड तालुक्यातील करंजखेड येथे असलेल्या स्वामी विवेकानंद प्रायमरी इंग्लिश स्कूलच्या वार्षिक स्नेहसंमेलनास जिल्हा परिषद सदस्य अर्जुन पाटील, करंजखेड गावचे उपसरपंच सचिन पवार, कन्नड समितीचे सभापती सुप्रिया घुगे, उपसभापती माया सुरोशे, ललित सुराशे, करंजखेड पंचायत समितीच्या सदस्या कमल निकम, कल्याण पाटील, घाटशेंद्रा पंचायत समिती सदस्य कमल गोरे, संस्थेचे अध्यक्ष प्रवीण गोरे, खुशालराव पाटील गाढवे, रायभान जाधव, अलिम चाऊस, गणेश माळी, आनंदा सुराशे, हिंदू मुस्लिम एकता संघाचे अध्यक्ष कलीम पेंटर, रामभाऊ ससे, सिध्दार्थ सोनवणे, संजय पाटील, दयानंद शेठ, सुरेश जंजाळ, नेवपूरचे माजी सरपंच भरत आवारे, दत्ता मुरमे, विष्णू पालोदकर, मौसीन सय्यद, अमोल जंजाळ, दीपक मगर, अजय जंजाळ, संदीप पल्हाळ, मीना देशमुख, वर्षा गाढवे, राहत शेख, वंदना जाधव, असलम मिर्झा, दयानंद चौतमाल ,गणेश देवरे, श्रीराम गोरे, शिवराज गोरे ,केशव पल्हाळ आदींची उपस्थिती होती.

## वाढदिवसाच्या पार्टीत हाणामारी

**छत्रपती संभाजीनगर :** वाढदिवसाच्या पार्टीत एकावर हल्ला करीत कानातील सोन्याची बाळी, हातातील चांदीचे ब्रासलेट हिसकावल्याची घटना म्हाडा कॉलनी धुत हॉस्पिटलजवळ घडली. याप्रकरणी सिडको एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सार्थक भालेराव रा. पुंडलिकनगर, राजन इंगोले अशी आरोपींची नावे आहेत. आनंद धुळे रा.मिलींदनगर रेल्वेपटरी गल्ली नं. ३ यांनी फिर्याद दिली. २२ मार्च रोजी रात्री ९ वाजेच्या सुमारास फिर्यादी मित्राच्या वाढदिवसासाठी कांचन हॉटेल धूत हॉस्पिटलजवळ म्हाडा कॉलनी येथे गेले होते. त्यावेळी आरोपींनी इंस्टाग्रामवर शिवीगाळ का केली या कारणावरून आरोपींनी मारहाण करीत कानातील बाळी, चांदीचे ब्रासलेट तसेच मोबाईल हिसकावून घेतला. चाकूने दुचाकीचे सीट फाडले.

### गल्लेबोरगाव परिसरात शेतकऱ्यांची लगबग

# अवकाळीची धास्ती : कापणी केलेल्या ज्वारीची मळणी सुरु

**खुलताबाद/प्रतिनिधी**



गेल्या आठवड्यात १८ आणि १९ मार्च रोजी अवकाळी पावसाने दिलेल्या तडाख्यानंतर कापनी करुन ठेवलेल्या ज्वारीची मळणी करण्याच्या कामाला शेतकऱ्यांनी पसंती दिली आहे. खुलताबाद तालुक्यातील गल्लेबोरगाव परिसरात मळणी यंत्राच्या सहाय्याने ज्वारीची मळणी करण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु असल्याचे चित्र सध्या दिसून येत आहे.

यंदाच्या वर्षी हंगामाच्या सुरुवातीला हवामान अनुकूल राहिल्यामुळे ज्वारी पिकाची वाढ चांगली झाली. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांना समाधानकारक उत्पादनाची अपेक्षा आहे. परंतु गेल्या आठवड्यात १८ व १९ मार्च रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे गहु, मका, ज्वारी, ऊस आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे शेतकऱ्यांनी कापणी करुन ठेवलेल्या ज्वारीच्या पिकाची मळणी करण्यास सुरुवात केली आहे. अत्याधुनिक मळणी यंत्राद्वारे ज्वारीची मळणी करण्यासाठी शेतकऱ्यांची लगबग सुरु असल्याचे चित्र सध्या खुलताबाद तालुक्यातील विविध गावात दिसून येत आहे. मळणी केलेली ज्वारी पोत्यांत भरुन ती घरात साठविण्यासाठी शेतकरी धावपळ करतांना दिसून येत आहेत.

दरम्यान, सध्या ज्वारी मळणीचा हंगाम सुरू असल्यामुळे रोज वेगवेगळ्या शेतकऱ्यांच्या शेतात जाऊन मळणीचे काम करत आहोत. मळणी यंत्रामुळे कमी वेळात जास्त ज्वारीची मळणी करता येते. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ आणि मजुरीचा खर्च दोन्ही वाचत आहेत. हवामान बदलण्याची शक्यता असल्यामुळे अनेक शेतकरी लवकरात लवकर मळणी करून धान्य सुरक्षित करण्यासाठी घाई करत आहेत अशी माहिती गल्लेबोरगाव येथील मळणी यंत्र चालक विशाल महिपाल यांनी दिली.

### पीक समाधानकारक आले

■ यंदाच्या वर्षी निसर्गाने साथ दिल्यामुळे ज्वारीचे पीक समाधानकारक आले आहे. मळणी यंत्रामुळे कमी वेळात ज्वारीची मळणी पूर्ण होत असल्याने आम्हाला मदत होत असल्याचे गल्लेबोरगाव येथील शेतकरी अमोल भोजने यांनी सांगितले. तर मजुरांच्या कमतरतेमुळे मळणी यंत्राची मदत घ्यावी लागत असल्याचे मनोज बोडखे यांनी सांगितले.

## वेरूळ जि.प.शाळेत तोडफोड

**खुलताबाद/प्रतिनिधी**



तालुक्यातील वेरुळ येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या खिडक्यांची टवाळखोरांकडून तोडफोड करण्यात आल्याचा प्रकार सोमवार, २३ मार्च रोजी उघडकीस आला. वेरुळ येथे जिल्हा परिषदेची केंद्रीय शाळा असून या शाळेचे नुतनीकरण करुन शाळेचा कायापालट करण्यात आला आहे. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हितेश ठाकरे यांच्या पुढाकारातून आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने शाळेच्या खिडक्या बदलून रंगरंगोटी करण्यात आली आहे. टवाळखोरांनी शाळेच्या तीन खिडक्यांवर दगडफेक करुन खिडक्यांचे नुकसान केले. या घटनेमुळे पालकांतून तीव्र संताप व्यक्त केला जात असून टवाळखोरांवर कारवाई करण्याची मागणी पालकवर्गातून करण्यात येत आहे.

**नावात बदल**

मी कुबरा बी सय्यद उस्मान, रा.डोणगाव, ता.मेहकर, जि.बुलढाणा, माझ्या पासपोर्टवर माझ्या नावाच्या इंग्रजी अक्षरामध्ये Kubra असे न लिहिता Qubra व माझ्या पतीच्या नावाच्या इंग्रजी अक्षरामध्ये Sayyad असे न लिहिता Sayed असे नजर चुकीने लिहिले गेले. तरी Kubra व Qubra तसेच Sayyad व Sayed ह्या दोन नावाची व्यक्ती एकच असून ती मीच आहे, याची नोंद घ्यावी.

आपली - कुबरा बी सय्यद उस्मान



गुरुवार २६ मार्च २०२६ mahabhoomimarathwada@gmail.com

# जालना भूमि





## न्यूज ब्रीफ

### डॉ.शिवानी वाघ यांना बीडीएस पदवी प्राप्त



**पिंपळगाव रेणुकाई :** भोकरदन तालुक्यातील पारध येथील डॉ.शिवानी वाघ यांना डी.वाय. पाटील मेडिकल कॉलेज पुणे येथे बी.डी.एस. पदवी पूर्ण करून मंगळवार, २४ मार्च रोजी पदवी प्राप्त केली आहे. राजर्षी शाहू महाविद्यालयाचे अधीक्षक किशोर वाघ यांची डॉ.शिवानी या कन्या असून भिलदरी बहुउद्देशीय संस्थेचे सचिव, अध्यक्ष डॉ.सुखदेव मांटे व रेवती मांटे यांची भाची आहे. यावेळी डॉ.राजाराम डोईफोडे, डॉ. विनायक वाघ, सतीश वाघ, प्रा.अमोल बांडगे, प्रा. धनराज भोसले, प्रा.मंगेश लोखंडे, प्रा.राजू धनवई, प्रा.दिनेश कापरे, प्रा. अर्जुन राजबिंडे, विलास लोखंडे, विवेक अवसरमोल, अमोल लोखंडे, विश्वास लोखंडे, वैभव भोरकडे आदींनी या यशाबद्दल त्यांचे कौतुक केले.

### डॉ. सोमनाथ जईद यांना पुरस्कार

**जालना :** वैद्यकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल जालना येथील लाईफ केअर होमिओपॅथी क्लिनिकचे संचालक होमिओपॅथी तज्ज्ञ डॉ. सोमनाथ जईद यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार २०२६ ने सन्मानित करण्यात आले. हा प्रतिष्ठित पुरस्कार मुंबई येथील यशवंतराव चव्हाण केंद्रात आयोजित एका समारंभात प्रदान करण्यात आला. या सोहळ्यात अभिनेत्री ईशा कोप्पीकर तसेच रुद्र प्रताप पाटणीकर यांच्या हस्ते डॉ. जईद यांना सन्मानित करण्यात आले. होमिओपॅथी क्षेत्रात रुग्णसेवेसाठी केलेल्या उत्कृष्ट आणि समर्पित कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. हा सन्मान स्वीकारताना डॉ. जईद म्हणाले की, हा पुरस्कार माझ्या रुग्णांचा विश्वास आणि टीमच्या मेहनतीचे फलित आहे. यापुढेही अधिक समर्पणाने रुग्णसेवा करण्याचा माझा प्रयत्न राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

### लोकशाही दिनाचे ६ एप्रिलला आयोजन

**जालना :** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन महिन्याचे पहिल्या सोमवारी करण्याबाबत निर्देश आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार, ६ एप्रिल रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांनी दिली. लोकशाही दिनाकरीता अर्जदारांनी विहीत नमुन्यात अर्ज १५ दिवस आधी २ प्रतीत पाठवणे आवश्यक आहे. लोकशाही दिनामध्ये अर्ज देताना संबंधितांनी आपापल्या तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व या तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊन देखील कोणतीही कार्यवाही झाली नाही, अशाच अर्जदाराने दोन प्रतीमध्ये अर्ज सादर करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### रमजान ईदनिमित्त नमाज पठण

**सावंगी अवघडराव :** पवित्र रमजान महिन्याच्या सांगतेनंतर भोकरदन तालुक्यातील सावंगी अवघडराव आणि परिसरात ईद-उल-फितर (रमजान ईद) उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील मुस्लिम बांधवांनी परंपरेनुसार ईदगाह मैदानावर एकत्रित येऊन नमाज पठण केले. देशात शांतता व समृद्धी नांदो, अशी दुआ केली. गावातील ईदगाह मैदानावर नमाजसाठी गर्दी झाली होती.

## पाटबंधारे विभागाची पोलीस बंदोबस्तात कारवाई

# ५२ लाखांच्या थकबाकीपोटी भोकरदन पालिकेचे जॅकवेल सील !

सुरेश गिराम


**भोकरदन :** ऐन उन्हाळ्याच्या तोंडावर भोकरदन शहरावर भीषण पाणीटंचाईचे संकट ओढवले असून, नगर परिषदेच्या ढिसाळ नियोजनाचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. तब्बल ५२ लाख रुपयांची पाणीपट्टी थकीत असल्याने पाटबंधारे विभागाने जुई धरणावरील नगर परिषदेचा जॅकवेल पोलीस बंदोबस्तात सील केला. या कारवाईमुळे संपूर्ण शहराचा पाणीपुरवठा ठप्प झाला. अखेर नगरपालिका प्रशासनाने तातडीने २० लाख रुपये भरल्यानंतर हे सील उघडण्यात आले असून, शहराचा पाणीपुरवठा कसाबसा पूर्वपदावर आला आहे.

दानापूर येथील जुई धरणावरून शहराला पाणीपुरवठा केला जातो. मात्र, गेल्या अनेक दिवसांपासून नगर परिषदेने पाटबंधारे विभागाची ५२ लाख रुपयांची थकबाकी भरली नव्हती. वारंवार नोटीस देऊनही दाद न मिळाल्याने, मार्च अखेरच्या वसुलीसाठी पाटबंधारे विभागाने आक्रमक पवित्रा घेतला. शाखा अभियंता पी.आर.सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस बंदोबस्तात जॅकवेलला कुलूप ठोकण्यात आले. जॅकवेल सील झाल्याने शहराच्या जलवाहिन्या कोरड्या पडल्या आणि नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली.





जॅकवेल सील होताच पालिकेच्या वर्तुळात मोठी धावपळ उडाली. पाणीपुरवठा खंडित झाल्याने प्रशासनावर चहुबाजूंनी टीका होऊ लागली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नगर परिषदेने तातडीने दोन, तीन टप्प्यात २० लाख रुपये पाटबंधारे विभागाकडे जमा केले. ही रक्कम भरल्यानंतर विभागाने जॅकवेलचे सील काढले. मात्र, अद्याप ३२ लाख रुपयांची थकबाकी शिल्लक असल्याने, उन्हाळ्याच्या उर्वरित काळात पुन्हा अशीच कारवाई होण्याची शक्यता नाकारता येत नाही. धरणात पुरेसे पाणी असूनही केवळ प्रशासकीय दिरंगाई आणि थकबाकीमुळे शहरावर पाणीबाणी ओढवली आहे. नियोजनशून्य प्रशासनामुळे गेल्या चार वर्षांपासून



प्रशासक असूनही पाणीपट्टी वसुली आणि थकबाकीचा प्रश्न सुटलेला नाही. मालमत्ता कराच्या वसुलीअभावी पालिकेची आर्थिक स्थिती बिकट असल्याचे सांगितले जात आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकांमध्ये मुबलक पाणी देण्याचे आश्वासन देणारे प्रतिनिधी आता या गंभीर प्रश्नावर काय भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नागरिकांचा संताप

■ नियमित पाणीपट्टी भरूनही प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे पाणी तोडले गेल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. २० लाख भरून तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी, उर्वरित ३२ लाखांच्या थकबाकीचे काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. ऐन उन्हाळ्यात पाणी प्रश्नाचे राजकारण न करता प्रशासनाने कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी जोर धरत आहे.

### थकबाकी टप्प्याटप्प्याने भरणार



नगर परिषदेच्या वतीने थकबाकीपोटी टप्प्याटप्प्याने पैसे भरले जात आहेत. गेल्या दोन दिवसात आणि बुधवारी मिळून आम्ही २० लाख रुपये पाटबंधारे विभागाकडे जमा केले आहेत. मालमत्ता कर वसुलीमध्ये काही अडचणी असल्याने पूर्ण थकबाकी एकदम भरणे शक्य झाले नाही, मात्र नागरिकांची गैरसोय होऊ नये, म्हणून आम्ही तातडीने मोठा निधी उपलब्ध करून दिला आहे. आता पाणीपुरवठा पूर्ववत करण्यात आला असून उर्वरित रक्कमही लवकरच भरली जाईल.

– **अजय व्यवहारे**, पाणीपुरवठा अभियंता, नगर परिषद, भोकरदन

### थकबाकी न भरल्यास पुन्हा कारवाई

थकीत पाणीपट्टीबाबत नगर परिषदेला अनेक वेळा नोटीस बजावण्यात आली होती, परंतु त्यांच्याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळाला नव्हता. मार्चअखेर वसुलीचे वरिष्ठ स्तरावरून कडक आदेश असल्याने आम्हाला नाईलाजास्तव पोलीस बंदोबस्तात जॅकवेल सील करण्याची कारवाई करावी लागली. बुधवार, २५ मार्च रोजी पालिकेने २० लाख रुपये भरले आहेत. त्यामुळे आम्ही सील उघडले आहे. मात्र, उर्वरित ३२ लाखांची थकबाकी त्वरित न भरल्यास पुन्हा नियमानुसार कारवाईचा विचार करावा लागेल.

– **पी.आर.सोनवणे**, शाखा अभियंता, पाटबंधारे विभाग

## अंमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला बसणार चाप

### अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक

जालना / प्रतिनिधी

जिल्ह्यातील अंमली पदार्थांच्या वाढत्या गैरवापराला आळा घालण्यासाठी प्रशासनाने पावले उचचली आहे. जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीची बैठक बुधवार, २५ मार्च रोजी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांच्या अध्यक्षेत संपन्न झाली. बैठकीत अंमली पदार्थ प्रतिबंध करण्यासाठी उपायोजनाबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी बैठकीस जिल्हा रुग्णालयाचे डॉ.पी.एम. कुलकर्णी, राज्य उत्पादन शुल्क विभागाचे संजय ताकवाले, कृषी अधीकारी सचिन पांचाळ, समाज कल्याण विभागाचे एल.बी. बारगिरे सहायक आयुक्त अन्न व औषध प्रशासनचे जीवन जाधव, नायब तहसिलदार शैलेश राजमाने, पोलीस निरिक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन इंगेवाड यांची उपस्थिती होती.

या बैठकीत अमंली पदार्थ विरोधी कार्यकारी समितीच्या माध्यमातून विविध विभागांना समन्वयाने काम करण्याचे निर्देश देत अपर जिल्हाधिकारी मिसाळ म्हणाले की, अवैध पद्धतीने गावठी दारू व अमली पदार्थांची निर्मिती व विक्री रोखण्यासाठी कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले.

अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर पोलिसांनी तातडीने कारवाई करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, असे स्पष्ट करण्यात आले. तसेच महसूल विभागाने पोलीस कारवाई दरम्यान आवश्यक ती मदत करावी, असेही सांगण्यात आले. अन्न व औषध प्रशासनाला ग्रामीण भागातील वैद्यकीय दुकाने व दवाखान्यांवर नियमित तपासणी करून औषधांचा गैरवापर रोखण्याचे निर्देश देण्यात आले. विशेषतः एचवन गटातील औषधांची बेकायदेशीर विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच संबंधित दुकाने व डॉक्टरांचे परवाने रद्द करण्याबाबतही सूचना अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी दिल्या.



### शिक्षण विभागाने जनजागृती मोहीम राबवावी

■ शिक्षण विभागाने शाळा व महाविद्यालयांमध्ये अमली पदार्थांविरोधात जनजागृती मोहीम राबवावी, विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करावी, असे सांगण्यात आले. यासोबतच क्रीडा, आरोग्य व पोलीस विभागांनी संयुक्तपणे समुपदेशन व जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरवण्यात आले. जिल्ह्यातील नागरिकांनीही संशयास्पद हालचालींची माहिती प्रशासनाला देऊन सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले.

## नर्मदा पायी परिक्रमा पूर्ण

### पिंपळगाव रेणुकाईत गुरु माऊलींचा सत्कार

पिंपळगाव रेणुकाई/प्रतिनिधी

येथील गुरु माऊली चंद्रकला उत्तम सास्ते आणि केशरताई चिकटे यांनी नर्मदेची पायी परिक्रमा हभप विष्णु महाराज सास्ते यांच्या मार्गदर्शनाने यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचा संतोषी माता संस्थान व भक्त मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

चंद्रकला सास्ते यांनी ३ नोव्हेंबर २०२५ रोजी नर्मदा परिक्रमेचा प्रारंभ केला होता. अत्यंत कठीण आणि संयमाची परीक्षा पाहणारी ही परिक्रमा त्यांनी मंगळवार, २३ मार्च रोजी पूर्ण केली. सुमारे ३ हजार ७०० किलोमीटरचे अंतर त्यांनी पायी पार केले. या संपूर्ण प्रवासात त्यांनी भक्ती, श्रद्धा आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अनेक अडचणींवर मात करत परिक्रमा यशस्वी केली. परिक्रमा पूर्ण झाल्यानंतर गावात





धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मंगळवारी पहाटे ५ ते ६ या वेळेत रेणुका मातेचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर सकाळी ६ ते ७ या वेळेत हनुमंतरायाचा अभिषेक झाला. सकाळी ७ ते ८ या वेळेत गावातून नगरप्रदक्षिणा काढण्यात आली, ज्यामध्ये मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग घेतला. यानंतर सकाळी ९ ते ११ या वेळेत हरिभक्त पारायण एकनाथ महाराज चोपडे यांचे कीर्तन झाले. त्यांच्या कीर्तनातून भक्तीभाव जागृत झाला. पुढे कन्या पूजनाचा कार्यक्रम पार पडला. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

### हा प्रवास आध्यात्मिक साधनेचा

■ नर्मदेच्या कृपेने ही परिक्रमा पूर्ण करण्याचे भाग्य लाभले. हा प्रवास केवळ शारीरिक नव्हे, तर आध्यात्मिक साधनेचा होता. प्रत्येक क्षणी मातेचा आशीर्वाद आणि मार्गदर्शन मिळाले. या यशामागे माझ्या गुरूंचे आशीर्वाद, तसेच सर्व भक्तांचे प्रेम आणि पाठिंबा आहे.

– **गुरुमाऊली चंद्रकला सास्ते**

### गणगौर उत्सवानिमित्त शोभा यात्रा



**जालना :** शहरात गणगौर उत्सव सुरू असून यानिमित्त भव्य शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी महिलांनी फुगडी खेळ तसेच भक्ती गीत गायन केले.श्री रामनवमी आणि चैत्र नवरात्रिनिमित दर वर्षी प्रमाणे बड़ी सडक वरील श्री राममंदिर विश्वस्थ मंडल आणि श्री राम सुंदरकांड सत्संग परिवाराच्या वतीने राम चरित मानस, पारायण प.पु.मनोज महाराज यांच्या ओजस्वी वाणीतून चालू आहे. कथेच्या सप्तम दिवशीं सुंदरकांड कथाचे महत्व विशद करण्यात आले असून भाविकांनी या उत्सावाचा आनंद लूटला. याप्रसंगी महिलांची मोठी उपस्थिती होती.

### शहरात रामनवमीचा उत्साह...





**जालना :** जुना जालना येथील भगवान श्री राम मंदिरात रामनवमी निमित्त भव्य अशी आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. (छाया : जावेद तंबोली)

## स्वच्छता, श्रमदान अभियान उत्साहात

# श्रमदानातून पाटोदा येथील बारव झाले चकाचक !

परतूर /प्रतिनिधी

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अंतर्गत येथील उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने पूरातन बारव संवर्धन व स्वच्छतेची मोहिम हाती घेण्यात आली आहे. याच अनुषंगाने तालुक्यातील पाटोदा (माव) येथे नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत बारव स्वच्छता व श्रमदान अभियानाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश गावातील बारव स्वच्छ करून पाणी साठवण क्षमता वाढविणे तसेच जलसंवर्धनाबाबत जनजागृती करणे हा होता. श्रमदानाच्या माध्यमातून ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत बारव स्वच्छतेचे काम हाती घेतले. या कार्यक्रमास मंडळ कृषी अधिकारी डी.बी. सांगवे, सहाय्यक कृषी अधिकारी बालाजी चिकटवाड, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन समन्वयक विष्णू पिवळ, समितीचे अध्यक्ष



तथा सरपंच हरिभाऊ खवल, प्रगतीशील शेतकरी नाथाभाऊ खवल, समूह सहाय्यक अनिल भानुसे, अशोक कादे, एकनाथ खवल, मुरलीधर खवल, अनंत खवल, अंगद कादे, जगदीश कानोडे, महादेव खवल, गौतम मुंडे, गोविंद काळे, विष्णू खवल, माधव खवल, पार्थ नखाते यांच्यासह ग्रामस्थ, शेतकरी, स्वयंसेवक तसेच कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी अधिकाऱ्यांनी पाण्याचे महत्व, पूरातन ठेवा असलेल्या बारवांचे संवर्धन व स्वच्छता आदीबाबत मागदर्शन केले. मंडळ कृषी अधिकारी डी. बी. सांगवे यांनी शेतीमध्ये पाण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ठिबक व तुषार सिंचन पद्धतींचा अवलंब करून पाण्याचा ताळेबंदानुसार पीक पद्धतीचा वापर करावा तसेच लोकसहभागाच्या माध्यमातून सामूहिक कामांना प्राधान्य द्यावे, असे त्यांनी सांगितले.





### पाणीटंचाई निवारणासाठी उपक्रम महत्वाचे

जलसंवर्धनासाठी पाणी साठवण, मृद व जलसंधारणाच्या विविध उपाययोजना करणे आवश्यक आहे. शाश्वत शेतीसाठी नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन अत्यावश्यक असून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी व पाणीटंचाई निवारणासाठी असे उपक्रम महत्वाचे आहे. ग्रामस्थांनी व शेतकरी बांधवांनी या उपक्रमात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे.

– **विष्णू पिवळ**, नैसर्गिक संसाधन, व्यवस्थापन समन्वयक

## वादळी वाऱ्याने सोलरसह रब्बी पिकांचे नुकसान


### पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची मागणी

धावडा/प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील मेहगाव शिवारात १९ मार्च रोजी रात्री झालेल्या जोरदार गारपीट व वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसामुळे रब्बीतील शाळू जवारी, मक्का, गहू, हरभरा पिकांसह विहीरीवरील सोलारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

गारपीट व वादळी वाऱ्याने मेहगाव शिवारातील भगवान किसन जाधव या अदिवासी शेतकऱ्याच्या शेत गट ८१ मधील विहीरीवरील सोलर उखडुन उडून गेल्याने व गारांच्या फटक्याणे सोलार निकामी झाले आहे. येथील शेतकरी प्रताप डोभाळ यांच्या शेत गट ३३ मधील शाळू ज्वारी वादळी वाऱ्याने आडवी पडून मोठे नुकसान झाले आहे. या दोन्ही शेतकऱ्यांसह येथील अनेक शेतकऱ्यांना याचा मोठा फटका बसल्याने रब्बी पिके हातातोंडाशी आलेले वाया गेले.





येथील सोलारचे नुकसान झालेल्या भगवान जाधव यांच्यासह शेतकऱ्यांनी तसेच पोखरी -मेहगाव या ग्रुप ग्रामपंचायतच्या वतीने एका पत्रकानवये संबधीत कंपनीकडे व शासनाकडे या नुकसानीचे पंचनामे करूण नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी सरपंच नंदा त्र्यंबक गव्हाणे, उपसरपंच रूपाली गणेश लुटे, ग्रामसेवक शरद तराळ, शेतकरी भगवान जाधव, प्रताप डोभाळ व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

न्यूज ब्रीफ

## रिक्त ग्रा.पं.सदस्य पदांसाठी पोटनिवडणूक

**बुलढाणा :** राज्य निवडणूक आयोगाकडून घोषीत केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार मोताळा तालुक्यांतील तीन ग्रामपंचायतींच्या रिक्त थेट सरपंच व सदस्यांच्या पोट निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये तालखेड,गुळभेली, गोतमारा, असे तीन रिक्त ग्रामपंचायत सदस्य पदाच्या जागासाठी निवडणूक होणार आहे. या ग्रामपंचायतींमध्ये आचारसंहिता लागू असून निवडणूक आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन तहसिलदार तथा ग्रामपंचायत निवडणूक अधिकारी यांनी केले आहे.
निवडणूकीची अधिसूचना ३० मार्च रोजी संबधित तहसिल कार्यालय व ग्रामपंचायत कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल. या कार्यक्रमानुसार निवडणुकीकरीता नामनिर्देशनपत्र ७ ते १३ एप्रिलपर्यंत सकाळी ११ वाजेपासून ते दुपारी ३ वाजेदरम्यान स्वीकारले जाणार आहे. नामनिर्देशन पत्र छाननी १५ एप्रिल रोजी सकाळी ११ छाननी संपेपर्यंत. १७ एप्रिल रोजी नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली आहे. या निवडणूकीचे मतदान मंगळवार २८ एप्रिल रोजी सकाळी साडेसात ते सायं. साडेपाचवाजेपर्यंत होणार आहे. मतमोजणी २९ एप्रिल रोजी करण्यात येणार आहे, अशी माहिती देण्यात आली.

### चुलीवरच तयार होताहेत भजी-जिलेबी

# बाजाराला गॅस टंचाईचा फटका

**अंढेरा / प्रतिनिधी**

परिसरात सध्या निर्माण झालेल्या गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे ग्रामीण जनजीवन विस्कळीत झाले असून, याचा थेट परिणाम अंढेरा बाजारावर दिसून येत आहे. विशेषतः भजी, जिलेबीसारखे गरमागरम पदार्थ विकणाऱ्या व्यापाऱ्यांना गॅसअभावी चुली पेटवून पदार्थ करण्याची वेळ आली आहे.

अंढेरा बाजार हा परिसरातील चार ते पाच खेड्यांसाठी महत्त्वाचा आहे. दर बुधवारी सकाळी आठ वाजल्यापासून ते दुपारी एक-दोन वाजेपर्यंत मोठी गर्दी येथे होत असते. या बाजारात विविध खाद्यपदार्थांच्या दुकानांमध्ये पूर्वी गॅस सिलेंडरचा वापर करून भजी, जिलेबी, शेव,चिवडा तयार केला जात होता. मात्र आजच्या बाजारात अनेक ठिकाणी मोठ्या चुली पेटवून त्यावर हे पदार्थ तयार करण्यात येत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.गॅस टंचाईचा परिणाम केवळ व्यावसायिकांवरच नाही, तर ग्रामीण भागातील महिलांवरही झाला आहे. अनेक वर्षांपासून गॅसवर स्वयंपाक करण्याची सवय झालेल्या महिलांना आता पुन्हा चुलीवर स्वयंपाक करावा लागत आहे. यामुळे धूर, लाकूड गोळा करणे आणि चूल पेटवणे अशा अडचणींना सामोरे जावे लागत आहे. २० ते २५ वर्षे वयोगटातील अनेक तरुण महिलांना चूल वापरण्याचा अनुभव नसल्याने त्यांना अधिक त्रास सहन करावा लागत आहे. धुरामुळे आरोग्यावर परिणाम होत असल्याची तक्रारही काही महिलांनी व्यक्त केली. हायवेवरील हॉटेल व्यावसायिकांनाही गॅस टंचाईचा मोठा फटका बसला आहे. गॅस सिलेंडर उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांनाही चुलीवर स्वयंपाक करावा लागत असून, त्यामुळे वेळ, श्रम आणि खर्चात वाढ झाली आहे.गॅस बुकिंगसाठी वारंवार प्रयत्न करूनही फोन लागत नसल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. काहीवेळा संपर्क झाल्यास ''तांत्रिक कारणामुळे ४५ दिवसांनी गॅस मिळेल'' असा संदेश दिला जात असून, सध्या गॅस वितरण गाड्याही गावात येत नसल्याने नागरिकांना सेंटरवर जाऊन सिलेंडर घ्यावा लागत आहे. त्यामुळे संताप व्यक्त केला जात आहे. आठवडी बाजारात गरमागरम भजी- जिलेबीची चव न्यारीच आहे, मात्र सिलेंडर मिळत नसल्याने चुलीचा वापर करावा लागत आहे. यामध्ये वेळ वाया जात असून उन्हात अंगाची लाहीलाही होते, अशी प्रतिक्रिया विक्रेत्यांनी दिली.



### वितरण व्यवस्था सुरळीत करावी


■ गॅस टंचाईमुळे चुलीसाठी लागणाऱ्या लाकूड व शेणाच्या गौऱ्यांची मागणी वाढली असली तरी हे साहित्यही सहज उपलब्ध होत नसल्याने महिलां व व्यावसायिकांना अतिरिक्त त्रास सहन करावा लागत आहे.आखाती देशांमधील घडामोडींमुळे गॅस, पेट्रोल व डिझेल पुरवठ्यावर परिणाम झाल्याची चर्चा असून, त्याचा परिणाम ग्रामीण भागात अधिक तीव्रतेने जाणवत आहे.या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन गॅस पुरवठा सुरळीत करावा, तसेच ग्रामीण भागात नियमित वितरण व्यवस्था सुरू करावी, अशी मागणी अंढेरा परिसरातील नागरिक व व्यावसायिकांकडून होत आहे.

## आदर्श शिक्षक पुरस्काराने डॉ. झा सन्मानित

**चिखली :** प्रतिष्ठेचा डॉ. स.त्र्यं. कुल्ली आदर्श शिक्षक पुरस्कार प्रा. डॉ. मुकुंद कुमार झा यांना प्रदान करण्यात आला, तर शिक्षककेतर उत्कृष्टता पुरस्कार समाधान कुटे यांना बहाल करण्यात आला. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत उपस्थित मान्यवरांनी कौतूक केले.

अनुराधा अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात आदर्श शिक्षक पुरस्कार कार्यक्रम मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. १६ मार्च रोजी आयोजित या कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षकांचा गौरव करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव ॲड. वृषाली बोंद्रे होत्या. विशेष उपस्थितीत डॉ. चंद्रकांत बोथे, जितेंद्र बोंद्रे, कोषाध्यक्ष सिद्धेश्वर वानेरे, कार्यकारी संचालक डॉ. अली, प्राचार्य डॉ. अरुण नन्हई, नगरसेविका स्वाती लहाने, साजीया काझी, अनुजा डहाळे, सुजाता बोंद्रे, जया नन्हई, डॉ. राजेंद्र कोकाटे, डॉ. जितेंद्र शिंदे तसेच विविध विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.प्राचार्य डॉ. अरुण नन्हई म्हणाले की, शिक्षण ही केवळ ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया नसून ती व्यक्तिमत्त्व घडविण्याची सशक्त चळवळ आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिकदृष्ट्या सक्षम बनवणे पुरेसे नाही, तर त्यांच्यात विचारशक्ती, मूल्यनिष्ठा आणि सामाजिक बांधिलकी विकसित करणे तितकेच आवश्यक आहे.

## स्मार्ट सिस्टीमद्वारे मिळणार पाणी



**डोणगाव /प्रतिनिधी**

मेहकर नगरपालिका अंतर्गत कोराडी व पेनटाकळी येथून महाराष्ट्र सुवर्ण जयंती महानगर उत्थान योजना तसेच केंद्र शासन पुरस्कृत अमृत वितरण व्यवस्थेचे काम सुरू आहे. याअंतर्गत मेहेकर येथे हद्दवाढीमधे झालेल्या नवीन पाईपलाईनमधून स्मार्ट सिस्टमद्वारे पाणी मिळणार आहे.त्यासाठी नगरपालिकेच्या पाणी व स्वच्छता विभागाने जानेफळ रोड स्थित ईकरानगरमध्ये ट्रायल बेसवर अल्ट्रासोनिक सिस्टमवर आधारलेले स्मार्ट मीटर बसवले आहेत. शहरात याबाबत चर्चा रंगली आहे.

मेहकर नगरपालिकाअंतर्गत शहरात पाण्याचा पुरवठा सुरळीत व्हावा यासाठी काम सुरू आहे. ज्यामध्ये कोराडी व पेनटाकळी धरणावरून नगर उत्थान योजनेअंतर्गत मेहकर शहरामध्ये पाणी येणार आहे. यासाठी अमृत २ योजनेमधून जलवितरण व्यवस्थेचे काम सुरू आहे. मेहकरमध्ये जलवितरण व्यवस्था स्मार्ट जल वितरण प्रणालीमधून होणार आहे.मानसी १३५ लिटर पाणी दिल्या जाणार आहे.

यासाठी प्रत्येक नळ कनेक्शनवर अल्ट्रासोनिक सिस्टम बसवल्या जाणार आहे. अल्ट्रासोलिक सिस्टमद्वारे नळाला पाणी येते किंवा नाही,पाणी किती लिटर आहे याची संपूर्ण माहिती नगरपालिकेमध्ये असणाऱ्या सिस्टममध्ये अपडेट होणार आहे. या अल्ट्रासोनिक सिस्टमची बॅटरी लाइफ वीस वर्षे असून या स्मार्ट सिस्टमद्वारे हद्दवाढ झालेल्या जानेफळ रोडवरील नवीन एरियामध्ये प्रायोगिक तत्वावर जल वितरित केल्या जाणार आहे. जानेफळ रोडवरील नवीन वाढ परिसरमध्ये जी नळ योजना सुरू करण्यात आली यामध्ये अल्ट्रासोनिक स्मार्ट मीटर बसवण्यात आले आहे.

निर्धारित ५०० लिटर पाण्यापेक्षा जास्त पाणी वापर करणाऱ्या घरावर अतिरिक्त कर घेतल्या जाणार आहे. ज्यामुळे पाण्याचा अतिवापर थांबेल. सोबतच हा पायलट प्रोजेक्ट असून ट्रायल बेसवर बसवलेल्या या नळावरून नंतर संपूर्ण शहरांमध्ये अशाप्रकारे स्मार्ट मीटर बसून पाण्याचा योग्य वापर केल्या जाणार आहे.

## काँग्रेस पक्षवाढीसाठी अहोरात्र झटणार : संदिप शेळके

**चिखली / प्रतिनिधी**

माजी आमदार दिवंगत बाबुराव पाटील, उत्तमराव पाटील यांचा नातू असल्यामुळे जुन्या विचारांशी, पक्षाशी मी पुन्हा जुळलो. मला लोक विचारतात की, तुम्ही आता जिल्हाध्यक्ष होणार का ? मी सर्वांना ठामपणे सांगत आहे, प्रदेशाध्यक्ष. हर्षवर्धन दादा सपकाळ व जिल्हाध्यक्ष राहुलभाऊ बोंद्रे यांच्या आदेशाने मी संवाद यात्रा सुरु केली असून मला कुठल्याही पदाची अपेक्षा नाही, फक्त काँग्रेस पक्ष वाढीसाठीच अहोरात्र झटणार, असल्याचा निर्धार काँग्रेस नेते संदिप शेळके यांनी व्यक्त केला.

बुधवार २५ मार्च रोजी येथील हिरकणी महिला अर्बनमध्ये तालुकानिहाय बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. पुढे बोलताना संदिप शेळके म्हणाले की, लोक मला विचारत आहेत, तुमच्या बँका आहेत, त्रास होणार नाही का ? तर मी त्यांना



सांगतो की, आमच्या पूर्वजांनी इंग्रज राजवटीसारखा कठीण त्रास सोसला. आता तर सर्व सुविधा आहेत. त्यामुळे जेलमध्ये जावे लागले, तरी चालेल पण काँग्रेस विचार सोडणार नाही.यावेळी तालुका काँग्रेसचे अध्यक्ष राम जाधव, न.प.विरोधी पक्षनेते डॉ. मोहमंद इसरार, सचिन बोंद्रे, अतहरोद्दीन काझी, पर्यावरण सेलचे विजु पाटील शेजोळ, नगरसेवक गोपाल देव्हडे, जक्काभाई, गोकुळ शिंगणे, रत्नदिप शिनगारे, प्रशांत भटकर, समाधान सुपेकर, पांडुरंग पाटील भुतेकर, खलील बागवान, शेख खैरू, ईश्वराव इंगळे, जिवन देशमुख, शिवराज पाटील, शेषराव अंभोरे, अशोक झगरे, रामधन मोरे, कापडसिंग पाटील, गणेश जवंजाळ, समाधान आकाळ, गणेश ठेंग, विजय वाघमारे, भास्कर चांदोरे, समाधान गिते, प्रविण, पाटील, राहुल चवरे, डॉ. संजय घुगे, रवि लोखंडे, संजु बाहेकर, रूपेश घोलप, विजय महाजन, श्रीकृष्ण अंभोरे यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

## विदर्भ महाविद्यालयात 'पदवी वितरण समारंभ'

**बुलढाणा /प्रतिनिधी**

स्थानिक विदर्भ महाविद्यालयात २४ मार्च रोजी २०२५ मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावतीची बीए व बीकॉमची पदवी प्राप्त विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी सन्मानपूर्वक देऊन पदवी वितरण समारंभ कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी शरद कला महाविद्यालय मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ. सिद्धेश्वर नवलाखे होते.राजेश्वर एज्युकेशन सोसायटीच्या सहसचिव प्रा. डॉ. संगीता पवार,कृषी विकास संस्थेचे सीईओ अमितकुमार नाफडे, पदवी वितरण कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. गोविंद गायकी होते. कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजानाने करण्यात आली.





पदवी प्राप्तीनंतर आयुष्याचा निर्णायक काळ सुरू होतो. तेव्हा विचारपूर्वक सदसदविवेकबुद्धीने योग्य तो भविष्याचा निर्णय घेता आला पाहिजे असे मत कार्यक्रमाचे मुख्य अतिथी प्रा.डॉ. सिद्धेश्वर नवलाखे यांनी व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते करण धायडे, रुपाली शिवाजी मोरे, साहिल राजू बोराडे, तेजश्विनी किशोर जाधव, वैष्णवी श्रीकृष्ण हुडेकर, पूनम राहुल हिवाळेसह पदवीप्राप्त सर्व पदवीधारक विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

## क्षयरोगमुक्त जिल्ह्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा : गुलाब खरात

**बुलढाणा / प्रतिनिधी**

क्षयरोग हा पूर्णपणे बरा होऊ शकणारा आजार असून वेळेवर निदान आणि योग्य उपचार घेतल्यास रुग्ण पूर्णपणे निरोगी होऊ शकतो. क्षयरोग संदर्भात ग्रामस्तरावर व्यापक जनजागृती होणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी सर्वांनी एकत्र येऊन क्षयरोगमुक्त जिल्हा करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जि. प.मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात यांनी केले.

जिल्हा परिषदच्या शिवाजी महाराज सभागृहात जागतिक क्षयरोग दिनानिमित्त आयोजित टीबीमुक्त ग्रामपंचायत तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिवशंकर भारसाकळे, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल गिते, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. वर्षा गट्टे, क्षयरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनकर खेरोडकर आदी उपस्थित होते. क्षयरोगाची लक्षणे सुरुवातीला साधी वाटत असली तरी ती दुर्लक्षित केल्यास गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे क्षयरोगाच्या लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरित जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रात जाऊन तपासणी करून घ्यावी. जिल्हा क्षयरोगमुक्त करण्यासाठी आरोग्य विभाग, प्रशासन आणि नागरिक यांचा सहभाग महत्त्वाचा असून सर्वांनी एकत्र येऊन जनजागृती करणे ही काळाची गरज आहे. क्षयरोगमुक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रत्येकाने आपली जबाबदारी ओळखून पुढाकार घ्यावा, असे आवाहन खरात यांनी केले.

जागतिक क्षयरोग दिनाचे औचित्य साधून २०२५ सालामध्ये राबवण्यात आलेल्या 'क्षयरोग मुक्त पंचायत' अभियानात जिल्ह्यातील ३२६ ग्रामपंचायतींनी निकषांची पूर्तता केली. त्यापैकी २२ ग्रामपंचायतींना मानाचा 'सुवर्ण' पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच लोकसहभागातून टीबी मुक्त भारत अभियान पंतप्रधान टीबी मुक्त भारत अभियानांतर्गत जिल्ह्यात 'निक्षय मित्रांच्या' माध्यमातून ७ हजार १६६ फूड बास्केटचे (पौष्टिक आहार) वाटप रुग्णांना करण्यात आले आहे. या मदतीमुळे रुग्णांच्या उपचाराला गती मिळत आहे.राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत सन २०२५ मध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल क्षयरोग पथक बुलढाणा व शेगाव यांना प्रथम क्रमांक, संग्रामपूर व लोणार पथकांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांकाचे पुरस्कार प्रदान करण्यात आले. तसेच 'निक्षय मित्र' म्हणून मेहत्रे हॉस्पिटल व लद्धड हॉस्पिटल यांचाही सत्कार करण्यात आला. संचालन नितीन इंगळे यांनी तर आभार सिद्धेश्वर सोंळकी यांनी मानले.

## विजेत्या संघाचा जाधव यांनी केला सत्कार




**बुलढाणा :** आशियन लेक्रॉस स्पर्धेत भारताला सुवर्ण पदक मिळवुन देणाऱ्या भारतीय संघाचा आज केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांनी सत्कार केला. सऊदी अरब येथील रियाद येथे १ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान आशियन लेक्रॉस स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये भारतीय संघ सहभागी झाला होता. त्यांच्या संघाने इराकविरुध्द झालेल्या शेवटच्या सामन्यामध्ये ९-२ फरकाने विजय मिळवत भारताला आशियन लेक्रॉस स्पर्धेत अजिंक्य पद मिळाले. या संघामध्ये देशभरातुन १८ खेळाडु सहभागी झाले होते. विजेत्या संघाला केंद्रियमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुधवारी दिल्ली येथील निवासस्थानी बोलून खेळाडूंशी संवाद साधला.भारत देशाचे नाव उंचावणाऱ्या या खेळाडूंचा सत्कार केला.

## नर्मदा परिक्रमा पूर्ण केल्याबद्दल सत्कार

**बुलढाणा :** अतिशय खडतर प्रवास करून नर्मदा परिक्रमा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल शिवसेना उबाठा प्रवक्ता जयश्री शेळके यांनी सत्कार केला. अंभोडा येथील कडुबा पाटील यांनी वयाच्या ८५ व्या वर्षी नर्मदा परिक्रमा यशस्वीरित्या पूर्ण केली. तसेच वरवंड येथील तात्या मल्लिकार्जुन क्यावल, तेजराव शेनफड सपकाळ, अनंता दिगंबर शेळके यांनीही नर्मदा परिक्रमा यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 920



### आडवे संकेत

१) कार्तिक शुद्ध १५, या दिवशी मंदिरात त्रिपुर जाळला जातो
५) एखादे कार्य होऊन गेल्यावर त्या कार्यासंबंधी चर्वित चर्वण करणे या अर्थाचा वाक्प्रचार
९) धातुचा तंतू
१०) इतरांनी आपल्याकडे आकर्षित व्हावे म्हणून केलेला नट्टापट्टा
१२) डोंगरी किल्ला
१४) मीठ, क्षार
१५) स्वर्गवासी, मृत
१६) वक्रता, वक्र
१८) दृष्टी
२०) प्रश्नोत्तररूप संभाषण
२१) झाडाच्या तळापासची जागा
२३) शिजवून पातळ केलेली डाळ
२५) एक उत्तम प्रतीचे लाकूड
२६) कोणाच्याही बाजूने न बोलणा कोणत्याही राजकीय पक्षाचा सदस्य नसलेला
२७) एक ज्वर विशेष, गोड स्वाद असलेले
२९) दिलीपकुमार, वैजयंतीमालाचा एक जुना सुपरहिट चित्रपट
३४) केवळ एखाद्याचे दोष बघण्याची दृष्टी
३६) तरुणी, सुंदर स्त्री
३८) भूमिती किंवा त्रिकोणमितीमध्ये पंचेचाळीस अंशाचा कोन
४०) उपदेश, ज्ञान, आकलन
४१) सहा
४२) खाली नाही ते
४३) पद, पाऊल
४४) सूत कातण्याचे एक हस्तयंत्र
४६) अतिशय मेहनतीची कामे
४८) एखाद्याची तक्रार त्याच्या अपरोक्ष दुसऱ्यास सांगणे, तक्रार
४९) स्वार झालेला
५१) विश्व, जग
५२) आडव्या वेळूच्या दोन्ही टोकास दोन दोऱ्या बांधून त्याला ओझी अडकविण्याची केलेली व्यवस्था
५३) मनासारखे कार्य झाल्यावर मनाला वाटणारी स्वस्थता
५५) पाणीदार, जोमदार
५६) डोळा, बघणे
५७) हाताच्या बोटांत घालण्याची धातूची मुद्रिका
५९) सवय, चाल, राबता
६०) निश्चयी, पक्का
६२) न जेवलेला, रिकाम्या पोटी
६५) रोगजंतू निर्माण होण्यास प्रतिबंध करणारे उपाय
६९) आदेश, हुकूम
७०) अपत्य, मुले मुली इ.
७१) तिरस्कार, निषेध
७२) दुखापत, घाव
७४) लग्नसमारोहात नवरदेवाची आई
७६) उणीव भरून काढणारी गोष्ट
७७) ओळखीचा, माहीत असलेला
७८) एका मैदानी खेळात बसलेल्या खेळाडूस उठविण्याचा शब्द
७९) सैन्यातील बाजारबुणगे, सामानसुमान वगैरे
८०) आठवण, स्मृति

### उभे संकेत

१) वाद्यातील एक ताल, ठेका, ह्यात सोळा मात्रा व चार विभाग आहेत
२) परीक्षेत उत्तर पत्रिकेला दिलेली जोड, मुख्य कागदपत्रांना दिलेला जोड, पुस्ती
३) मुलाचा मुलगा, नातू,
४) लष्करी थाटाची सलामी
५) वधूवरांची वाजत गाजत काढलेली मिरवणूक
६) तीव्र, बोंचणारा, जहाल
७) दागिना, पर्वत
८) खूप वय झालेला नवरा मुलगा
११) पक्षी
१३) आश्रय मागणे, आश्रयास येणे
१५) दीपक
१६) शरीरातील त्रिदोषांपैकी एक
१७) दुसरे झाड लावण्यासाठी पहिल्या झाडाची तोडलेली फांदी
१९) एक संकेतार्थी अव्यय
२०) वाईट मुलांच्या संगतीत राहिल्याने येणारा दोष
२१) हुंगणी, नसवार, नाकाने हुंगावयाची पूड
२२) शुष्क, कोरडे, ओलावा नसलेले
२४) हिंदू धर्मातील एक पवित्र शब्द उच्चार
२५) सलोखा
२८) झिडकारणे, उडवून लावणे
३०) कुशलतेने कार्यभार साभाळणारा, निपुण
३१) आपल्या देखत जे घडत नाही त्याबद्दल आपण काहीच करू शकत नाही (एक म्हण)
३२) चांगले गुण असलेला
३३) क्षोभ, दंगा
३५) क्रिकेटमध्ये फलंदाजाने मारलेला सहा धावांचा फटका
३७) अंगावरच्या मळाची वळी
३९) जनतेने निवडून दिलेला महानगरपालिका किंवा नगरपालिकेचा सदस्य
४०) नखाने ओरबाडणे
४२) विदर्भ प्रांत या नावानेसुद्धा ओळखला जातो
४५) आपल्या मतदारसंघातून जनतेने निवडून दिल्लीला पाठविलेला प्रतिनिधी
४७) थकलेला, दु:खी,. त्रासलेला
४८) खेडवळ (माणूस), गावात झालेला
५०) कापड मोजण्याचे एक परिमाण
५२) कावळा, काक
५४) आंग्लभाषेतील होकार
५६) आपल्या संकल्पाशी प्रामाणिक असलेला, निश्चयी
५८) तोडगा, इलाज
६१) व्यवसायाचे प्रबंधन करणारी स्त्री
६२) अन्न न मिळण्यासारखी परिस्थिती
६३) सामर्थ्य, हिंमत
६४) विजोड, असंबद्ध
६६) दुसऱ्या व्यक्तीला मारलेली टक्कर
६७) लाकूड कापण्याचे एक हत्यार
६८) नखावर मावण्याइतके
६९) हरकत, शंका
७३) देहावसान, मृत्यू
७५) गव्हाचे दाणेदार पीठ (उत्तर पुढील अंकी)।

### मागील महाशब्दव्यूहचे उत्तर



uday munde - 8446302691

दैनिक महाभूमि

# अकोला भूमि

गुरुवार । २६ मार्च २०२६

gajanand120@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### रस्ते दुरुस्तीची मागणी

**अकोला :** शहरातील सर्वच अंतर्गत रस्त्याची पार दुरवस्था झाली आहे. काही वर्षांपूर्वी केलेले रस्ते अल्पावधीतच उखडले असून, ठिकठिकाणी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. ज्यामुळे दुचाकी घसरण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे पादचारी व वाहनधारक त्रस्त झाले आहेत. त्यामुळे वाहनधारकांना वाहन चालविताना कसरत करावी लागत आहे.

### सराईत गुन्हेगार सहा महिन्यांसाठी तडीपार

**अकोला :** पोलिस स्टेशन जुने शहर हद्दीतील नितेश महादेव वाकोडे, वय ४० वर्ष, रा. रमाबाई आंबेडकर नगर, जुने शहर, अकोला याला मुंबई पोलिस अधिनियम कलम अन्वये उपविभागीय दंडाधिकारी अकोला यांचे आदेशाने जिल्ह्यातून सहा महिन्याकरीता हद्दपार करण्यात आले आहे. सन २०२६ मध्ये म्हणजेच गत तीन महिन्यात एकूण २२ इसमांना महाराष्ट्र पोलिस अधिनियम अन्वये तडीपार करण्यात आले आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून गुन्हे करणारे व कारवाईस न जुमानणाऱ्या सराईत गुन्हेगारांवर आगामी सण उत्सव काळात एमपीडीए, तडीपार व इतर प्रचलित कायद्यान्वये कारवाई करण्यात येणार आहे असा इशारा जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी दिला आहे.

### दोन्हीं आरोपींचा जामीन फेटाळला

**अकोला :** अकोट तालुक्यातील देउळगाव येथे जुलै २०२३ मध्ये शेतीच्या वादावरुन लोखंडी पाईप व कुऱ्हाडीने खून केल्याच्या प्रकरणात दाखल केलेला आरोपीचा जमानत अर्ज १३ मार्च रोजी येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश बी. एम. पाटील यांनी फेटाळला.

३६ कोटींचा निधी वळती प्रकरण ; उद्याच्या सुनावणीकडे लक्ष

# दलित वस्तीचा निधी खर्च होणार की शासनदारी जमा होणार?

**अकोला/प्रतिनिधी**



दलित वस्तीचा निधी वळता केल्याप्रकरणी न्यायालयातील याचिकेवरील आता २७ मार्च रोजी सुनावणी होणार आहे. सदर ३६ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्याची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपत असून आर्थिक वर्ष संपायला जेमतेम दिवसांचा कालावधी बाकी असतानाच सुनावणी होत असल्याने सदर निधी शासन जमा होतो की विकास कामांवर खर्च होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

अनुसूचित जात उपयोजना (एससीपी) व अनुसूचित जाती व नवबौद्ध वस्तीचा विकास करणे, या योजनेअंतर्गत सन २०२४-२५ यावर्षाच्या कामांबाबत जि.प. सदस्यांचा कार्यकाळ संपण्यापूर्वी नियोजन करण्यात आले होते. सहाय्यक आयुक्तांकडे निधीसाठी मागणी करून प्रस्ताव सादर करण्यात आला होता; परंतु ३१ जानेवारी रोजी झालेल्या नियोजन समितीच्या सभेत ही कामे रद्द करण्यात आली. मात्र नंतर चौकशी करून पडताळणीचे आदेश देण्यात आले; परंतु त्यापूर्वीच हा संपूर्ण ३६ कोटींचा निधी अन्य कामांसाठी वळता करण्यात आला. त्यावरून तत्कालीन समाज कल्याण सभापती आम्रपाली अविनाश खंडारे यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात धाव घेतली. या प्रकरणी आता आर्थिक वर्ष संपण्याच्या चार दिवसांपूर्वीच म्हणजे २७ मार्च रोजी सुनावणी होणार असून या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

निधी असूनही उपयोग नाही सन २०२४- २५ या आर्थिकमध्ये जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाला हा निधी मंजूर करण्यात आला होता. निधी खर्च करण्यास दोन वर्षांची मुदत देण्यात आली होती. मुदत ३१ मार्च २०२६ रोजी संपत आहे. प्रकरण अद्याप उच्च न्यायालयात सुरू असल्याने न्यायालयाचा निकाल लागून निधी खर्च होईल अथवा नाही, या बाबी स्पष्ट नाहीत. वळती केलेला निधी उपलब्ध असल्यानंतर सुद्धा खर्च होत नसल्याने प्रकरणाच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

#### असा वळवला निधी

■ दलितवस्तींमध्ये होणाऱ्या कामांऐवजी शहरी भागातील कामांवर खर्चासाठी निधी वळता करण्यात आला. महापालिकेला ११ कोटी लाख तर अन्य नगर परिषद क्षेत्रात ६ कोटींची कामे प्रस्तावित करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेअंतर्गत नवीन विहीर बांधकाम, विहीर दुरुस्ती, सूक्ष्म सिंचन, सौर ऊर्जे साठी १० कोटी रुपये वळती करण्यात आले. समाज कल्याणअंतर्गत वसतीगृहांसाठी १ कोटी आणि यापूर्वीच्या दायित्वासाठी सुमारे ८ कोटींची तरतूद करण्यात आली. मात्र आता यावर स्थगिती आहे.

#### निधी परत गेल्यास आंदोलनाचा इशारा

■ वंचितच्या पदाधिकाऱ्यांनी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत पालकमंत्री, जिल्हाधिकारी, समाजकल्याण सचिव, सहाय्यक आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना न्यायालयात प्रतिवादी करण्यात आले आहे. दरम्यान या मुद्द्यावर न्यायालयीन लढाई सुरु झाली असून, आगामी काळात रस्त्यावरील आंदोलनही छेडण्यात येईल, असा इशाराही वंचितने दिला.

## श्रीराम जन्मोत्सवानिमित्त आज निघणार रॅली

शहरात उत्साहाचे वातावरण ; सर्वत्र रोषणाई



**अकोला/प्रतिनिधी**

सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समितीतर्फे गुरुवार २६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० वाजता शहरातून भव्य रॅली काढण्यात येणार आहे. अकोल्याचे आराध्य दैवत असलेल्या राजराजेश्वर मंदिरातून या रॅलीला प्रारंभ होणार असून ती शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करणार आहे.

या रॅलीचे विशेष आकर्षण म्हणून भगवान श्रीराम, लक्ष्मण व सीता माता यांच्या प्रेक्षणीय झांक्या सादर केल्या जाणार असून, यामुळे भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर आयोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. त्यानुसार मुन्ना उकर्डे यांची अध्यक्षपदी, बबन पवार व अमर भगत यांची उपाध्यक्षपदी, रोशनराज यांची सचिवपदी, वृषभ गायकवाड यांची सहसचिवपदी तसेच निहार अग्रवाल यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. बैठकीस राजेश मिश्रा, मंगेश काळे, नगरसेवक सागर भारुका, मनोज बीसेन, निहारजी अग्रवाल, नगरसेवक मनोज पाटील, रमेश गायकवाड, गजानन चव्हाण, रवी भामरे, अमर भगत, संग्राम खानजोडे, बंडूभाऊ नायसे, कैलास तांदळे, किरण ठाकूर, पंकज काळे, अजय भटकर, कैलास खोरे, हरिओम पांडे, योगेश बुंदेले, बाळू ढोले पाटील, कुणाल शिंदे, चेतन मारवाल, अश्विन पांडे आदी मान्यवर उपस्थित होते. समितीच्या वतीने नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून रॅली व कार्यक्रम यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## सामाजिक न्याय योजनांच्या छायाचित्र प्रदर्शनास प्रारंभ

**अकोला/प्रतिनिधी**

जिल्हा माहिती कार्यालयातर्फे सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाच्या सहकार्याने सामाजिक न्याय योजनांचे प्रदर्शनाचा शुभारंभ येथील उपविभागीय कार्यालय (तहसील) येथे बुधवारी झाला. शासनाकडून अनुसूचित जातींसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

सामाजिक न्याय विभागाचे अधिकारी गोपाळ वाघमारे यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे, उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे, तहसीलदार कुणाल झाल्टे, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार आदी यावेळी उपस्थित होते.

सामाजिक न्याय विभागाच्या योजनांची नागरिकांना थेट माहिती व मार्गदर्शन मिळत असल्याने प्रदर्शन उपयुक्त आहे. अधिकाधिक नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी गजेंद्र मालठाणे यांनी केले. सामाजिक न्याय योजनांची माहिती एकाच छताखाली मिळत असल्याने नागरिकांसाठी माहितीपूर्ण प्रदर्शन आहे, असे प्रतिपादन वाघमारे यांनी केले. छायाचित्र प्रदर्शनामध्ये सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांची माहिती छायाचित्रे, माहिती फलक व दृकश्राव्य माध्यमांच्या साहाय्याने सादर करण्यात आली आहेत. अनुसूचित जातीतील लाभार्थ्यांसाठी शिक्षण, स्वयंरोजगार, निवास व आर्थिक सहाय्य योजनांविषयी मार्गदर्शनही उपलब्ध करून देण्यात येत आहे. हे प्रदर्शन २७ मार्चपर्यंत नागरिक, अधिकारी व कर्मचारी, शालेय विद्यार्थ्यांनी छायाचित्र प्रदर्शनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयातर्फे करण्यात आले.

## हिरण्यकश्यपू वध देखावा अकोलेकरांना करतोय आकर्षित

**अकोला/प्रतिनिधी**

दिवंगत माजी आमदार गोवर्धन शर्माप्रणित विहिंप-श्रीरामनवमी शोभायात्रा समितीच्या वतीने सिटी कोतवाली चौकात सुरू असलेल्या रामनवमी उत्सवास रामभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या उपक्रमात मंगळवार २४ मार्च पासून भगवान नृसिंह व हिरण्यकश्यपू वध देखाव्यास प्रारंभ करण्यात आला.

या झाकीचा प्रारंभ रामनवमी शोभायात्रा समितीचे स्थायी अध्यक्ष कृष्णा शर्मा, समितीचे अध्यक्ष अरुण शर्मा, विहिंप महानगर अध्यक्ष राजू मंजुळकर, राहुल राठी, गुजरात अंबुजा लिमिटेडचे व समितीचे अध्यक्ष ब्रिजमोहन चितलांगे, रामप्रकाश मिश्रा, शैलेंद्र कागलीवाल, अशोक गुप्ता, वसंत बाछुका, किशोर मांगटे पाटील, विलास अनासाने, शैलेश खरोटे, मनीष बाछुका, नितीन जोशी, संदीप वाणी, नवीन गुप्ता, मनोज खंडेलवाल, सुमित शर्मा, अक्षय गंगाखेडकर आदींच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी बाळ बिडवई यांनी मंत्रोच्चार करून मान्यवरांच्या हस्ते यावेळी या झाकीचे लोकार्पण करण्यात आले. २६ मार्चपर्यंत आयोजित या विहंगम झाकीचा महिला - पुरुष राम भक्तांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले.



यावेळी ॲड. सौरभ शर्मा, प्रशांत अवचार, संतोष डोंगरे, चंदा शर्मा, अजय शर्मा, अनुप शर्मा, प्रकाश घोगलिया, प्रियेश शर्मा, अश्विन शर्मा, डॉ. विनय शर्मा, मनोज कस्तुरकर, कल्पेश खंडेलवाल, अर्चना शर्मा, पुष्पा वानखडे, सारिका देशमुख, रेखा नालट, कल्पना अडचुले, मनीषा भुसारी, संतोष शर्मा, मालती रणपिसे, प्रीती गुरूखुद्दे, मनीषा देशपांडे, मीरा वानखडे, वैशाली शेगोकार, मुक्ता बोपटे, सुरेखा नबापुरे, दीपाली वाकडे, संगीता जानोरकर, चंदा शर्मा, समवेत विहिंप रामनवमी शोभायात्रा समिती व जानकी वल्लभो मातृशक्तीचे पदाधिकारी सेवाधारी व महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.

## रामत्व जागवा, संकटांवर विजय मिळवा

रामकथाकार डॉ. भूषण फडके : श्रीराम गजरात रामकथेचा समारोप

**अकोला/प्रतिनिधी**

जीवनातील प्रत्येक संघर्ष हा राम-रावण युद्धासारखाच असतो. या युद्धात विजय मिळवायचा असेल, तर दृढनिश्चय, विवेक आणि समर्पण या तीन गोष्टी अंगी बाळगाव्या लागतात. ''रामत्व'' जागृत केल्याशिवाय जीवनातील संकटांवर मात करता येत नाही, असे प्रतिपादन रामकथाकार डॉ. भूषण फडके यांनी केले.

जठारपेठ येथील बिर्ला मंदिरात निलेश देव मित्र मंडळातर्फे आयोजित संगीत श्रीरामकथेचा पाचवा व अंतिम दिवस अभूतपूर्व उत्साहात पार पडला. ''श्रीरामांच्या'' घोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला आणि भाविक अक्षरशः भक्तिरसात तल्लीन झाले. अनेक भाविकांच्या मनात ''हा दिवस संपूच नये'' अशी भावना निर्माण झाली.

आजच्या निरूपणात युध्दकांड आणि उत्तरकांडातील अत्यंत हृदयस्पर्शी प्रसंगांची प्रभावी मांडणी करण्यात आली. कुंभकर्ण आणि इंद्रजिताचा पराभव, रावणवध, सीतेचे अग्निदिव्य, श्रीरामांचे अयोध्येत पुनरागमन आणि रामराज्याची स्थापना या सर्व घटनांमधून ''सत्याचा विजय आणि अहंकाराचा अंत'' हा संदेश अधोरेखित करण्यात आला.

## दोन वर्षांतच उखडला गाडेगांव- तेल्हारा रस्ता

**तेल्हारा/प्रतिनिधी**

गाडेगांव ते तेल्हारा दरम्यान मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत दोन वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या गाडेगांव-तेल्हारा रस्ता उखडला आहे. या रस्त्याच्या निर्मीतीसाठी सुमारे १ कोटी २४ लाख रुपये खर्च झाला होता, मात्र अवघ्या दोन वर्षांतच रस्त्याची अवस्था अत्यंत दयनिय झाली आहे. डांबर उखडल्याने रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे



नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

गाडेगांव व तेल्हारा परिसरातील नागरिकांसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. शेतकरी, विद्यार्थी तसेच व्यापारी वर्ग मोठ्या प्रमाणात या मार्गाचा वापर करतात. मात्र सध्या रस्त्याची झालेली दुरवस्था पाहता कामाच्या गुणवत्तेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत.

## 'शिव-पार्वतीचे मनन परम कल्याणकारी'

**अकोला/प्रतिनिधी**

शिवतत्त्व हे भगवतीच्या रूपात समाविष्ट असून हे तत्त्व परम कल्याणकारी आहे. अशा शिव-पार्वतीचे मनन हे परम कल्याणकारी असल्याचे मत शास्त्री जनक जोशी यांनी व्यक्त केले. ते शास्त्रीनगर येथील जय अंबे माता संस्थान प्रांगणात सुरू असलेल्या श्रीमद् देवी भागवत कथेत त्यांनी आपले सहावे पुष्प गुंफून शिव पार्वतीची महती विशद केली. या देवी भागवत कथेत शास्त्री जनक जोशी यांनी संगीतमय शिव पार्वतीची कथा प्रतिपादित केली.

या सत्रात त्यांनी शक्तीपीठचे वर्णन करीत मैनाक कथा सांगितली. यावेळी शिव पार्वतीच्या विवाहाची सुंदर कथा सांगितली. यावेळी सुंदर झाकी साकार करण्यात आली होती. यात शिव भूमिका नवीन कक्कड यांनी तर पार्वतीची भूमिका पूनम कक्कड यांनी तर सतीची भूमिका निशा लोहिया यांनी साकार केली. बुधवार, २५ मार्च रोजी कथेत नवदुर्गा कथा व झाकी साकार करण्यात येणार आहे.

मसाला व सुगंधी वनस्पती पिकांवरील राज्यस्तरीय चर्चासत्र

# अपारंपरिक पिकांकडे वळल्याशिवाय शेती शाश्वत होणार नाही : गडाख

**अकोला/प्रतिनिधी**

विदर्भातील शेती व्यवसाय शाश्वत करण्यासाठी अपारंपरिक पिकांची साथ अत्यावश्यक असून, स्पर्धात्मक व व्यावसायिक शेती पद्धतीचा अवलंब केल्यासच भविष्यातील आव्हानांना तोंड देता येईल, असे प्रतिपादन डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी केले.

भाजीपालाशास्त्र विभाग, उद्यानविद्या शाखा, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांच्यातर्फे एकात्मिक उद्यान पिके विकास अभियानांतर्गत, सुपारी व मसाला पिके संचालनालय, कालिकत (केरळ) यांच्या अर्थसहाय्याने ''मसाला व सुगंधी वनस्पती पिकांचे शाश्वत उत्पादन व प्रक्रियेसाठी अद्ययावत तंत्रज्ञान'' या विषयावर आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय शेतकरी चर्चासत्राच्या उद्घाटन प्रसंगी ते अध्यक्षीय भाषण करत होते. डॉ. गडाख यांनी सांगितले की, विदर्भ व मराठवाड्यातील शेतीत बदल घडवून आणण्यासाठी अपारंपरिक पिकांचा प्रभावी वापर करणे काळाची गरज आहे. शेतकऱ्यांनी आपल्या एकूण क्षेत्रापैकी किमान २० टक्के क्षेत्रावर नगदी किंवा अपारंपरिक पिकांची लागवड करून उत्पादनाधारित शेती पद्धती स्वीकारावी. तसेच कृषी विद्यापीठांच्या प्रक्षेत्र भेटींमधून आधुनिक तंत्रज्ञान प्रत्यक्ष पाहता येते व शास्त्रज्ञांशी संवाद साधता येतो, त्यामुळे अशा भेटींना विशेष महत्त्व असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

उद्घाटन सत्राला अधिष्ठाता कृषी डॉ. देवानंद पंचभाई, अधिष्ठाता उद्यानविद्या डॉ. अरविंद सोनकांबळे, फळशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शशांक भराड, महिला उद्योजक शेतकरी शोभा गायधणे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. याशिवाय डॉ. श्याम घावडे, डॉ. नितीन कोष्टी, प्रा. डॉ. विजय काळे, डॉ. अभय वाघ, डॉ. गजानन तुपकर, डॉ. निवृत्ती पाटील, विजय शेगोकार यांच्यासह राज्यभरातून आलेल्या शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. प्रास्ताविक डॉ. अरविंद सोनकांबळे यांनी, स्वागतपर भाषण डॉ. देवानंद पंचभाई यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. किशोर बिडवे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. विजय काळे यांनी केले.

#### शेतकऱ्यांचा सन्मान

■ कार्यक्रमास राज्यभरातून शेतकऱ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली असून, मसाला पिकांच्या प्रदर्शनीचेही आयोजन करण्यात आले आहे. तसेच प्रदर्शनीत सहभागी शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला.




#### 'अपारंपरिक पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ'

■ यावेळी विस्तार शिक्षण संचालक डॉ. धनराज उंदीरवाडे यांनीही मार्गदर्शन करताना सांगितले की, राज्यातील शेतीला नवसंजीवनी देण्यासाठी कृषी विद्यापीठांचे प्रयत्न सुरू असून, गेल्या काही वर्षांत अपारंपरिक पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रात सातत्याने वाढ झाली आहे. विशेषतः हळद, आले, धने, ओवा, मेथी, मिरची यांसारख्या मसाला पिकांबरोबरच सुगंधी वनस्पतींच्या उत्पादनाकडे शेतकऱ्यांचा कल वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. उद्यानविद्या शाखेने वैदर्भीय शेतीला नवी दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केल्याचा गौरव त्यांनी यावेळी केला.

## अवैध सावकारी विरोधात शहरात धाडसत्र

१६ ठिकाणी कारवाई ; आक्षेपार्ह कागदपत्रे केले जप्त

**अकोला/प्रतिनिधी**

जिल्ह्यात वाढत असलेल्या अवैध सावकारीच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने मोठी संयुक्त कारवाई हाती घेतली आहे. प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने अकोला व वाशिम जिल्ह्यांत एकूण १६ ठिकाणी धाड टाकून महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अंतर्गत कारवाई करण्यात आली. या मोहिमेमुळे अवैध सावकारी करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

अकोला जिल्हाधिकारी वर्षा मिना, जिल्हा पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, विभागीय सहनिबंधक (अमरावती) गौतम वर्धन तसेच जिल्हा उपनिबंधक गितेशचंद्र साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. अकोला व वाशिम जिल्ह्यातील सहकार विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संयुक्त पथकांनी ही धाड मोहीम राबवली. एकूण ९ अर्जदारांनी दिलेल्या तक्रारींच्या आधारे संबंधित गैरअर्जदारांविरुद्ध ही कारवाई करण्यात आली.

धाडीदरम्यान संशयित ठिकाणी सखोल तपासणी करण्यात आली. यामध्ये इसार पावत्या, कोरे चेक, कोरे बाँड, मूळ व झेरॉक्स खरेदीखत, डायऱ्या, ताबा व विक्री पावत्या, करारनामे, गहाणखत, सातबारा उतारे तसेच रोकड व खात्याच्या वह्या अशा विविध आक्षेपार्ह कागदपत्रांचा जप्ती पंचनामा करण्यात आला आहे.

या कागदपत्रांमधून अवैध सावकारीचे व्यवहार उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.



#### सहकार, पोलीस विभागाची संयुक्त कारवाई

■ या मोहिमेत विविध तालुक्यांतील सहाय्यक निबंधक व सहकारी अधिकारी यांचा सक्रिय सहभाग होता. पथक प्रमुख म्हणून सहाय्यक निबंधक एम. डी. कच्छवे (वाशिम) यांनी काम पाहिले. त्यांच्यासह अकोट, बार्शिटाकळी, मंगरूळपीर, रिसोड, पातूर, मुर्तीजापूर आणि मालेगाव येथील सहकार अधिकाऱ्यांनी धाडीत सहभाग नोंदवला. तसेच जिल्हा उपनिबंधक कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचाही या कारवाईत समावेश होता. या संयुक्त मोहिमेत सहकार विभागातील सुमारे ९० अधिकारी व कर्मचारी तसेच पोलीस विभागातील ४५ अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. याशिवाय फिरत्या पथकात उपनिबंधक ज्योती मलिये, सहाय्यक निबंधक अभयकुमार कटके, कार्यालय अधीक्षक अनिल मनवर व कनिष्ठ लिपिक आशिष घाटोळे यांचा समावेश होता.

> अवैध सावकारीमुळे त्रस्त असलेल्या नागरिकांनी व शेतकऱ्यांनी पुढे येऊन तक्रारी नोंदवाव्यात. तक्रारदारांची नावे गोपनीय ठेवली जातील. सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **- गितेशचंद्र साबळे,**
> जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अकोला.

## न्यूज ब्रीफ

### गुप्ती नाचवून दहशत निर्माण करणारा जेरबंद

**मलकापूर :** शहरातील वर्दळीच्या बसस्थानक परिसरात भरदिवसा हातात शस्त्र घेऊन आरडाओरडा करत दहशत निर्माण करणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणाला मलकापूर शहर पोलिसांनी शिताफीने अटक केली आहे. त्याच्याकडून लोखंडी गुप्ती जप्त करण्यात आली असून, पोलिसांनी त्याच्यावर २४ मार्च रोजी गुन्हा दाखल केला आहे. बसस्थानकाजवळील हनुमान मंदिराजवळ दुपारी ४ वाजेच्या सुमारास एक तरुण हातात धारदार शस्त्र घेऊन मोठमोठ्याने आरडाओरडा करत असल्याची माहिती गुप्त बातमीदाराने पोलिसांना दिली. या माहितीचे गांभीर्य ओळखून पोलीस कर्मचारी योगेश तायडे व त्यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहिले असता, अतुल भानुदास सोभागे (१९) रा.अंधाई, ता. चिखली हा तरुण हातात गुप्ती घेऊन परिसरात दहशत निर्माण करताना आढळला.

### घरगुती सिलेंडरचा वापर करणाऱ्यास पकडले

**नांदुरा :** शहरातील शाईन कॉलनी परिसरात अनधिकृतपणे घरगुती गॅस सिलिंडरमधून वाहनांमध्ये गॅस भरणाऱ्या अड्ड्यावर नांदुरा पोलिसांनी मंगळवारी रात्री उशिरा धाड टाकली. या कारवाईत पोलिसांनी गॅस भरण्याचे यंत्र, सिलिंडर आणि रिक्षासह एकूण ८३ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, शाईन कॉलनी येथे अवैध गॅस रिफिलिंगचा व्यवसाय सुरू असल्याची खबर पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार २४ मार्चच्या रात्री ९.३० वाजेच्या सुमारास पोलीस कॉन्स्टेबल रवी द्वारे व त्यांच्या पथकाने पंचनामा करत संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी आरोपी अलीम खान करीम खान (४२) रा. शाईन कॉलनी, नांदुरा हा कोणत्याही परवान्याशिवाय धोकादायक पद्धतीने गॅस रिफिलिंग करताना आढळून आला.

### दारु वाहतूक करणाऱ्यास पकडले

**खामगाव :** शहरातील वर्दळीच्या शेगाव रोडवरील शर्मा टर्निंग परिसरात बेकायदेशीररीत्या दारूची वाहतूक करणाऱ्या एका इसमावर खामगाव शहर पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी सुमारे ३,८५० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २४ मार्च रोजी दुपारी १.४५ वाजेच्या सुमारास शर्मा टर्निंग परिसरात एक इसम संशयास्पदरीत्या दारूची विक्री किंवा वाहतूक करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस कॉन्स्टेबल गणेश निवृत्ती कोल्हे यांनी पथकासह त्या ठिकाणी छापा टाकला. या छाप्यात आरोपी नारायण शंकर अवचार (३३) रा. पारखेड, ता. खामगाव याच्या ताब्यातून मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

### हरवलेला मुलगा कुटुंबाच्या स्वाधीन

**शेगाव :** हरविलेल्या अल्पवयीन मुलाचा शोध घेऊन त्याला सुरक्षितपणे कुटुंबीयांच्या ताब्यात देण्यात शेगाव पोलिसांना यश आले आहे. २ जानेवारी २०२६ रोजी रोकडिया नगरातील गणेश रामदास गोडचवर वय १५ वर्ष हा जुन्या पँटला शिलाई मारून असे म्हणून घरून निघून गेला होता. याप्रकरणी शेगाव पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत अथक परिश्रम घेतले. मोबाईल लोकेशन नुसार त्या मुलाचा वृंदावन उत्तर प्रदेश येथे असल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम अधिक वेगाने राबवत मुलाचा ठावठिकाणा निश्चित केला.

---

**गुंतवणूकदारांना फटका ; बाजारात मोठी उलाढाल नाही**

# सोने चांदीच्या भावात मोठी घसरण, सामान्यांना काहीसा दिलासा!

**खामगाव/प्रतिनिधी**



देशांतर्गत सराफा बाजारात या आठवड्यात सोने-चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे. साप्ताहिक स्तरावर सोन्याच्या दरात मोठी कपात झाल्याने ग्राहकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. गेल्या सात दिवसांत २४ कॅरेट सोन्याच्या भावात १३,६९० रुपयांची घसरण झाली असून २२ कॅरेट सोने १२,५५० रुपयांनी स्वस्त झाले आहे. भाव कमी झाल्यानंतरही सराफा बाजारात मोठी उलाढाल पाहावयास मिळाली नाही.

२५ मार्च रोजी खामगाव सराफा बाजारात २४-कॅरेट सोने १,४७००० रुपये प्रति १० ग्रॅम दराने विकले जात आहे. मुंबईमध्ये, हा दर १,४५,९७० रुपये प्रति १० ग्रॅम इतका आहे. मागील २० मार्च रोजी, सराफा बाजारात सोन्याचे दर ६५० रुपयांनी घसरले आणि १,५२,६५० रुपये प्रति १० ग्रॅम या पातळीवर स्थिरावले. मात्र त्यानंत पुन्हा सोनेच्या भावात मोठी घसरण पाहावयास मिळाली. जागतिक स्तरावर अस्थिरता निर्माण झाल्याने सोने- चांदीच्या दरात मोठी घसरण होत असल्याचे सराफा व्यावसायीकांकडून बोलल्या जात आहे. सध्या युध्दाला पाच दिवसांचा विराम मिळाल्याने अचानक शेअर मार्केट मध्ये मोठी चढ-उतार पाहावयास मिळाली. त्यामुळे सध्या गुंतवणूकदारांकडून क्रूड ऑईलकडे जास्त लक्ष वेधले जात असल्याने साने-चांदीच्या भावावर याचा परिणाम दिसून येत असल्याचे तज्ज्ञांकडून बोलल्या जात आहे. युध्द पुन्हा सुरू झाल्यास सोने-चांदीच्या भावात पुन्हा तेजी येण्याची चिन्हे आहेत.

**चांदीमध्ये ३० हजारांची घसरण**

सोन्यासोबतच चांदीच्या दरातही मोठी घसरण नोंदवण्यात आली आहे. आठवडाभरात चांदी ३०,००० रुपयांनी स्वस्त झाली आहे. २५ मार्च रोजी चांदीचा भाव २,४०,००० रुपये प्रति किलो आहे. विशेष म्हणजे, याच वर्षी जानेवारी महिन्यात चांदीने ४ लाख रुपयांचा टप्पा ओलांडला होता, त्या तुलनेत आता मोठी घट दिसून येत आहे.

**आर्थिक अनिश्चितता आणि डॉलरच्या मजबुतीमुळे किमतीवर दबाव..**

*या घसरणीमागील प्रमुख घटकांमध्ये महागाईबाबत वाढती चिंता, धोरणात्मक दरांबाबत मध्यवर्ती बँकांनी घेतलेली कठोर भूमिका आणि जागतिक कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये झालेली वाढ यांचा समावेश होतो. व्यापक आर्थिक अनिश्चितता आणि अमेरिकन डॉलरच्या बाजूने झुकणारे जागतिक बाजारातील संकेत यामुळे सोन्याच्या किमतीवर दबाव निर्माण झाला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात सध्या सोन्याच्या भावात अस्थिरता दिसून येत आहे.*

*- **मनोज शहा,** अध्यक्ष बुलढाणा जिल्हा सराफा असोसिएशन.*

**जागतिक अस्थिरतेचा परिणाम**

*जागतिक अस्थिरता निर्माण झाल्याने सोने-चांदीच्या भावात मोठी घसरण होत आहे. सध्या युध्द काही काळ थांबले आहे. त्यामुळे बाजारपेठेत मोठी अस्थिरता निर्माण होवून मंदीचे सावट पाहावयास मिळत आहे. त्यामुळे याचा थेट परिणाम आता सोने-चांदीच्या दरावर दिसून येत आहे. युध्द पुन्हा सुरू झाल्यास सोने-चांदीच्या दरात पुन्हा चढउतार दिसून येण्याची शक्यता आहे. भाव कमी झाले तरी सराफा बाजारात मात्र फार मोठी उलाढाल नाही. ज्यांना दागिण्यांची आवश्यकता आहे. तेच बाजारात खरेदीसाठी दिसून येत आहेत.*

*- **शशी जगदाळे,** सराफा व्यावसायीक, खामगाव.*

---

## बेपत्ता अल्पवयीन मुलीची दिल्लीतून सुटका; आरोपी अटकेत

**जळगाव जामोद पोलिसांची धडाकेबाज कामगिरी**

**जळगाव जामोद/प्रतिनिधी**

जळगाव जामोद शहरातून बेपत्ता झालेल्या एका अल्पवयीन मुलीचा शोध लावण्यात जळगाव जामोद पोलिसांना मोठे यश आले आहे. तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी थेट देशाची राजधानी दिल्ली गाठून मुलीची सुटका केली असून, तिला पळवून नेणाऱ्या आरोपीला अटक केली आहे.

फिर्यादी ज्योती मिरगे (३९) रा. चावरा यांची मुलगी शिक्षणासाठी आपल्या आजोबांकडे वडशिंगी येथे राहत होती. ९ मार्च रोजी तिचा जळगाव जामोद येथे इतिहास या विषयाचा पेपर असल्याने ती घरातून निघाली, मात्र सायंकाळपर्यंत घरी परतली नाही. शोधाशोध केल्यानंतरही ती मिळून न आल्याने, अज्ञात इसमाने तिला पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. याप्रकरणी १० मार्च रोजी जळगाव जामोद पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा आणि उपविभागीय पोलीस अधिकारी आनंद महाजन यांनी तातडीने तपासाचे आदेश दिले. ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास अधिकारी हेडकॉन्स्टेबल भागवत उंबरहंडे यांनी तांत्रिक विश्लेषण विभागाची मदत घेतली.तपासादरम्यान सदर मुलगी दिल्ली येथे असल्याचे निष्पन्न झाले. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे १७ मार्च रोजी पोलीस पथक दिल्लीकडे रवाना झाले. यामध्ये पाहेकॉ. भागवत उंबरहंडे, पाहेकॉ. गणेश हाडे, पोकॉ. सचिन राजपूत या पथकाने दिल्ली पोलिसांच्या मदतीने हजरत निजामुद्दीन रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचला. यावेळी तिच्यासोबत तिच्याच गावातील सुपडा चंद्रमोहन लादे हा तरुण मिळून आला. पोलिसांनी आरोपी सुपडा लादे आणि पीडित तरुणीला जळगाव जामोद येथे आणले. आरोपीविरुद्ध कायदेशीर कारवाई करून त्याला अटक करण्यात आली आहे. तर अल्पवयीन मुलीला सुरक्षितपणे तिच्या आईच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या यशस्वी कारवाईमुळे पीडित कुटुंबाने पोलिसांचे आभार मानले आहेत. सदर प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार नितीन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पाहेकॉ. भागवत उंबरहंडे आणि गणेश हाडे करीत आहेत.

---

## 'कमवा व शिका' कार्यक्रमाचे आयोजन

**जळगाव जामोद/प्रतिनिधी**

येथील विद्यार्थ्यांसाठी कॅम्पस इंटरव्यूद्वारे काम करत शिकण्याची आणि करिअर घडवण्याची संधी उलब्ध करून देण्यात आली आहे. या अनुषंगाने येथील उद्योजक विनायक भोंगाळे यांनी स्थानिक तरूणांसाठी कमवा आणि शिका या कार्यक्रमाचे २७ आणि २८ मार्च रोजी आयोजन केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, जळगाव (जामोद) येथून शिक्षण घेतलेले विनायक पंढरीनाथ भोंगाळे यांनी आपल्या मेहनत, चिकाटी आणि अनुभवाच्या जोरावर बांधकाम क्षेत्रात यशस्वी उद्योजक म्हणून ओळख निर्माण केली आहे. १९८९ साली एक वर्षासाठी रुपये ७००/- मजुरी वर शेतीमध्ये काम करून आज यशाचे शिखर गाठताना स्वतः चे हाताला काम मिळवताना दुसऱ्याच्या हाताला काम देणे यासाठी स्थानिक तरुणांना संधी देण्याच्या उद्देशाने त्यांनी कमवा आणि शिका हा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत स्थानिक विद्यार्थ्यांसाठी विशेष कॅम्पस इंटरव्यू आयोजित करण्यात आला आहे. सदर कॅम्पस इंटरव्ह्यू २७ आणि २८ मार्च रोजी स्थानिक श्रीपाद कृष्णा कोल्हटकर कॉलेज, जळगाव जामोद आणि सातपुडा एज्युकेशन सोसायटीचे कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल येथे आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमात १० वी आणि १२ वी नंतर शिक्षण सोडलेले विद्यार्थी, ग्रॅज्युएशन करणारे किंवा पूर्ण केलेले विद्यार्थी तसेच फ्रेशर्स सहभागी होऊ शकतात.

## पुतळा नियमाकुल करण्यासाठी उपोषण

**खामगाव :** स्थानिक रेल्वे स्टेशनच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या बाजुला असलेल्या साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा नियमाकुल करून सौंदर्याकरण करण्यात यावे. तसेच याठिकाणच्या व्यापारी संकुलाला डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्यात यावे. या मागण्यांसाठी साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे स्मारक समितीच्या वतीने २५ मार्च रोजी सकाळी ११ वाजेपासुन न.प. कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू करण्यात आले आहे. शहरातील काही मातंग समाज बांधवांनी येथील रेल्वे स्थानकाच्या प्रवेशव्दारासमोर १६ मार्च च्या रात्री लोशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा अर्धकृती पुतळा बसविला होता.

---

## नवीन पूल बांधला अन् सहा महिन्यातच पाडला!

**१५ व्या वित्त आयोगातील कामात गैरप्रकार..**

**सुनगाव/प्रतिनिधी**



एकीकडे ग्रामीण विकासासाठी शासन कोट्यवधींचा निधी खर्च करत असल्याचा दावा करत असताना, दुसरीकडे बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यात मात्र शासकिय निधीची अक्षरशः उधळपट्टी आणि प्रशासकीय अनागोंदीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. १५ व्या वित्त आयोगातून बांधलेला एक पाईप कलव्हर्ट पूल अवघ्या काही महिन्यांतच जमीनदोस्त करून त्याच जागी पुन्हा नवीन पुलाचे काम सुरू करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्याची मागणी इंजि. राजू समाधान इंगळे यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे केली आहे.

दिलेल्या तक्रारीत नमूद आहे की, जळगाव जामोद तालुक्यातील सुनगाव येथील लेंडी नदीवर गोरक्षनाथ महाराज मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर १५ व्या वित्त आयोगातून (२०२२-२३) एक पाईप कलव्हर्ट पूल बांधण्यात आला होता. या पुलाचे काम निकृष्ट दर्जाचे असल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी तेव्हाच विरोध दर्शवला होता. आश्चर्य म्हणजे, ज्या कामावर ग्रामसभेने आक्षेप घेतला होता, त्याच कामाचे ४,८०,८११ रुपये नियमबाह्य पद्धतीने कंत्राटदाराला अदा करण्यात आले.धक्कादायक बाब अशी की, मार्च २०२४ मध्ये पूर्ण झालेला हा पूल सप्टेंबर २०२५ मध्ये अचानक तोडून टाकण्यात आला. हा पूल तोडण्यासाठी कोणतीही अधिकृत परवानगी किंवा ग्रामपंचायतीचा ठराव नव्हता. असे पत्र ग्रामसेवक जोशी यांनी पंचायत समिती विभागाला दिलेले आहे. जुना पूल पाडून त्याच वादग्रस्त जागेवर आता पुन्हा ३४.६२ लाख रुपये खर्चून नवीन पूल आणि संरक्षक भिंतीचे काम सुरू करण्यात आले आहे.

*शासकीय निधीचा असा दुरुपयोग सहन केला जाणार नाही. जुन्या पुलाचे दिलेले बिल वसूल करावे आणि सध्या सुरू असलेल्या नवीन पुलाच्या तांत्रिक दर्जाची निष्पक्ष तपासणी होईपर्यंत त्याचे देयक थांबवावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.*

*- **इंजि. राजू इंगळे,** तक्रारदार*

---

## कडुनिंब व गुळवेल अर्कचे मोफत वाटप

**खामगाव :** सुटाळा खुर्द येथील रहिवासी शिवाजी वाघ व संजय वाघ परिवाराकडून मागील ४ दशकांपासुन गुढीपाडवा ते आठवडाभर सुटाळा खुर्द फाटा येथे सकाळी नागरिकांना कडुनिंब व गुळवेल अकर्काचे मोफत वितरण करण्यात येत आहे. याबद्दल गुड मॉर्निंग टिम सुटाळा बु. च्या वतीने वाघ कुटुंबाचा नुकताच सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन गुडमॉर्निंग टिमचे प्रमुख राजेंद्रसिंह राजपूत तर आभार प्रदर्शन पत्रकार गजानन राऊत यांनी केले. कार्यक्रमाला दामोदर पांडे, गजाननराव कराळे, आशा मानमोळे, उर्मिला गायकी, शरदचंद्र गायकी आदि उपस्थित होते.

## शिक्षक कुळकर्णी यांना तितिक्षा पुरस्कार प्रदान

**मलकापूर/प्रतिनिधी**



तितिक्षा इंटरनॅशनल पुणे आयोजित भव्य कला संमेलन व पुरस्कार वितरण सोहळा २२ मार्च रोजी पुणे येथे उत्साहात पार पडला.

हा भव्य सोहळा वि.का.राजवाडे आणि पोतदार सभागृह,भारत इतिहास संशोधक मंडळ, सदाशिव पेठ, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक पद्धतीने दीपप्रज्वलन व गणेश स्तवनाने झाली. ज्यामुळे संपूर्ण वातावरण भक्तिमय व पवित्र झाले. जागतिक जलदिनानिमित्त जलपूजनाचा उपक्रम घेऊन संदेश देण्यात आला. भरतनाट्यमच्या सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. सामाजिक कार्यकर्त्या प्रिया दामले यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात न्यायमूर्ती अमृत बिराजदार, सुभेदार महेंद्र गवई, उत्कृष्ट सेवा पुरस्कार प्राप्त सी.ए.शंकर अंदानी, निर्माता व दिग्दर्शक राजेश खर्डे वेसावकर, वयोवृद्ध गायिका शोभा जोग, सुजित दातार, शहाजीराव पाटील यासारखे अनेक मान्यवर तसेच राज्यभरातून आलेले निमंत्रित साहित्यिक उपस्थित होते. याच कार्यक्रमात साहित्य व शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल मलकापूर येथील सेवानिवृत्त शिक्षक अरविंद कुळकर्णी यांना तितिक्षा प्रमोद मातृगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यापूर्वी सर्वद फाऊंडेशनचा सर्वद स्टार उत्कृष्ट साहित्यिक पुरस्कार २०२४ राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा व राज्यस्तरीय निबंध स्पर्धा यासारख्या अनेक स्पर्धेत पुरस्कार कुळकर्णी यांना मिळाले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रमोद कुलकर्णी, कवी विजय सातपुते यांनी केले.

## चोंडी टाकळेश्वर शिवारात नागरटी करताना ट्रॅक्टर पलटी; चालकाचा मृत्यू

**संग्रामपूर :** तालुक्यातील काकोडा येथील २५ वर्षीय युवकाचा शेतात नागरटी करताना ट्रॅक्टर पलटी होऊन ट्रॅक्टरखाली दबून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना २४ मार्च रोजी दुपारी १ वाजता घडली. या घटनेमुळे काकोडा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

तालुक्यातील टाकळेश्वर शिवारात बोरसे नामक शेतकऱ्याच्या शेतात ट्रॅक्टर चालक गणेश अर्जुन मानखैर हा युवक ट्रॅक्टरद्वारे नागरटीचे काम करत होता. ट्रॅक्टरचे वळण घेत असताना अचानक तोल सुटल्याने ट्रॅक्टर अवजाऱ्यासह शेतातील तलावाच्या खड्ड्यात पलटी झाला. या अपघातात गणेश मानखैर हा ट्रॅक्टरखाली दबला गेला. घटनेची माहिती शेजारच्या शेतकऱ्यांना मिळताच त्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत युवकाला ट्रॅक्टरखालून बाहेर काढले. त्यानंतर उपचारासाठी शेगांव रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचारापुर्वीच रसत्यातच त्याचा मृत्यू झाला. मृतक गणेश मानखैर हा रोजंदारीवर काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होता. त्याच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ व एक बहीण असा परिवार आहे. या दुर्दैवी घटनेमुळे गणेशच्या कुटुंबावर दुखाचे डोंगर कोसळले आहे.

## कालिंका माता मंदिरात महाचंडी यज्ञ

**खामगाव :** येथील वामन नगरातील जागृत श्री कालिंका माता मंदिरात चैत्र नवरात्रीच्या पावन पर्वावर २५ व २६ मार्च रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

२५ मार्च रोजी गणपती पूजन व पुण्याहवाचन नवग्रह पूजा व चंडिका कलशाची स्थापना करण्यात आली दुर्गा सप्तशतीचे पारायण सामूहिक ललिता सहस्त्रनाम पारायण सहस्त्र कुंकू मार्चन व सत्संगाचा कार्यक्रम पार पडला. यात जवळपास १०० महिलांचा सहभाग होता. त्यानंतर महाआरती करण्यात आली. या कार्यक्रमास कालिका मातेचे भक्तगण उपस्थित होते.

---

## किरकोळ वादातून एकाच कुटुंबातील चौघांना मारहाण

**शेगाव/प्रतिनिधी**

तालुक्यातील जवळा बुद्रुक येथे एका २ वर्षाच्या चिमुकल्याला दुचाकीचा धक्का लागल्याच्या किरकोळ वादातून दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याची घटना २४ मार्च रोजी दुपारी ४.३० च्या सुमारास समोर आली आहे. या प्रकरणी शेगाव ग्रामीण पोलिसांनी सहा जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून गावात सध्या तणावपूर्ण शांतता आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी मोहमदखॉन रुस्तमखॉन (६२) यांचा नातू हैदरखॉन हा घरासमोर खेळत होता. यादरम्यान गणेश वाडोकार नावाच्या तरुणाच्या दुचाकीचा धक्का चिमुकल्याला लागला. यावरून फिर्यादीने त्यास समज देऊन गाडी नीट चालवत जा असे म्हणून पाठवून दिले होते. मात्र, याच वादाचा राग मनात धरून रात्री ७:३० वाजताच्या सुमारास आरोपींनी बेकायदेशीर मंडळी जमवून फिर्यादीचे घर गाठले. आरोपींपैकी ऋषीकेश काळे याने थेट घरात शिरून मोहमदखॉन यांची कॉलर पकडून त्यांना ओढत घराबाहेर काढले. यावेळी मध्यस्थी करायला आलेला फिर्यादीचा मुलगा शब्बीर खान आणि सून शमीनाबी यांनाही आरोपींनी लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. या झटापटीत २ वर्षांचा चिमुकला हैदरखान याच्या कपाळाला आणि पायाला गंभीर इजा झाली आहे. जर पोलिसांत तक्रार केली तर तुला बघून घेऊ, अशी धमकी देत आरोपींनी तेथून पळ काढला. याप्रकरणी मोहमदखॉन यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मयुर श्रीकृष्ण लोखंडे, ऋषीकेश विलास काळे, सुशांत नितीन सोनटक्के, सुजीत अनंता मसने, विश्वजीत किसन मसने, नयण किसन मसने यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोहेकॉ अरुण मेटांगे पुढील तपास करत आहेत.

---

**अन्यथा पिके कार्यालयात आणून टाकू** | **शिवसेना उबाठाचा तहसीलदारांना इशारा**

# अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतींचे पंचनामे करा

**मलकापूर/प्रतिनिधी**



तालुक्यातील भाडगणी येथे १९ मार्च रोजी झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात शेतीचे आणि पिकांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे महसूल विभागाने तातडीने पंचनामे करावे, अन्यथा शेतात नुकसानीमुळे झोपलेली पिके तहसील कार्यालयात आणून टाकू, असा इशारा शिवसेना उबाठा कडून तहसीलदार यांना देण्यात आला आहे.

निवेदनात नमूद आहे की, तालुक्यातील ग्राम भाडगणी येथे १९ मार्च रोजी झालेल्या अवकाळी वादळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके जमीन दोस्त झाली असून मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या संदर्भात शेतकऱ्यांनी २० मार्च रोजी तहसीलदार समाधान सोनवणे यांना निवेदन दिले, मात्र आठवडा उलटूनही तहसील प्रशासन कुंभकर्णी झोपेतून जागे झाले नाही. या नुकसानीचा सर्वे करण्यासाठी संबंधित शेतकऱ्यांनी तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक यांच्याकडे मागणी केली असता आमच्याकडे भाडगणी गावचा अतिरिक्त कारभार असून आम्ही हेच काम करायचे का असा उलट सवाल तलाठी, ग्रामसेवक यांनी शेतकऱ्यांना केल्याने २४ मार्च रोजी संतप्त शेतकऱ्यांनी शिवसेना (उबाठा) उपजिल्हाप्रमुख गजानन ठोसर यांच्या नेतृत्वात तहसीलदार समाधान सोनवणे यांना निवेदन देऊन तीन दिवसात नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांच्या नुकसानीची पाहणी न केल्यास शेतातील झोपलेली पिके तहसील कार्यालयात आणून टाकण्याचा इशारा गजानन ठोसर यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

यावेळी अरविंद सोपान खोडके, शिवाजी गंजीधर खोडके, अतुल विनायक खोडके, मधुकर श्रीराम खोडके, हरिश्चंद्र खोडके, श्रीकृष्ण खोडके, वासुदेव खोडके, गणेश चोपडे ,अक्षय खोडके, आकाश राजपूत ,बाबुराव खोडके, विष्णू खोडके, श्रीधर खोडके, निवृत्ती गारमोडे, साहेबराव खोडके, कडुबा वैतकार, विजय राणे, विश्वास राणे, सचिन क्षीरसागर, निवृत्ती मुकुंद, प्रवीण मुकुंद, संतोष वैतकार, माणिकराव गोरे, विजय राणे, विश्वास राणे, अर्जुन खोडके, रंगनाथ मुकुंद, मधुकर खोडके, अतुल खोडके, उषा खोडके, अमोल खोडके, साहेबराव चोपडे, श्रीराम मुकुंद, विनायक खोडके, विनायक मुकुंद, ज्ञानेश्वर आढाव, महादेव खोटाळे, आकाश वैतकार, विष्णू खोडके, गोपाल खोडके रघुनाथ वैतकार, ज्ञानेश्वर खोडके, गौरव महाजन, गौरव खोडके, प्रसाद खोडके सह आदी शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

**शेतकऱ्यांमध्ये तीव्र रोष**

- १९ मार्च रोजी झालेल्या अवकाळी पावसाने भाडगणी शिवारातील असंख्य शेतकऱ्यांची पिके जमीनदोस्त झाल्याने मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, सहा दिवस उलटून सुद्धा अद्यापही तहसील प्रशासन, कृषी अधिकारी कार्यालयाचा एकही कर्मचारी शेतकऱ्यांच्या शेताकडे फिरकला नसल्याने शेतकऱ्यांनी कमालीची नाराजी व्यक्त केली आहे.

दैनिक
महाभूमि
गुरुवार । २६ मार्च २०२६
dainikmahabhoomi@gmail.com

# वाशिम भूमि




**न्यूज ब्रीफ**

### जिल्ह्यात तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर

**वाशिम :** जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी २२ मार्च रोजीच्या आदेशानुसार २०२६ या वर्षासाठी वाशिम जिल्ह्यात तीन स्थानिक सुट्ट्या जाहीर केल्या आहेत. यानुसार २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन, १९ सप्टेंबर रोजी ज्येष्ठागौरी पूजन आणि ९ नोव्हेंबर रोजी दिवाळीचा दुसरा दिवस अशा एकूण तीन स्थानिक सुट्ट्या संपूर्ण जिल्ह्यासाठी घोषित करण्यात आल्या आहेत. दरम्यान, हे आदेश वाशिम जिल्ह्यातील दिवाणी व फौजदारी न्यायालये तसेच अधिकोष (कोषागार) कार्यालयांना लागू राहणार नसल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

### पोहरादेवी यात्रेनिमित्त मद्यविक्री बंदी

**वाशिम :** पोहरादेवी व उमरी परिसरातील यात्रांच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी २४ ते २६ मार्चदरम्यान मद्यविक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत. पोहरादेवी, वसंतनगर, उमरी व वाईगौळ परिसरातील सर्व परवानाधारक दुकाने या कालावधीत बंद राहणार असून आदेशाचे उल्लंघन केल्यास कडक कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

### जागतिक हवामान दिनानिमित्त जनजागृती

**वाशिम:** सामाजिक वनीकरण परीक्षेत्र वाशिम आणि स्व. काशीरामजी चौधरी विद्यालय, भटउमरा यांच्या संयुक्त विद्यमाने २३ मार्च रोजी जागतिक हवामान दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. आजचे निरीक्षण, उद्याचे संरक्षण या थीमनुसार हवामान बदलाचे परिणाम, नैसर्गिक आपत्तींचा अंदाज घेऊन मानवी जीवन सुरक्षित ठेवणे आणि पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. पूर, दुष्काळ, चक्रीवादळ यांसारख्या वाढत्या संकटांचा सामना करण्यासाठी जनजागृतीची गरज अधोरेखित करण्यात आली. कार्यक्रमात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आणि हवामान बदलाच्या संकटाविषयी जागृती करण्याचे आवाहन करण्यात आले.

### पोहरादेवी यात्रेसाठी ३८४ पोलिस तैनात

**मानोरा :** श्रीक्षेत्र पोहरादेवी येथे रामजन्मोत्सवानिमित्त भरत असलेल्या यात्रेसाठी यंदा ३८४ पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. देशभरातून लाखो भाविक येत असल्याने प्रशासन सतर्क झाले असून २७ मार्चपर्यंत हा बंदोबस्त कार्यरत राहणार आहे. वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन व सुरक्षा उपाययोजनांसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

**गॅससाठी प्रतीक्षा; एजन्सीबाहेर रांगा कायम**

# ग्रामीण भागात होम डिलिव्हरी बंद; ४५ दिवसांनी गॅस बुकींग

**वाशिम / प्रतिनिधी**

प्रधानमंत्री उज्वला योजनेमुळे ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबांपर्यंत गॅस कनेक्शन पोहोचले असले तरी युद्धामुळे सध्या गॅस रिफिल मिळविताना नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. एकदा गॅस सिलेंडर मिळाल्यानंतर ग्रामीण भागात पुन्हा गॅस सिलेंडर बुकींगसाठी तब्बल ४५ दिवसांची अट असल्याने नागरिकांना दीड महिना प्रतीक्षा करावी लागत असून त्यामुळे सर्वसामान्य जनता मेटाकुटीस आली आहे.

ग्रामीण भागात अनेक ठिकाणी होम डिलिव्हरीची सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना थेट गॅस एजन्सीवर जाऊन सिलेंडर घ्यावा लागत आहे. परिणामी एजन्सीबाहेर लांबच लांब रांगा लागत असून कडक उन्हात तासन्तास उभे राहण्याची वेळ नागरिकांवर येत आहे. शेतीची कामे, दैनंदिन उपजीविका आणि घरगुती जबाबदाऱ्या सांभाळत रांगेत उभे राहणे नागरिकांसाठी अत्यंत त्रासदायक ठरत आहे. शहरी भागात मात्र परिस्थिती काहीशी दिलासादायक आहे. शहरांमध्ये गॅस डिलिव्हरीनंतर २५ दिवसांत पुन्हा बुकींग करण्याची सुविधा उपलब्ध असून होम डिलिव्हरी सुरळीत सुरू असल्याने एजन्सीसमोरील गर्दी मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. याउलट ग्रामीण भागात ४५ दिवसांची अट कायम असल्याने शहर आणि गावातील नियमभेद स्पष्ट दिसून येत असून नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. विशेषतः मोठ्या कुटुंबांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसत आहे.

एका सिलेंडरवर दीर्घकाळ भागवणे कठीण जात असल्याने अनेकांना पुन्हा लाकूड किंवा पारंपरिक इंधनाचा वापर करावा लागत आहे. यामुळे उज्वला योजनेचा उद्देश काही प्रमाणात अपूर्ण राहत असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांनी होम डिलिव्हरी सेवा तात्काळ सुरू करावी आणि बुकींग कालावधी कमी करावा, अशी मागणी केली आहे.



### गॅस बुकींगबाबत अफवा फोल

■ सोशल मीडियावर गॅस बुकींग कालावधी बदलल्याच्या अफवा पसरल्या होत्या. मात्र शासनाने याबाबत स्पष्ट केले असून शहरी भागात २५ दिवस आणि ग्रामीण भागात ४५ दिवस हीच कालमर्यादा सध्या लागू असल्याचे सांगितले आहे. जोडणीचा प्रकार विचारात न घेता ही कालमर्यादा निश्चित आहे. देशात एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध असून नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



### टंचाईच्या पार्श्वभूमीवर केरोसीन वितरणाचा पर्याय

■ युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईच्या पार्श्वभूमीवर शासनाने केरोसीन वितरणाचा पर्याय पुढे आणला आहे. ग्रामीण भागात स्वस्त धान्य दुकाने व केरोसीन हॉकर्समार्फत पुरवठा करण्याची तयारी सुरू असून, जिल्हा पुरवठा विभागाने तहसीलदारांना आवश्यक प्रक्रिया राबविण्याचे निर्देश दिले आहेत. यासाठी केरोसीन परवान्यांचे नूतनीकरणही करण्यात येणार आहे. या संदर्भात अन्न व नागरी पुरवठा विभागाने दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हास्तरीय बैठक घेऊन नियोजनाची माहिती दिली.

### कामरगावात एजन्सीसमोर उन्हात रांगा

■ के. के. इंडियन गॅस एजन्सीसमोर सिलेंडरसाठी ग्राहकांना भर उन्हात तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. एजन्सीच्या नियोजनाअभावी आणि डीएसी (ओटीपी) नंबर प्रक्रियेमुळे वितरणात विलंब होत असून नागरिकांचा त्रास वाढला आहे. शेतीची कामे सोडून रांगेत उभे राहावे लागत असल्याने शेतकऱ्यांत संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा पुरवठा विभागाने तातडीने लक्ष घालून व्यवस्था सुरळीत करावी, अशी मागणी होत आहे.

## आरटीई प्रवेशासाठी अर्जाला पुन्हा मुदतवाढ

**नियम बदलांचा परिणाम; आता अंतिम संधी**

**वाशिम / प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत पुन्हा वाढविण्यात आली असून आता पालकांना ३१ मार्चपर्यंत अर्ज करण्याची संधी देण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत २५ मार्च रोजी संपणार होती.

आरटीई प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया १७ फेब्रुवारीपासून सुरू करण्यात आली होती. प्रारंभी शिक्षण विभागाने नियमांत बदल करून विद्यार्थ्यांना घरापासून केवळ १ किमी अंतरावरील शाळांमध्येच प्रवेशासाठी पात्र ठरविले होते. मात्र, या निर्णयावर न्यायालयाने स्थगिती दिल्यानंतर ही अट रद्द करण्यात आली आणि पूर्वीप्रमाणे अर्ज प्रक्रिया सुरू ठेवण्यात आली. नियमांतील बदलामुळे सुरुवातीच्या टप्प्यात अनेक पालकांनी अर्ज करण्यास टाळाटाळ केली. तसेच आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यातही विलंब झाल्याने अर्जांची संख्या अपेक्षेपेक्षा कमी राहिली. त्यामुळे प्रशासनाने प्रथम १० मार्चवरून १८ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली, त्यानंतर २५ मार्चपर्यंतही संधी वाढविण्यात आली होती. मात्र, गतवर्षीच्या तुलनेत यंदा अर्जांची संख्या कमी असल्याचे लक्षात आल्याने पुन्हा एकदा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे अद्याप अर्ज न केलेल्या पालकांना दिलासा मिळाला असून, त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह ३१ मार्चपर्यंत अर्ज करावा, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे. १ किमी अट रद्द केल्याने अधिक शाळांची निवड उपलब्ध झाली असून पालकांना अर्जात सुधारणा करण्याची सुविधा देण्यात आली आहे. अर्ज भरताना पत्ता, जन्मतारीख व कागदपत्रे अचूक भरावीत, अन्यथा प्रवेश रद्द होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच एका बालकासाठी एकच अर्ज करावा, अशी सूचना करण्यात आली आहे.




### जिल्ह्यात आरटीईसाठी २२५५ अर्ज प्राप्त

■ आरटीई अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी जिल्ह्यातील ९५ शाळांनी नोंदणी केली असून या शाळांमध्ये एकूण १ हजार ७ जागांवर प्रवेश दिला जाणार आहे. २५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत जिल्ह्यातून २ हजार २५५ ऑनलाइन अर्ज प्राप्त झाल्याची माहिती अधिकृत पोर्टलवरून समोर आली आहे. उपलब्ध जागांच्या तुलनेत अर्जांची संख्या अधिक असल्याने प्रवेशासाठी स्पर्धा वाढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

### अफवांना बळी पडू नका; इंधनाचा पुरेसा साठा

**वाशिम:** जिल्ह्यात पेट्रोल, डिझेल व घरगुती एलपीजीचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणतीही टंचाई नाही, असे जिल्हा पुरवठा अधिकारी दीपक बाजड यांनी स्पष्ट केले आहे. अलीकडे काही भागांत पेट्रोल पंपांवर इंधन खरेदीसाठी अनावश्यक गर्दी होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून घाबरून मोठ्या प्रमाणात इंधन खरेदी करण्याची गरज नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नागरिकांनी केवळ आवश्यकतेनुसारच इंधन खरेदी करावी व अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## यशवंतराव चव्हाण सैनिक शाळेत शहीदांना अभिवादन

**वाशिम / प्रतिनिधी**

सुपखेला येथील यशवंतराव चव्हाण सैनिक शाळेत २३ मार्च रोजी शहीद दिन भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर उपक्रमांद्वारे क्रांतीकारकांना अभिवादन केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सी. एम. ठाकरे होते. यावेळी पी. व्ही. पवळ, एस. एस. दिपकर व एस. एम. गाभणे उपस्थित होते. इयत्ता आठवी 'ब'च्या कॅडेट्सनी कार्यक्रमाचे आयोजन केले. विद्यार्थ्यांनी भाषणे, देशभक्तीपर कविता सादरीकरण व प्रश्नमंजुषा यामधून क्रांतीकारकांच्या बलिदानाचा इतिहास मांडला. प्राचार्य ठाकरे यांनी देशभक्ती व शिस्त या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले, तर पी. व्ही. पवळ यांनी शहीदांच्या बलिदानाचे स्मरण कायम ठेवण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीचा उत्साह निर्माण झाला असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## जुन्या वादातून हत्या; आरोपीस आजीवन कारावास

**वाशिम / प्रतिनिधी**

मालेगाव येथील खून प्रकरणात आरोपी शुभम सुभाष चव्हाण याला जिल्हा व सत्र न्यायालय, वाशिम यांनी आजीवन सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. न्यायालयाने आरोपीस १० हजार रुपये दंडही ठोठावला असून दंड न भरल्यास सहा महिन्यांच्या साध्या कारावासाची अतिरिक्त शिक्षा सुनावण्यात आली आहे.

हा निकाल २४ मार्च रोजी देण्यात आला. या प्रकरणी फिर्यादी आकाश कैलास पवार यांनी १० नोव्हेंबर २०२४ रोजी मालेगाव पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार आरोपी शुभम चव्हाण याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेत जखमी झालेला रोहित कैलास पवार याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याने गुन्ह्यात खुनाचे कलम वाढविण्यात आले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेता तपास सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्याकडे वर्ग करण्यात आला. तपासादरम्यान आरोपीस तत्काळ अटक करण्यात आली. त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेले हत्यार जप्त करण्यात आले तसेच साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. जुन्या वादातून आरोपीने मृतकाचा खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणात साक्षीदार, भौतिक व तांत्रिक पुरावे यावर भर देण्यात आला. न्यायालयात एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. अमरावती येथील प्रादेशिक न्यायवैद्यकीय प्रयोगशाळेचा अहवालही आरोपीविरुद्ध ठरला. सरकारी वकील ॲड. माधुरी मिसर (व्यास) व कोर्ट पैरवी अधिकारी संतोष इंगोले यांनी प्रभावीपणे बाजू मांडत साक्षीदारांचे सुसूत्र सादरीकरण केले. परिणामी न्यायालयाने आरोपीस दोषी ठरवत आजीवन कारावासाची शिक्षा सुनावली. या प्रकरणाचा तपास पोलीस अधीक्षक अनुज तारे व अपर पोलीस अधीक्षक लता फड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

### खंडणी प्रकरणातील आरोपी हरीश सारडा जेरबंद, न्यायालयाकडून जामीन मंजूर

**वाशिम :** पोलिसांत दाखल असलेल्या खंडणी प्रकरणातील आरोपी हरीश सारडा याला वाशिम शहर पोलिसांनी अखेर जेरबंद केले. २६ फेब्रुवारी २०२६ रोजी दाखल झालेल्या या गुन्ह्याच्या तपासादरम्यान आरोपीला हजर राहण्याची नोटीस देण्यात आली होती. मात्र त्याने पोलिसांना सहकार्य न करता टाळाटाळ करत अखेर फरार झाला होता. पोलिसांनी आरोपीच्या हालचालींवर लक्ष ठेवत मोबाईल लोकेशनच्या आधारे अकोला रोडवरील परिसरात सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपीने पळ काढला, मात्र पाठलाग करत मालेगाव तालुक्यातील जऊळका येथे त्याला ताब्यात घेण्यात आले. दरम्यान, या प्रकरणात वाशिम जिल्हा न्यायालयाने आरोपीला अंतरिम जामीन मंजूर केला असून पुढील सुनावणी ३० मार्च रोजी होणार आहे.

## नादुरुस्त बस, समृद्धीवर अडकले ३० प्रवासी

**मेडशी पोलिसांच्या तत्परतेने सुटका**

**मेडशी / प्रतिनिधी**

समृद्धी महामार्गावर नादुरुस्त झालेल्या बसमुळे अडकलेल्या प्रवाशांना मेडशी पोलीस चौकीच्या कर्मचाऱ्यांनी तत्पर मदत करत सुरक्षितपणे पुढील प्रवासासाठी रवाना केले.

२५ मार्च रोजी पहाटे पुणे येथून रायपूरकडे जाणारी खाजगी बस चॅनेल क्रमांक २५३ येथे अचानक बंद पडली. रात्रीपासून सुमारे ३० प्रवासी महामार्गावर अडकून पडले होते. बस कंपनीकडून तातडीची मदत न मिळाल्याने प्रवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, प्रवाशांनी डायल ११२ वर संपर्क साधताच मेडशी पोलीस चौकीचे जमादार निलेश अहिर, आणि मेडशी येथील सोयल पठाण यांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीचा आढावा घेत प्रवाशांसाठी पिण्याचे पाणी व नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. महिला व लहान मुलांची विशेष काळजी घेण्यात आली. यानंतर दुसऱ्या खाजगी बसची व्यवस्था करून सर्व प्रवाशांना नागपूरकडे सुरक्षित रवाना करण्यात आले. पोलिसांच्या तत्परतेमुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला.




## भगवान महावीर जयंतीनिमित्त मांस-दारू विक्रीबंदीची मागणी

**वाशिम / प्रतिनिधी**

भगवान महावीर जयंती उत्सवानिमित्त शहरातील कत्तलखाने, मांस विक्री तसेच दारू विक्री बंद ठेवावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. यासंदर्भात १८ मार्च रोजी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, पोलीस अधीक्षक, दारूबंदी विभागाचे अधिकारी, नगर परिषद मुख्याधिकारी व पोलीस स्टेशन वाशिम यांना निवेदन सादर करण्यात आले.

३१ मार्च रोजी साजऱ्या होणाऱ्या महावीर जयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर ही मागणी करण्यात आली आहे. हा उत्सव विनतसागरजी महाराज, विश्वदृगसागरजी महाराज व संकल्पसागरजी महाराज यांच्या सानिध्यात संपन्न होणार असून त्यांच्या मार्गदर्शनपर उद्बोधनाचे आयोजन करण्यात आले आहे.

## गव्हा येथे पाणीटंचाईवरून आरोप-प्रत्यारोप

**राजकीय हेतूने तक्रार केल्याचा प्रशासकाचा आरोप**

**मानोरा/ प्रतिनिधी**

तालुक्यातील गव्हा येथे पाणीटंचाईच्या मुद्द्यावरून आरोप-प्रत्यारोप सुरू झाल्याने गावातील वातावरण तापले आहे. प्रभाग क्रमांक १, २ व ३ तसेच नदीच्या उत्तरेकडील भागात पाणीटंचाई असल्याची तक्रार काही नागरिकांनी पंचायत समितीकडे केली होती.

मात्र ही तक्रार राजकीय आकसातून करण्यात आली असून गावाची बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप ग्रामपंचायतीचे प्रशासक राहुल भगत यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी २३ मार्च रोजी गटविकास अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, गावात पुरेसे पाणी उपलब्ध असून विंधन विहिरीची दुरुस्ती करण्यात आली आहे. तसेच मागील वर्षी खोदलेल्या विहिरीलाही पाणी उपलब्ध झाले असून ग्रामस्थ नियमित पाणी भरत आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित अधिकाऱ्यांनी गावाला प्रत्यक्ष भेट देऊन वस्तुस्थितीची पाहणी करावी व पाणीटंचाई आहे की नाही याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच खोटी तक्रार व चुकीची माहिती देणाऱ्यांवर कारवाई करण्याची तयारी असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.




**पोहरादेवी येथे बंजारा साहित्य व सांस्कृतिक महोत्सवास सुरुवात**

# साहित्य अकादमीमुळे बंजारा संस्कृतीला बळकटी : मंत्री राठोड

**मानोरा/ प्रतिनिधी**

राज्यातील बंजारा समाजाच्या साहित्याला स्वतंत्र व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी मोठ्या प्रयत्नातून गोर-बंजारा साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली असून, या अकादमीमुळे हजारो वर्षांपासून चालत आलेल्या समाजाच्या अलौकिक सांस्कृतिक परंपरेचे जतन होणार आहे, असे प्रतिपादन मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी केले. ते पोहरादेवी येथे आयोजित बंजारा साहित्य व पारंपरिक सांस्कृतिक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय, साहित्य अकादमी आणि बंजारा विरासत संघ यांच्या संयुक्त विद्यमाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी या कार्यक्रमाचे उद्घाटन धर्मपीठाधीश्वर बाबुसिंग महाराज यांच्या हस्ते पार पडले. यावेळी संत सुनील महाराज, संत कबिरदास महाराज, संत जितेंद्र महाराज, संत शेखर महाराज, संत रायसिंग महाराज, सांस्कृतिक विभागाचे अधिकारी सचिन निंबाळकर, ऑल इंडिया बंजारा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. टी. सी. राठोड, दीक्षा जाधव, सुंदर महाराज, डॉ. विरा राठोड, दिलीप राठोड, मांगिलाल राठोड, प्रा. सुरेश राठोड, अरुण पवार, संजय चव्हाण, प्रा. किशोर चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी राठोड यांनी सांगितले की, राज्यातील बंजारा समाजाला स्वतःचे साहित्यिक व्यासपीठ नव्हते. त्यामुळे मंत्रालय स्तरावर प्रयत्न करून ही अकादमी स्थापन करण्यात आली. या अकादमीमुळे बंजारा समाजाच्या बोलीभाषा, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाला बळकटी मिळणार आहे. गोर बोली ही प्राचीन भाषा असून तिचे जतन करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच समाजातील कवी, लेखक, गायक, गीतकार, भजनकरी आणि प्रबोधनकार यांनी पुढे येऊन साहित्य व संस्कृती समृद्ध करण्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. आगामी काळात अंधश्रद्धा, दारिद्र्य, शिक्षण आणि विकास या विषयांवर भर देऊन समाजाची दिशा ठरविण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



### देशभरातून कलाकारांचा सहभाग

■ पोहरादेवी येथे सुरू असलेल्या यात्रा महोत्सवानिमित्त देशभरातून मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले असून या पार्श्वभूमीवर दोन दिवसीय बंजारा सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात विविध राज्यांतील कवी, लेखक, गायक, गीतकार, भजनकरी आणि कलावंत सहभागी झाले असून बंजारा संस्कृतीची समृद्ध परंपरा उलगडून दाखविण्यात येत आहे.

# दक्षिण आफ्रिकेचा पाचव्या टी-२० मध्ये ३३ धावांनी विजय

## मालिका ३-२ ने जिंकली

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेने क्राइस्टचर्चमध्ये न्यूझीलंडला पाचव्या टी-२० मध्ये ३३ धावांनी हरवले. यासोबतच प्रोटियाजने ५ सामन्यांची मालिका ३-२ ने जिंकली. या सामन्यापूर्वी ही मालिका २-२ च्या बरोबरीत होती.

न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेविरुद्धची शेवटची टी-२० मालिका २००५ मध्ये जिंकली होती. त्यानंतर दोन्ही संघांमध्ये ६ मालिका खेळल्या गेल्या, त्यापैकी ५ दक्षिण आफ्रिकेने जिंकल्या, तर एक मालिका ड्रॉ झाली. बुधवारी हेगले ओव्हल स्टेडियममध्ये न्यूझीलंडने गोलंदाजी निवडली. दक्षिण आफ्रिकेने ४ गडी गमावून १८७ धावा केल्या. कॉनर एस्टरहुइजनने अर्धशतक झळकावले. त्याने ३३ चेंडूंमध्ये ७५ धावा केल्या. त्याला सामनावीर म्हणून निवडण्यात आले. १८८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना कीवी संघ २० षटकांत ८ गडी गमावून केवळ १५४ धावाच करू शकला. आधी



फलंदाजीला उतरलेल्या दक्षिण आफ्रिकेची सुरुवात काही खास नव्हती. चौथ्या षटकात टोनी डी जॉर्जी (१२) बाद झाला. यानंतर वियान मुल्डर आणि रुबिन हरमन (३९) यांच्यात दुसऱ्या विकेटसाठी ३९ चेंडूंमध्ये ५५ धावांची भागीदारी झाली. ११ व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर मुल्डर (३१) झेलबाद झाला. चौथ्या क्रमांकावर उतरलेल्या कॉनर एस्टरहुइजनने २२७.२७ च्या स्ट्राइक रेटने ३३ चेंडूंमध्ये ७५ धावा केल्या. न्यूझीलंडसाठी

### तीन गोलंदाजांनी २-२ बळी घेतले

■ न्यूझीलंड संघासाठी बेवॉन जॅकब्सने सर्वाधिक ३६ धावांची खेळी केली. त्याच्याशिवाय कर्णधार जिमी नीशमने २४ आणि डेन क्लीवरने २२ धावा केल्या. टिम रॉबिन्सन २५ धावांवर धावबाद झाला. दक्षिण आफ्रिकेकडून जेराल्ड कूट्जीने ४ षटकांत केवळ २१ धावा देऊन २ बळी घेतले. वियान मुल्डर आणि ओटनेल बार्टमनलाही २-२ बळी मिळाले. कर्णधार केशव महाराजने १ बळी घेतला.

बेन सियर्सने २ बळी घेतले. जोश क्लार्कसन आणि जॅक्री फॉल्क्सला प्रत्येकी १-१ बळी मिळाला. न्यूझीलंडसाठी ही मालिका ऐतिहासिक संधी होती, मात्र दक्षिण आफ्रिकेच्या जमिनीवर मालिका विजय मिळवण्याचे त्यांचे स्वप्न पुन्हा एकदा अधुरे राहिले.

### दोन्ही संघांची प्लेइंग-११

■ **न्यूझीलंड:** टिम रॉबिन्सन, कॅटिन क्लार्क, डेन क्लीव्हर (यष्टीरक्षक), निक केली, बेव्हॉन जेकब्स, जिमी नीशम (कर्णधार), जोश क्लार्कसन, कोल मॅकॉन्ची, झॅक्री फॉल्क्स, काइल जेमीसन, बेन सियर्स

■ **दक्षिण आफ्रिका:** वियान मुल्डर, टोनी डी जॉर्ज, कॉनर एस्टरहुइझन (यष्टीरक्षक), रुबिन हरमन, जेसन स्मिथ, डियान फॉरेस्टर, जॉर्ज लिंडे, जेराल्ड कूट्झी, केशव महाराज (कर्णधार), प्रेनेलन सुब्रायन, ओटनील बार्टमन

## भारतीय तिरंदाजांनी २ कांस्य पदके जिंकली

**बँकॉक, वृत्तसंस्था**

थायलंडची राजधानी बँकॉक येथे सुरू असलेल्या आशिया कप वर्ल्ड रँकिंग टूर्नामेंट (स्टेज-१) च्या दुसऱ्या दिवशी भारतीय तिरंदाजांनी उत्कृष्ट प्रदर्शन केले. भारताने बुधवारी दोन कांस्य पदके जिंकली. यासोबतच भारतीय खेळाडूंनी पुरुष रिकर्व्ह आणि महिला कंपाउंड सांघिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्थान मिळवले आहे.

महिला कंपाउंड संघाने उपांत्य फेरीत थायलंडला २२९-२२६ ने हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला. चिकिता तनिपार्थी, राज कौर आणि तेजल साळवे यांचा संघ आता विजेतेपदाच्या लढतीत तिसऱ्या क्रमांकाच्या कझाकिस्तानशी भिडणार आहे. गेल्या वर्षी संघाने कांस्यपदक जिंकले होते. पुरुष कंपाऊंड संघाला उपांत्य फेरीत व्हिएतनामकडून २३३-२३४ ने पराभव पत्करावा लागला. संघाकडे आघाडी होती, पण शेवटच्या क्षणी सामना हातातून निसटला. तथापि, संघाने कांस्यपदकाच्या सामन्यात भूतानला २३४-२३२ ने हरवून तिसरे स्थान पटकावले. रजत चौहान, ऋषभ यादव आणि उदय कंबोज यांचा अनुभवी संघ आपले विजेतेपद राखण्यात अपयशी ठरला. उपांत्य फेरीत व्हिएतनामने परफेक्ट ६० गुण मिळवून पुनरागमन केले आणि भारताला २३४-२३३ ने हरवले. नंतर कांस्यपदकाच्या सामन्यात भारताने भूतानला २३४-२३२ ने हरवून पदक निश्चित केले.

## आयपीएल २०२६ ची कर्णधारांची मुंबईत बैठक



**मुंबई, वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ ची कर्णधारांची बैठक बुधवारी मुंबईत झाली, ज्यात सर्व १० संघांचे कर्णधार बीसीसीआयच्या मुख्यालयात जमले होते. बीसीसीआयने बैठकीचे काही फोटो शेअर केले आहेत. हा हंगाम दोन टप्प्यांत खेळला जाईल आणि सध्या सुरुवातीच्या २० दिवसांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.

आयपीएल २०२६ चा उद्घाटनाचा सामना २८ मार्च रोजी गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळला जाईल. या हंगामाचे आतापर्यंत २० दिवसांचे वेळापत्रक आले आहे.

आयपीएल २०२६ मध्ये पहिल्यांदाच असे घडत आहे, जेव्हा सर्व १० संघांची कमान भारतीय खेळाडूंच्या हातात आहे. लीगमध्ये एकूण १० संघ सहभागी होत आहेत. यामध्ये चेन्नई सुपर किंग्स, मुंबई इंडियन्स, कोलकाता नाइट रायडर्स, रॉयल चॅलेंजर्स बेंगलुरु, दिल्ली कॅपिटल्स, राजस्थान रॉयल्स, पंजाब किंग्स, सनरायझर्स हैदराबाद, लखनऊ सुपर जायंट्स आणि गुजरात टायटन्स यांचा समावेश आहे.

एप्रिल-मे दरम्यान पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. यामध्ये आयपीएल सामने आयोजित करणारी राज्ये बंगाल, तामिळनाडू आणि आसाम यांचाही समावेश आहे. याच कारणामुळे सध्या २८ मार्च ते १२ एप्रिल दरम्यान होणाऱ्या २० सामन्यांचेच वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे.




### बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**धुरंधर द रिवेंज :** ११:३०, १:३०, ४:००, ८:००, ८:३०

### खामगाव

**श्री गजानन टॉकिज**

**धुरंदर २ :** दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकिज**

**धुरंदर २ :** शो टाईम- दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

### वाशिम

**एच२एम मूव्हीप्लेक्स**

**धुरंधर द रिवेंज :** स १०:००, ११:५०, दु. ०२:१५, ०४:०५,सा ०६:३०, रा. ०८:३०, १०:४०

### अकोला

**मिराज**

**धुरंधर दी रेव्हेंज (२) :** स. ७.००, स. ८.००, स. ९.५५, स. ११.३०, दु. १२.३०, दु. १.३०, दु. २.२५, दु. ४. १५, दु. ५.१५, दु. ६.१५, सायं. ७.१० रात्री. ९. ००, रा. १०.००, रा. ११.००, रा. ११.५५

### जालना

**रत्नदीप सिनेमा**

**धुरंधर द रिव्हेंज :** सकाळी ७ : ४५; दुपारी १२ : ००; सायंकाळी ४ : ३०; रात्री ९ :३०

**कृष्णा मल्टिप्लेक्स**

**केरला स्टोरी २ :** दुपारी १२ :००; ३ :००; सायंकाळी ६ : ००; रात्री ९ : ३०
**तेरे नाम :** दुपारी ३ : ३० ; रात्री ९ :३०
**ओ रोमिओ :** दुपारी १२ :००; रात्री ९ :००
**धुरंदर :** दुपारी : १२:००
**अगं अगं सुनबाई काय म्हणता सासूबाई :** दुपारी ३ : १०

### छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**धुरंधर द रिव्हेंज :** सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:००
**धुरंधर द रिव्हेंज :** द केरला स्टोरी २ - दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०
**पुन्हा एकदा साडे माडे तीन :** दुपारी २:३०, सायंकाळी ५:३०
**ओ रोमीओ :** दुपारी १२:१५, २:३०
**बॉर्डर २ :** दुपारी २:३०, ४:३०
**अग अग सुनबाई.. काय म्हणताय सासूबाई :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**धुरंधर द रिव्हेंज :** सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०
**रमाई :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**द केरला स्टोरी २ :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५
**अग अग सुनबाई.. काय म्हणताय सासूबाई :** दुपारी २:३०, रात्री १०:२५

**मुक्ता - नुपूर सिनेमागृह**

**धुरंधर द रिव्हेंज :** सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००
**ओ रोमीओ :** सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८ : ००
**द केरला स्टोरी २ :** दुपारी १२ : ००, रात्री ९ : ३०




## दृश्यम ३ आता २ एप्रिलऐवजी २१ मेला प्रदर्शित होणार

मल्याळम अभिनेता मोहनलाल यांच्या बहुप्रतिक्षित दृश्यम ३ चित्रपटाची रिलीज डेट बदलली आहे. जीतू जोसेफ दिग्दर्शित हा चित्रपट आता २ एप्रिलऐवजी २१ मे २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल.सोमवारी संध्याकाळी मोहनलाल यांनी स्वतः सोशल मीडियावर या बातमीची पुष्टी केली. विशेष म्हणजे, २१ मे रोजी मोहनलाल यांचा ६६ वा वाढदिवस देखील आहे, त्यामुळे निर्मात्यांनी हा दिवस चित्रपटाच्या प्रदर्शनासाठी निवडला आहे.


हिंदीमध्ये दृश्यम चित्रपट अजय देवगणसोबत याच नावाने रिमेक करण्यात आला आहे, मात्र यावेळी मोहनलाल यांचा चित्रपटच हिंदीमध्ये प्रदर्शित केला जाईल. मोहनलाल यांनी एक्स वर चित्रपटाचे नवीन पोस्टर शेअर केले आहे. पोस्टरसोबत त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले, भूतकाळ कधीच शांत राहत नाही... तो फक्त वाट पाहतो. जॉर्जकुट्टी येत आहे, २१ मे २०२६ रोजी. खरं तर, चित्रपटाच्या प्रदर्शनाला उशीर झाल्याची चर्चा काही काळापासून सुरू होती. चित्रपटाचे चित्रीकरण गेल्या वर्षी डिसेंबरमध्येच पूर्ण झाले होते, परंतु आता सुपरस्टारच्या वाढदिवसानिमित्त तो प्रदर्शित करून अविस्मरणीय बनवण्याची तयारी आहे.




## मोनालिसाचे दिग्दर्शक सनोज मिश्रा यांच्यावर गंभीर आरोप

### मला अनेकदा चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला

प्रयागराजच्या कुंभमेळ्यातून चर्चेत आलेल्या मोनालिसा भोसले हिने मंगळवारी दिग्दर्शक सनोज मिश्रा यांच्यावर द डायरी ऑफ मणिपूर चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान चुकीच्या पद्धतीने स्पर्श केल्याचा गंभीर आरोप केला. तिने सांगितले की, तिला आणि तिच्या पतीला जीवे मारण्याच्या धमक्या मिळत आहेत. मोनालिसा यांनी केरळमधील कोची येथे एका पत्रकार परिषदेत सांगितले की, सनोज मिश्रा चांगला माणूस नाही. त्याने मला १० वेळा चुकीच्या पद्धतीने स्पर्श केला. मी माझ्या कुटुंबाला सांगितले की सनोज मिश्राने मला स्पर्श केला, पण त्यांनी मला साथ दिली नाही. मी काय सहन केले आहे, हे मला माहीत आहे. माझ्यासोबत गैरवर्तन झाले आहे. मला फक्त न्याय हवा आहे. सनोज मिश्राने मला जेव्हा स्पर्श केला, तेव्हा मी ही गोष्ट माझ्या संपूर्ण कुटुंबाला सांगितली, पण मला सांगण्यात आले की हा तुझा पहिला चित्रपट आहे. पहिल्या चित्रपटासाठी तुम्ही माझ्यावर बलात्कार कराल का? मोनालिसाने केंद्र सरकारसोबत केरळ आणि मध्य प्रदेश सरकारकडे मदत मागितली. ती म्हणाली की तिला आणि तिच्या पतीला जीवे मारण्याच्या धमक्या मिळत आहेत. मोनालिसा म्हणाली की तिचे पोस्टर जाळले जात आहेत. तसेच काही लोक तिला सतत धमकावत आहेत.




### पतीवर खोटे आरोप न करण्याची विनंती

■ मोनालिसाने केंद्र आणि उत्तर प्रदेश सरकारला आवाहन केले की, तिच्या पतीविरुद्ध लग्नासंदर्भात चुकीचे आरोप लावू नयेत. तिने सांगितले की, दोघांनी मंदिरात हिंदू रितीरिवाजानुसार लग्न केले आहे. तिने आरोप केला की, दिग्दर्शक त्यांच्या लग्नाला लव्ह जिहाद म्हणत आहे आणि समाजात तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. मोनालिसाने सर्व धर्मांबद्दल आदर व्यक्त केला. मोनालिसा म्हणाली की, जर त्यांना तिच्या पतीपासून वेगळे करण्याचा प्रयत्न केला गेला, तर दोघेही आत्महत्या करतील.

## कांतारा वादात रणवीर सिंह बिनशर्त माफी मागणार

चित्रपट कांतारा मधील दैवा सीनची नक्कल केल्याप्रकरणी रणवीर १० एप्रिल रोजी कर्नाटक उच्च न्यायालयात बिनशर्त माफीचे प्रतिज्ञापत्र दाखल करेल. कन्नड समुदायाच्या भावना दुखावल्याच्या आरोपाखाली दाखल झालेल्या एफआयआरनंतर अभिनेत्याने हे पाऊल उचलले आहे.

न्यायालयात सुनावणीदरम्यान रणवीर सिंहच्या वकिलांनी स्वेच्छेने एक प्रस्ताव ठेवला आहे. ते म्हणाले की, अभिनेता स्वतः म्हैसूरच्या चामुंडी मंदिरात जाऊन वैयक्तिकरित्या माफी मागण्यास तयार आहे. यापूर्वी फेब्रुवारीमध्ये उच्च न्यायालयाने रणवीरला मोठा दिलासा देत त्याच्याविरुद्ध कारवाई न करण्याचे निर्देश दिले होते.



## मुंबईत स्वतंत्र नाट्यगृह व चित्रपटगृह उभारणार : मंत्री आशिष शेलार

### मराठी चित्रपटांना २४ कोटी १० लाख रुपयांचे अर्थसहाय्य

मराठी चित्रपटसृष्टीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने मराठी चित्रपट निर्मितीस अर्थसहाय्य या योजनेंतर्गत ऑक्टोबर २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत परीक्षण केलेल्या 'अ', 'ब' आणि 'क' श्रेणीतील ६५ चित्रपट आणि कोविड काळातील ९८ चित्रपटांना २४ कोटी १० लाख रुपयांचे अर्थसहाय्य वितरित करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईसह राज्यातील इतर भागांमध्ये टप्प्याटप्प्याने मराठी चित्रपटगृहांचे जतन आणि विकास करण्यात येणार आहे. तसेच मुंबईत एकत्रित सुविधांसह स्वतंत्र नाट्यगृह व चित्रपटगृह उभारण्यात येणार असल्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी सांगितले.

सांस्कृतिक कार्य विभागाच्या महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्यावतीने आयोजित दर्जेदार चित्रपटांना अर्थसहाय्य योजनेचा धनादेश वितरण सोहळा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. सांस्कृतिक कार्य व मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाचे सहव्यवस्थापकीय संचालक प्रशांत साजणीकर, विविध चित्रपटाचे निर्माते यावेळी उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त 'श्यामची आई' या चित्रपटास ७९ लाखांचा निधी वितरित करण्यात आला. तसेच अपर्णा होशींग, शेट्टी, स्नेहल तरडे या दिग्दर्शक महिलांना प्रत्येकी ५ लाख प्रोत्साहन निधी देऊन गौरविण्यात आले.

### चित्रपटांच्या अ दर्जासाठी ४० लाख

■ मंत्री ॲड. आशिष शेलार म्हणाले की, महाराष्ट्र हा वैभव संपन्न व प्रतिभा संपन्न आहे. महाराष्ट्रात कला, साहित्य, जागरूक नागरिक, उत्कृष्ट कलावंत या सगळ्याची पेरणी आहे. मराठी क्षेत्रातील निर्मात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना कार्यान्वित आहेत. त्या माध्यमातून चित्रपटांच्या अ दर्जासाठी ४० लाख, ब दर्जासाठी ३० लाख आणि क दर्जासाठी दहा लाख रुपये अनुदान वाटप करण्यात येत आहे.

